म. ग्रं. सं. ठाणें
विषय विनोद
सं. क्र. ३९०

REFBK-0001893

ग्रं. सं. ठाणे
320

ांचा स्वर्गीय संदेश.



ॐ

१८९३

# लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश.

REFBK-0001893

लेखक,

लक्ष्मण नारायण जोशी,

बोल्शेव्हिझम, राशियाचें सूर्यग्रहण, अस्तोदय, समर्थराष्ट्रगुरु, शिवाजीचा उजवा हात, वगैरे पुस्तकांचे कर्ते.

प्रकाशक,

शंकर हरि मुळे,

मालक—महाराष्ट्र-ग्रंथालय, पुणें.

किंमत दहा आणे.

प्रकाशक—शंकर हरि मुळे, यांनीं पुणें येथें बुधवार पेठ, महाराष्ट्र-ग्रंथालयांत प्रसिद्ध केलें.

मुद्रक—त्र्यंबक हरि आवटे, पुणें सदाशिव नं. २७० यांनीं पुणें पेठ, सदाशिव नं. २७० येथील इंदिरा छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना

Oh, Freedom ! yet thy banner torn, but flying,
Streams like the thunderbolt against the wind.

***Byron.***

महत्वाकांक्षेच्या मद्यानें झिंगून, बेहद्द स्वार्थाच्या उन्मादवायूनें बेफाम झाल्यानें, मानवी जीवितांचें कसायीखाने उभारण्याचें शास्त्र पढणाऱ्या व रणमखांतील नरबलीदानांच्या आहुती देण्याचीं यज्ञकुंडें रचणाऱ्या नरपशूंनीं, आजवर सामर्थ्याच्या जोरावर सर्व जगभर धिंगाणा घालून, जगाचा नकाशा जो रक्तवर्ण करून सोडला आहे, तो त्यांनीं भूतदया–देवतेला आपल्या लत्ताप्रहारानीं तुडविल्यामुळेंच, त्यांची कुटिल नीति, त्यांना आतां समानदर्शी न्यायदेवतेपुढें उभे करून त्यांचा न्याय लावून घेण्यास सच्चिदानंदपदकमलीं शरण गेली आहे ! कपटपटु मुत्सद्यांच्या ओंठांवर, नाटकी पात्रांप्रमाणें हास्यलास्य करणारी मानवी अन्यायी न्यायदेवता, आतां प्रभुकृपेनेंच, प्रभूच्या खऱ्या न्यायासनासमोर दिगंबरावस्थेंत ब्रह्मांडाच्या दृष्टीस पडण्याचा समय प्राप्त झाला आहे! शब्दच्छलानें स्वातंत्र्य—देवतेच्या पायांत पारतंत्र्याची अवजड शृंखला ठोकल्यानें आपण सुरक्षित राहूं, असें स्वप्नावस्थेंतल्या मृगजलाप्रमाणें स्वतःशींच मानणाऱ्या मुत्सद्यांनीं, आजपर्यंत स्वार्थासाठीं जगाला चकवून परक्यांचें बलिदान केल्यानें, स्वार्थसाधनाची खोटी कल्पना करून, चैन भोगण्याचा जो लपंडाव चालविला आहे, त्याचा झाडा, स्वातंत्र्यरवीच्याच दिव्य ज्योतिःप्रकाशांत त्यांना देण्याची वेळ, अगदीं जवळ जवळ येत चालली आहे !

आपण कशाकरितां व कोणासाठीं, मानवी रक्तानें आपले हात रणमैदानावर लालभडक करून, खुनी ठरतों आहोंत, याचें ज्ञान सैनिकांना आतां पुरें होऊं

लागलें आहे ? मानवी कत्तलीची रुधिरपिपासा मनःपूत शांत करण्यासाठी, आधाशीपणानें एकमेकांवर वरचढ शास्त्रें तयार करण्यांत अग्रेसरत्वाचा मान मिळविण्याची जिगीषा धरणाऱ्या अस्सल साटकी विज्ञानीयांत प्रगती केलेल्यांची जबानी घेण्यास दैवी न्यायदेवता सिंहासनस्थ झाली असल्यानें, ज्यांनीं सद्बुद्धीचा अत्यंत किळसवाणा दुरुपयोग करून, हिंस्रपशूंनांही लाज उत्पन्न केली आहे, अशांच्या अंगाला नरकयातनेंतील भीतीनें कांपरें भरविलें आहे ! मानवी कत्तल सुरू करण्यासाठीं अनुज्ञा देण्यास, ज्या रणवाद्यांच्या गंभीर गर्जना केल्या जातात, त्या करण्याचे दिवस आतां लयाला गेल्याचें, यशस्विनी भूतदयेनें जगजाहीर केलें आहे ! छातींत धडकी भरवून सोडणाऱ्या व प्रलयकालीन मेघांच्या गडगटाशीं स्पर्धा करण्याचा आव आणणाऱ्या, आपल्याच जातभाई अशा मानवी जीवांना अस्मानांत उडवून, त्यांच्या देहाचे राईराई एवढे तुकडे, कोल्ह्याकुत्र्यांना अथवा गृध्रकाकांना यथेच्छ चरण्याचें कुरण तयार करणारी—मूढ, स्वैर व स्वेच्छाचारी राजनीति, स्वजीविताच्या भयानें, सध्यां अगदीं गरीब कोंकराचें कातडें पांघरून जरी जगत्संचार करण्याचा प्रयत्न करते आहे, तरी तो छद्मी वेष शान्ततादेवीनें पक्का ओळखला असल्यानें, आतां त्या कपटी बगळ्याला फसून आपल्या जीवाला मुकणाऱ्या निरुपद्रवी माशांप्रमाणें, जगतांत लोक राहिले नाहींत आणि म्हणूनच त्यांच्या त्या कपट–नाटकाची जगानें पुरी नाचक्की करून सोडली आहे! स्वातंत्र्यानें पारतंत्र्याच्या कचाट्यांतून बेडा पार होण्यासाठीं रणशिंग फुंकलें असून, तें आतां—जुलमी, स्वार्थी व कपटपटु मुत्सद्यांना धर्मयुद्धाचें आव्हान करून राहिलें असल्यानें, 'गुंतलास कां व आतां कुंथतोस कां ? अशी जगज्जेते म्हणविणाऱ्या फसव्या मुत्सद्यांची स्थिति झाली आहे ! त्या धूर्तांच्या कुंडल्यांतले बहुतेक सर्व ग्रह आतां रणमस्तीच्या आखाड्यांतील रणभैरवाच्या धोबी–पछाडीनें अगदीं खिळखिळ्या देहांचे बनल्यानें, अवनतीच्या मार्गाला लागून, भोळ्याभाबड्या व विश्वासानें फसविल्या गेलेल्या सच्छी-

ह्यांच्या कुंडल्यांतील वैभव—रवीचा प्रभातकाळ दिसूं लागला आहे ! त्याच्याच कांतीनें, त्या नीचांचे अधिकारमदानें वटारलेले डोळे दिपूं लागून, त्यांतून पिंवळा चिकट पदार्थ बाहेर पडूं लागला आहे.

ज्यांच्या वैभवी व सत्वशील अशा स्वच्छंदी परंतु परोपकारी राष्ट्रध्वजाच्या चिंधड्या, ज्या—महत्वाकांक्षापूर्ण, परद्रव्याभिलाषी, धूर्त, कपटपटु स्वार्थी, गळेकापू आणि नीच लोकांनीं केल्या आहेत, त्याच चिंधड्या सध्यां, प्रलयकालीन प्रचंड मेघराशींत थै थै नाचणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें त्यांच्या शत्रूंच्या उन्मत्त दृष्टीला स्वस्वरूपाच्या तेजानें भेवडावूं लागल्या आहेत ! अवनतीला पोंचलेल्या व निर्बल अशा मानवांची कड घेऊन, जुलमाशीं विरोध करणाऱ्यांच्या छलाची आतां परिसमाप्ति होऊन, जुलमालाच भूतदयान्वित सत्तेचा दासानुदास होण्याची पाळी आल्यानें, सर्व जगभर त्या जुलमी सत्तेच्या धिःक्कारानें जी नारकीय दुर्गंधी सुटली आहे, तिचा नायनाट करण्यासाठींच हा—**लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश**—आपला मधुर गंध पसरून दूषित वातावरणाला शुद्ध करण्यास अवतरला आहे ! त्या शुद्ध, निर्मल, पवित्र आणि **स्वर्गीय** शब्दरत्नाकराच्या जोरदार व फलदायी लाटांनीं दुर्दैवी भरतखंडाच्या अशुद्ध झालेल्या सीमा धुतल्या जाऊन, पूर्वींचें आपलें सुसंस्कृत व उज्ज्वल रूप जगाच्या मनःचक्षूंपुढें मांडण्यास त्या जशा सज्ज झाल्या आहेत तद्वतच हा **स्वर्गीय** संदेश—लांड्यालबाड्यांचें आविष्करण करून, सत्यमूर्तीवरचा काळा पडदा दूर करण्यास सज्ज झाला आहे ! याचें अध्ययन आणि अध्यापन हीं, देशभक्तांचीं मुखकमलें आपल्या अन्तःशक्तीनें गुलाबाच्या प्रफुल्ल ताज्या ताटव्याप्रमाणें प्रसन्न करणारीं असल्यानें, त्याचा प्रतिकार करण्याचें पाप कोणचा लोकोत्तर मूर्ख आपल्या पदरीं घेण्याचें धारिष्ट करील ? कोणीहि करणार नाहीं ! कारण, आपली उन्नति व प्रगति या दोन्ही गोष्टी स्वातंत्र्यावांचून कधींच होणार नाहींत, हा सिद्धांत त्यांच्या हृदयावर वज्रलेपाप्रमाणें

अढळ होऊन बसला आहे व तसा तो होण्याचें कारण, लोकमान्यांनीं आपल्या हयातींत दिलेली शिकवणच सर्वस्वी कारणीभूत झालेली आहे.

ज्या मानव-जीविताच्या हितकर्त्यानें-सर्व जन्मभर, स्वदेशाला पारतंत्र्यांतून मुक्त करण्यासाठीं राज्यकर्त्यांशीं झगडा केला व त्यांच्याकडून निष्ठुरतेचा मोबदला मिळविला,अशा त्या थोर सच्छीलाचा जन्म खरोखरीच धन्य होय ! तशीच त्याची शिकवणही धन्य होय ! मनुष्याचें बल जसें हृदयांत राहातें व त्या हृदयबलानेंच जसें प्राकृतिक बल सूचित होतें, तद्वतच भारतवर्षाची जी खरी शक्ति ती. लोकमान्यांच्या वक्तृत्वांत व या संदेशांत परिपूर्ण भरलेली आहे, अशा त्या शक्तीनेंच यापुढें भारतवर्षाचा गौरव अखिल भूमंडळावर सुप्रातिष्ठित होणार आहे ! भारतवर्षाला, त्याच नरपुंगवाच्या इच्छाशक्तीनें, भारतवर्षाची पूर्ण परावलंबी स्थिति व हताश अवस्था पाहून, भग्नहृदय झालेल्या व घळघळा अश्रू ढाळणाऱ्या- तिलक शिखाग्रणीचा जो हा स्फूर्तिदायक **संदेश**-स्वजनांच्या अब्रूची लज्जा राखण्यासाठीं हस्तेंपरहस्तें धाडिला आहे, तो वाचून, अशी कोणची सहृदय व्यक्ति अथवा या भरतभूचें असें कोणचें संतान असेल कीं, जें आपली छाती वर करून असत्यतेचा प्रतिकार करण्यास पवित्र्यावर उभें राहणार नाहीं ? फत्तरापेक्षांही कठीण काळजाचा जरी कोणी असला, तरी त्याच्याही हृदयाला-भरतखंडाच्या सद्यःस्थितीची हकीकत वाचून पाझर फुटल्यावांचून राहणार नाहीं ! लोकमान्यांची शिकवण हीच सध्यां हिंदूच्या धर्मशास्त्राची पोथी पुढें मांडून, प्रत्येकानें त्याचा पाठ करावा आणि त्यांत जीं अमृतसर, जालियनवाला बाग—वगैरे स्थलें सांगितलीं आहेत तींच या काळचीं पवित्र तीर्थक्षेत्रें मानावींत असें म्हणण्यास कोण नाकारील ? त्या स्थलापेक्षांहि इतउत्तर फारच श्रेष्ठ अशीं तीर्थक्षेत्रें जरी कालगतीनें उत्पन्न झालीं, तरी सर्वांचा उगम त्या पूर्वीच्यांतूनच होणार असल्यानें त्यांचें आद्यत्व आतां लोपणें शक्य नाहीं !

इतिहासलेखकांनीं ग्रीसचे लिओनेडाज् व मिलटायडीज् यांच्या प्रशंसाचे जरी मोठाले विस्तृत ग्रंथ लिहिलेले असले तरी, निःशस्त्रावस्थेंत ते लढलेले नसल्यामुळें, जे कोणी गुलामगिरींतील असहाय अवस्थेंत, निःशंकपणें सत्यासाठीं जुलमी राजकर्त्यांशीं, निःशस्त्रप्रतिकाराचें शस्त्र हातीं धरून, आपला तरणोपाय म्हणून असहकारितेची ढाल हातीं धरण्याची युद्धपद्धति स्वीकारतात, तेच सर्वश्रेष्ठ होत, असें इतिहासकारांना लिहिण्याचा जो प्रसंग लोकमान्यांनीं आणून दिला, त्याबद्दल त्यांनीं त्यांचें ऋणीच राहिलें पाहिजे ! अशा पंक्तीचे लिओनेडाज् जे लोकमान्य या आर्यभूमीच्या उदरांतून उत्पन्न झाले, त्यांचीच सुधारलेली आवृत्ती म्हणून आतां देशभक्त महात्मे निपजूं लागले आहेत व कालानुरूप पारतंत्र्याशीं धीमेपणानें झगडताहेत !

अहो, प्राचीन सनातन धर्माभिमानी आणि तीर्थयात्रांचे अनुरागी भारतपुत्रांनो, पाहा—एकवार तरी डोळे उघडून पहा ! जालियनवाला बाग आणि अमृतसर हीं दोन स्थळें, आर्यांच्या धर्माच्या प्राचीनत्वाची ग्वाही देत कशीं शांततेंत निमग्न झालेलीं आहेत, तीं तुम्हांला स्पष्ट दिसताहेत ना ? तीं शांततेंत कां बरें दिसत आहेत ? त्यांनीं एवढा अपमान कां बरें सोसला आहे ? या प्रश्नाचें उत्तर एकच असून, तें ' **हिंदूंची राज्य करण्याची अपात्रता** ' या तीन शब्दांत आज हिमनगाच्या अत्युच्च शिखरावरून सर्व जगाला ऐकूं येईल अशा भयानक ध्वनींत जें इंग्रज राजकर्त्यांकडून सांगितलें जातें आहे, त्यांत सत्याचा पुष्कळच अंश आहे ! शान्तता—परीषदेंत जगच्छान्ततेची वाटाघाट करूनही ज्यांना स्वदेशाला शान्ततेंत ठेवतां येत नाहीं, त्यांना ' स्वराज्य ' मागण्याचा व देण्याचा अधिकार तरी काय ? ज्यांना ' जालियनवालाबाग ' नाहींसा करतां येत नाहीं व ज्या राक्षसांनीं आपल्या अघोर कृत्यांनीं ज्याची उत्पत्ति केली, ते ज्यांच्या नाकांवर चुना फासून; निर्दोषत्वाच्या वरमिशांनीं हिंडताहेत त्यांच्या त्या मिशा उतरण्याची ज्यांना हिम्मत नाहीं ते स्वराज्याला व स्वातंत्र्याला अपात्र ठरल्यास, त्यांत वाईट वाटून घेण्याचें कारण काय ?

दुर्योधन व त्याचे मंत्री यांनीं पांडवांना स्वराज्याला अपात्र ठरवलें नव्हतें का ? पण पांडवांनीं जेव्हां आपली पात्रता दाखवली त्याचवेळीं ते स्वातंत्र्यांतील स्वराज्याच्या सिंहासनावर अभिषिक्त झाले. हीच गोष्ट हिंदुस्तानच्या सध्यांच्या स्थितींतल्या ' अपात्र ' या शब्दाची आहे ! पात्रता दाखवा आणि स्वराज्य घ्या ! ' भिक्षा म्हणजे कामधेनु ' असें समर्थांनीं जें म्हटलें आहे, तो मंत्र स्वराज्याच्या बाबतींत मवाळांच्याच पूर्ण उपयोगाचा असल्यामुळें, त्यांनीच ' बहुत आणितां घ्यावें मुष्ठी एक ' या न्यायानें पायरी पायरीनेंच जावें हें जसें योग्य आहे, तद्वतच ' हिंदू तितका मिळवावा । आत्मतेजाचा प्रकाश पाडावा । येविशीं करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ ' अशा अर्थाचा उपदेश समर्थांनींच मवाळांच्या विरुद्ध पक्षाला केलेला आहे व त्यांतच स्वराज्याच्या गुळखोबऱ्याची खरी मख्खी असल्यानें, तोच आम्हीं वळवावा हें लोकमान्यांनीं पदोपदीं कंठरवानें सांगितलेलें आहे ! स्वराज्य आणि शान्ति या दोन गोष्टी प्राप्त करून घेण्यास जर हिंदु उतावळे झाले असतील, तर त्या वस्तु त्यांना, समर्थांच्या वरील उपदेशाचा रस्ता आक्रमण करण्यानेंच हस्तगत होणार आहेत ! असा कोणचा देश अवनीतलावर सांपडेल कीं, जेथल्या अबलांनीं प्रबल शत्रूची भीतीनें दांतखिळी बसवून, भडकलेल्या अग्निकुंडांत उड्या मारिल्या व आत्मबलाचा जगताला परिचय करून देऊन, जेथल्या कोमल, सुकुमार बालवीरांनींही स्वदेशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या आहेत ? असें तें जर जगांत कोणचें पवित्र राष्ट्र असेल, तर तें सध्याचें गुलामगिरींत खितपत पडलेलें हिंदुस्तानच होय !

स्वातंत्र्यदेवतेच्या प्रसन्नतेसाठीं भारतनिवासी देशभक्तांनीं आपल्या अशुद्राच्या नद्या वाहविल्या नाहींत असें कोणचा इतिहास सांगेल ? ' हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ' हा जो भगवान् शशिकुलमुकुटमणि कृष्णचंद्राचा उपदेश, तोच ज्यांच्या

जीवनाचा मूलमंत्र होऊन राहिला आहे व त्यांतलें मर्म लोकमान्यांनीं सद्य:कालाला अनुसरून आमच्यापुढें जें रहस्यरूपानें ठेविलें आहे, त्याचा परिचय जर आम्हांपैकीं प्रत्येक हिंदु म्हणविणारास झाला नाहीं, तर अश्वत्थामा मारला गेल्याची दुःखद वार्ता ऐकून, द्रोणाचार्यासारखा सर्वज्ञ आचार्य जसा मोहवश झाल्यानें, कर्मसंन्यासी बनला व धृष्टद्युम्नाकडून कांपला गेला तशी सर्व हिंदूंची अवस्था होईल! यास्तव, फलाशा सोडून राष्ट्रीय स्वातंत्र्याचें कर्म करीत राहिल्यानेंच यापुढें धर्मराजाचे दिवस दिसणार आहेत, असें जें गीतारहस्यानें प्रतिपादिलें आहे, तेंच तत्व आम्हीं आतां आचरणांत आणून 'पात्रता' प्राप्त करून घेतली पाहिजे हें उघड आहे.

तें गीता-रहस्य आत्मोत्सर्गानें आत्मोन्नत्तीचा मार्ग दाखवीत आहे! तें रहस्य भरतखंडाचा उज्वल आणि दृष्टांतपूर्ण आदर्श बघायला शिकवतें आहे! आजपर्यंतचा भरतखंडाचा आत्मोत्सर्गाचा इतिहास,असा तसा लेचापेचा नाहीं,असें तें स्पष्ट सांगतें आहे! तें मृताला सजीव करतें आहे! कोरड्या शुष्क हाडांच्या नळ्यांतून ताजें व तप्त रक्त निष्पन्न करून,त्याला तें स्वातंत्र्य व स्वराज्य यांचा रस्ता आक्रमण्यास सळसळून सोडतें आहे! आम्हां निराशारूप सागरांत गोते खाणाऱ्यांना तें गीतारहस्य पैलथडी दाखविणारी नौकाच लोकमान्यांनीं आमच्यापुढें ठेविली असून,तेंच रहस्य तिचा सुकर्णधार बनलें आहे! फार काय सांगावें? मृत्युशय्येवर पडलेल्यांना व गुलामगिरींतून सुटका करून घेण्याचा मार्ग न सांपडणाऱ्यांना, तें रहस्य, अनुक्रमें संजीवनी मात्रा व खरी गुरुकिल्लीच आहे!

मानवी आयुष्याचें अत्यंत उदात्त असें स्वरूप ज्या गीतामातेनें जगापुढें ठेविलें, त्याचेंच हृदयाविष्करण वरीलप्रमाणें लोकमान्यांनीं केलें असल्यानें, त्यांतल्या कर्ममार्गापासून च्युत होणें आम्हां हिंदूंना आतां शक्य नाहीं. अशा तऱ्हेच्या कर्मयोगामृताचें प्राशन करून आम्हीं स्वराज्य आणि स्वदेश यांच्या हिताच्या कार्यांत गुंग झालें पाहिजे. भोजनासाठीं आम्हांला जगायचें नसून, देशसेवेसाठीं जगण्याकरतां आम्हांला भोजन करायचें आहे, हें आम्हीं विसरतां

उपयोगी नाहीं. आम्हां हिंदूंच्या कर्तव्याचें हेंच दिव्य आहे व हेंच आमची पारतंत्र्यांतून स्वातंत्र्याच्या मंदिरांत प्रगति करणार आहे! हेंच आमचें ध्येय अत्यंत संजीवक असून, आमच्या समाजाला उजळ माथ्याचें बनविणारें आहे! आमचा झगडा, स्वातंत्र्यांतल्या स्वराज्यप्राप्तीसाठीं आमच्या सध्यांच्या राज्यकर्त्यांशीं जो सुरू झाला आहे, त्यांत आम्हांला आमचा हा कर्मयोगच अखेरीस यशःप्राप्ती करून देणार आहे! जे कोणी निराश बनले असतील, त्यांना आशेच्या चैतन्यानें प्रयत्नवादी बनवणारा जर कोणी असेल, तर तो हाच **कर्मयोगवादी लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश** आहे!

भूतदयेच्या साम्राज्यांत आत्मशुद्धि करून घेण्याची जी लाट सध्यां जगावर आली आहे, तिनें अनेक पातकें धुऊन जात आहेत! राजकारणावांचून धर्म पंगू असल्यानें व धर्मावरच राजकारण अवलंबून आहे हें प्रत्ययाला आणून देणाऱ्या युगाचा उदय झाला असल्यानें, लोकमान्यांनीं—धर्म व राजकारण यांचा मेळ घालून देऊन आधीं राजकारण हातीं धरीलें आणि त्यांत गीतेच्या हृदयरहस्याचा धर्म कथन केला! सन्या तत्वज्ञानाचा खरा जयजयकार, राजकाकारणाच्या धर्मांत कसा असतो याची जी मूर्ति लोकमान्यांनीं आपल्या देशबांधवांपुढें मांडली, तीच अधिक उदात्त स्वरूपांत महात्माजींनीं 'अहिंसे'च्या छिलसताखालीं स्वदेशबांधवांपुढें असहकारयोगाच्या सिंहासनावर प्राणप्रतिष्ठित केली आहे! अशा या राजकारणशास्त्राचें धर्मस्वरूप, या वेळीं आमच्या देशबांधवांना जितकें लवकर पटेल तितकें पटल्यानेंच स्वदेशहित साधणार आहे! अशी भावना जागृत झाल्यानेंच हा—**लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश**—त्यांच्याच वर्षश्राद्धाच्या दिवशीं, त्यांच्याच स्फूर्तिदायक आज्ञेनें भारतवासी जनांपुढें आम्ही मांडीत आहोंत! हा **स्वर्गीय संदेश** लेखकाच्या हृदयांत अवतीर्ण कसा झाला यासंबंधानें, येथें फक्त **श्रीएकनाथमहाराजांच्या शब्दांत**—अंधासी सूर्य प्रसन्न। झालिया देखे तो निधान॥ तेंवी प्रकटोनी जनार्दन। हें गुह्यज्ञान बोलवी॥ असें वाचकांना प्रेमपूर्वक सांगून त्यांची रजा घेतों.

मिति आषाढ व. १
बुधवार शके १८४३.
पुणें, ता. २०।७।२१.

तिलक–संजय,
**लक्ष्मण नारायण जोशी.**





॥ श्री ॥

स्वधर्मावरील श्रद्धा, स्वदेशावरील प्रीति,

स्वदेशीचा अभिमान व स्वबांधवांची कळकळ

आणि

# राजकारणकुशलपरिचय

या अमोल सद्गुणांवर लुब्ध होऊन

हा

लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश

# महात्मा गाधी

यांस परमादरपूर्वक नम्रतेनें

अर्पण करितों.

लक्ष्मण नारायण जोशी व शंकर हरि मुळे.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

जैसा स्वभाव मायबाचा ।
अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।
तरी अधिक तियेचा ।
संतोष आथी ॥

ज्ञानेश्वर.

राष्ट्रदेवतेच्या प्रेरणेनें व मंगलमय प्रभूच्या दिव्य आशीर्वादानें आम्हीं हातीं घेतलेल्या राष्ट्रीय वाङ्मयप्रकाशनाच्या कार्यांत हळुहळूं यश येऊं लागलें आहे, ही उत्साहजनक गोष्ट होय! मनोविकार जागृत करणारें मनोरंजक वाङ्मय आपल्या मातृभाषेंत पुष्कळ प्रमाणांत प्रसिद्ध होत आहे, ही गोष्ट खरी; पण स्वराज्याच्या तहानेनें तळमळत असलेल्या व स्वातंत्र्याच्या अमृतबिंदूकरितां चातकाप्रमाणें वाट पाहात असलेल्या राष्ट्राची तृषा अशा वाङ्मयानें शांत होणें केव्हांच शक्य नाहीं. महात्मा गांधींच्या तेजोबलानें आपल्या राष्ट्रांत जी नवशक्ति उत्पन्न झाली आहे व पारतंत्र्याचीं बंधनें तटातट तोडून टाकण्याची सामान्य जनतेंतही जी अभिनंदनीय प्रवृत्ति दिसून येत आहे, ती प्रवृत्ति, तो उत्साह व तें तेज कायम ठेवण्याकरितां स्फूर्तिकारक वाङ्मयाचा आधार व त्या वाङ्मयाची प्राणप्रतिष्ठा होणें अत्यंत आवश्यक आहे. नवा व नवजीवन देणारा

तेजस्वी बालरवी ओळखून त्याला अर्घ्यप्रदान करण्याकरितां कर्तव्य-बुद्धीनें आम्ही विकारप्रधान वाङ्मयाचा धोपट मार्ग सोडून हा साहसी व कंटकमय असा विचारप्रधान मार्ग पत्करिला आहे व सर्वस्वी प्रतिकूल परिस्थिति असतांहि, आम्ही पंजाबप्रकरण भाग १।२, माझा कारागृहानुभव व महात्मा गांधींचे सामार्थ्यवान् विचार वगैरे पुस्तकें प्रसिद्ध करून, या कार्याचा उपक्रम केला व लोकाश्रयाच्या सहानुभूतीनें या उपक्रमाच्या यशस्वितेचीं उज्ज्वल चिन्हें दिसूं लागलीं व त्याच्याच बळावर आम्ही आज हा ' लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश-' आश्रयदात्यांना पोंचविण्यास समर्थ झालों आहों. लोकमान्यांच्या अंतःकरणांतील अंतरंगाशीं तादात्म्य होऊन, आपल्या सामर्थ्यावर श्री. लक्ष्मण नारायण जोशी या विद्वान् व कसलेल्या गृहस्थांनीं या संदेशाचा संग्रह केला आहे, इतकें सांगितलें म्हणजे पुस्तकाच्या महत्वाबद्दल निराळें सांगण्याचें कारण नाहीं. मुद्रणव्यवहारांतील अनंत अडचणी कायम असूनही, लोकमान्यांच्या महाराष्ट्रांत घरोघरीं त्यांचा ' संदेश ' पोंचला जावा या बुद्धीनें या १०० पृष्ठांच्या पुस्तकाची किंमत अवघी दहा आणे ठेवली आहे.

राजकारणाबद्दल महाराष्ट्राची प्रसिद्धी आहे व ही परंपरा कायम ठेवण्याकरितां राजकारणाबरोबरच त्यानें राष्ट्रीय वाङ्मय-प्रकाशनाच्या कार्यालाही सढळ हातानें मदत करणें जरूर आहे. आपली राष्ट्रीय जबाबदारी सध्यां शतपटीनें वाढली आहे. परकी भाषा सोडली तरी

देशी भाषेतील वाङ्मयाच्या शर्यतींत तरी आपल्यास मागें राहून चालणार नाहीं. ' आकाश अंत न कळोनिहि अंतरिक्षीं । आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी । या न्यायानें आम्ही कार्यास सुरवात केली आहे व महाराष्ट्रांतील विद्वान् लेखकवर्गाचेंही याला भरपूर सहाय्य आहे. ओजस्वी लेखक, उत्साही प्रकाशक आणि स्थाईक ग्राहक हा त्रिवेणीसंबंध जमून आल्यावर वाङ्मयप्रकाशनाचें पैलतीर गांठावयास आम्हांला काय उशीर लागणार ?

महाराष्ट्र-ग्रंथालय,
आषाढ शु॥ ११ शके १८४३.

महाराष्ट्रीयांचा कृपाभिलाषी,
शंकर हरि मुळे.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १. शान्तिमंत्र. .... .... .... | १. |
| २. संदेश-प्रवेश. .... ... .... | २. |
| ३. जनतेचें ध्येय. .... .... .... | ११. |
| ४. जनतेची प्रगति. ... .... .... | २०. |
| ५. राष्ट्रांची सनद. .... .... .... | २८. |
| ६. जगाची शांतता. .... .... .... | ३६. |
| ७. भूतकालीन लबाडी. .... .... | ४६. |
| ८. नाटकी विजय. .... .... .... | ५१. |
| ९. भावी सत्यता .... .... .... | ५७. |
| १०. गुलामागिरीचा अखेरचा दिवस.... .... | ६५ |
| ११. अखेरची काळ-रात. .... .... | ७५. |
| १२. भूतदयेची जागृति .... .... .... | ८१. |
| १३. स्वातंत्र्याचा सुप्रभात. .... .... | ८९. |


—:0:—

# लोकमान्यांचा

# स्वर्गीय

# संदेश.

सहनाववतु ।

सहनौभुनक्तु ।

सहवीर्यंकरवावहै ।

तेजस्विनावधीतमस्तुमाविद्विषावहे ।

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥

[ सगळे एकत्र जमूं या ! सहभोजन करूं या ! सगळे मिळून आपला पराक्रम दाखवूं या ! आपली बुद्धि तरतरीत असूं द्या ! परस्परांचा द्वेष करूं नका ! जगच्छान्ती असो ! जगच्छान्ती असो ! जगच्छान्ती असो ! ]

मत्प्रिय देशबांधवहो, हीं मागील पृष्ठावरील सहा वाक्यें नीट स्मरणांत ठेवून मी काय सांगतों आहें तें सावधान चित्तानें ऐका—

## —संदेश—प्रवेश—

खुषीनें म्हणा किंवा नाखुषीनें म्हणा, मानवी प्राणी, या पृथ्वीच्या पृष्ठभागावर समाजरचना करून राहतात ही गोष्ट कांहीं असत्य नाहीं. हे मानवी जातींतले समाज म्हणजे एक प्रकारच्या जिवंत व हालचाल करणाऱ्या सामाजिक व्यक्त्याच होत. अशा व्यक्तींचीं मनें, अद्यापि प्राण्यांच्या जीविताच्या आणि मनोधर्माच्या अथवा बुद्धीच्या विकासाच्या मर्यादेबाहेर दुर्दैवानें गेलेलीं नाहींत. हीं सामाजिक व्यक्तींचीं मंडळें जरीं आपणांला मोठीं सुसंस्कृत म्हणवितात, तरी तीं मानवी प्राण्यांचीं मंडळें आहेत असें मुळींच प्रत्ययाला येत नाहीं. तीं मंडळें रानटी प्राण्यांच्याही वर ताण करणारीं दिसत असून, त्यांच्यांपैकीं, ज्या व्यक्ति आपण फार सुधारलेल्या आहोंत असें भासविण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्या तर प्रत्यक्ष रक्तपाती अशा हिंस्र पशूंनाही लाजवीत आहेत.

अशा ज्या सामाजिक व्यक्ति त्या स्वतःला स्वतंत्र राष्ट्रें असें म्हणवीत असून, आपणांला जगानें कोणच्या स्वरूपांत ओळखिलें पाहिजे व आपले स्वभाव कोणच्या प्रकारचे आहेत त्याचें प्रदर्शन करण्यासाठींच त्या प्रत्येक राष्ट्रानें—कोणी आपल्या ध्वजावर सिंहाचें चित्र काढलें आहे! तर कोणी अस्वलाचें काढलें आहे, कोणी गरुडाच्या चित्रानें तें विभूषित केलें आहे, तर कोणी गिधाडाच्या चित्रांतच

आपला गौरव करून घेतला आहे! यावरून त्यांच्या स्वभावाचें हिंडिस असें रक्तपाती स्वरूप जगाच्या निदर्शनास येत नाहीं काय? आपापल्या ध्वजांवर अशा क्रूर प्राण्यांचीं जीं चित्रें त्यांनीं प्रदर्शित केलीं आहेत, त्यांत त्यांचा कांहीं तरी गुप्त हेतु असला पाहिजे यांत तिळमात्र संशय नाहीं! त्यांचे अंतरंग कसे आहेत हें तीं चित्रें दाखवीत आहेत!

अशा या राष्ट्रांचा आपापसांतला संबंध ठरवणारा जो कायदा प्रचलित आहे किंवा महायुद्धापूर्वीं अमलांत होता त्याला हिंस्र पशूंच्या आहाराचा म्हणजे दंडेलबाजीच्या जबरदस्तीचा कायदा अथवा युद्धाचा कायदा म्हणणेंच रास्त होणार आहे.

सध्यां तीं राष्ट्रें अशा कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडलीं आहेत कीं, त्यांनीं हिंस्र प्राण्यांच्या पलीकडचीं कृत्यें केल्यामुळें, आतां त्यांना मानवी धर्माची अपेक्षा वाटूं लागली आहे. एकमेकांचा हिंस्र पशूंसारखा रक्तपात करून क्रूर श्वापदांच्या पलीकडचा मान शान्तीदेवीकडून प्राप्त करून घेतल्यामुळें, आतां त्यांचीं मनें माणुसकीकडे व मानवाच्या खऱ्या नीतीकडे वळूं पाहात आहेत, पण त्यांत कांहींच अर्थ नाहीं.

मनुष्यें आणि त्यांच्या जाती यांचा एकच नैतिक कायदा असावा. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रांतल्या प्रत्येक व्यक्तीला जो कायदा लागू करतें, तोच कायदा राष्ट्रानें स्वतःला लावून घ्यावा हें बरें! याचा अर्थ असा कीं, त्या दोघांनींही त्या एकाच नैतिक कायद्याच्या अनुरोधानें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. एखाद्या व्यक्तीनें केलेलें कृत्य जर गुन्हा मानलें गेलें, तर तो गुन्हा राष्ट्राच्याही माथ्यावर बसला पाहिजे. जनरल डायर व ओडवायर यांच्या कृत्यांच्या दाखल्यानें

या म्हणण्याचा दाखला पटणार नाहीं काय? निरनिराळ्या व्यक्तींच्या ठिकाणीं असलेले–अप्पलपोटेपणा, लोभ, क्रौर्य, जबरदस्ती आणि खून करण्याची महत्त्वाकांक्षा वगैरे दुर्गुण–ज्या राष्ट्रांत बेअब्रूचे व दुष्ट मनोविकारांचे समजले जातात, अशा व्यक्तींच्या समुदायानें बनलेलें जें राष्ट्र त्याला असलीं कृत्यें अप्रतिष्ठेशिवाय कधींच करतां यावयाचीं नाहींत! एखाद्या राष्ट्राचा मान त्यांतल्या व्यक्तींच्या मानाहून भिन्न असा कोठें समजावा? भूतलावर एखादें राष्ट्र जर निर्दयतेनें अथवा पाशवी वृत्तीनें 'हम करे सो कायदा' या न्यायावर आरूढ होऊन रक्तपाताचीं, लूटमारींचीं आणि अनीतीचीं कृत्यें करून व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रतिष्ठेवर एकसारखे घाले घालील, तर त्या राष्ट्रानें आपल्या ठिकाणीं ती आपली प्रतिष्ठाच आहे असें समजून कांहीं कालपर्यंत तरी शस्त्रास्त्रांच्या साहाय्यावर तिचा बचाव करीत राहाण्यांत पुरुषार्थ तो कोणचा? व्यक्तीचा मान जसा बलावर अवलंबून नसतो, तसेंच राष्ट्राचेंही असतें. जसा जो आपल्या शक्तीचा उपयोग करील तसाच त्याला मान प्राप्त होत असतो. नुसतें श्रीमंत होण्यांत कांहीं मान नाहीं. ज्या बुद्धीनें व ज्या रीतीनें संपत्ति प्राप्त करून घेतली जाते व तिचा व्यय केला जातो, त्यावरच मानापमानाचें ओझें अवलंबून असतें. दुसऱ्यावर नुसती हुकमत चालवण्यानें मान मिळत नाहीं, तर स्वतःवर ती चालवण्यानें तो प्राप्त होतो. स्वतःप्रमाणें दुसऱ्याचा आदर ठेवण्यांतच खरी प्रतिष्ठा आहे.

प्रत्येक राष्ट्रांत जरी मानाचीं व प्रतिष्ठेचीं माणसें असतात, तरी कोणचें राष्ट्र मानासंबंधानें चुकयांच्या परंपरेच्या लोहशृंखलेंतून

सुटलेलें आहे ! अशी वस्तुस्थिति असतां, ज्या गोष्टींमुळें राष्ट्राची बेअब्रू व छीः थूः दुनियेंत होते, त्याबद्दल स्वतः ऐट मारण्याचें काम हीं राष्ट्रें रसातळाला मिळाल्यावांचून बंद करतील असें वाटत नाहीं.

प्रत्येक व्यक्तीनें आपलें वर्तन आदर्शभूत करण्याचा जसा प्रयत्न करणें योग्य आहे, तद्वतच राष्ट्रानेंही याच नियमाचें अवलंबन करायला नको काय ? प्रत्येक राष्ट्रानें आपलें आचरण असें ठेविलें पाहिजे कीं, त्याची प्रत्येक कृति व्यक्तीला खरी मार्गदर्शक होईल; पण ही संस्कृति सध्यां आचारांत कोठेंच दिसत नाहीं. राष्ट्राचीच जर अशी कृति दृष्टीस पडत नाहीं, तर त्यांतील एखाद्या व्यक्तीला गुन्हे-गार ठरवून तिला कडक शासन करण्याचा तरी राष्ट्राला अधिकार काय आहे ? अशा राष्ट्राला शोभणारेच त्यांतले गुन्हेगार असतात. ज्या राष्ट्राची जशी नैतिक दृष्टी असते तसेच त्यांतले गुन्हेगारही असतात.

जें राष्ट्र ज्या दर्जाच्या इमानीपणानें वागेल, त्यापेक्षां त्यांतील व्यक्तीनें तरी अधिक इमानानें कां वागावें ? ज्या कृत्यांबद्दल एखादें राष्ट्र आपल्याला वैभवी समजतें त्या कृत्याबद्दल इतर व्यक्ति जो तिरस्कार दाखवितात त्याचें कारण काय ? जीं कृत्यें राष्ट्रांतील व्यक्तींच्या ठिकाणीं अपकीर्तिकर अशीं मानिलीं जातात, तींच कृत्यें त्या राष्ट्रां-तील त्याच व्यक्तींनीं प्रत्यक्ष आपल्या मातृभूमीच्या नांवानें राजका-रणांत चालविलीं असतां तीं त्यांनीं कां सहन करावीं ? वास्तविक मातृभूमीनेंच नीतीचें उदाहरण घालून देणें रास्त आहे. निर्बलाला तिरस्कारानें वागविणें किंवा परावलंबीयांच्या विरुद्ध आपल्या शक्तीचा

उपयोग करणें ही गोष्ट जर बेशरमपणाची मानायची, तर तशीं कृत्यें राष्ट्रकार्यकर्त्यांनींही करतां कामा नयेत हें सिद्ध होत नाहीं काय?

राष्ट्रांतल्या एखाद्या व्यक्तीनें आपल्या शेजाऱ्यावर अचानक हल्ला करण्यासाठीं गुप्त हेर ठेवणें हें जर नीतीबाह्य व नीर्लज्जपणाचें कृत्य समजलें जातें,तर तसें कृत्य कोणच्याही राष्ट्रानें करणें अयोग्यच ठरतें. एखाद्यानें कपटानें, दहशतीनें अथवा जबरदस्तीनें पैका मिळविला, तर त्याच्याकडे तुच्छतेनें बघण्यांत येतें;पण एखाद्या राष्ट्रानें जर त्याच गोष्टीचा अवलंब केला, तर त्याला त्याची शरम वाटायला नको काय? खरा देशाभिमानी नागरिक असलीं कृत्यें कधींच चालूं देणार नाहीं व तीं त्याला कधींच आवडणारही नाहींत. आपल्या राष्ट्राचीं असलीं कृत्यें डोळे मिटून सहन करणारा, खरा नागरिक या पदावर आरूढ होण्यास नालायक असतो. जो आपल्याला नागरिक म्हणवीत असून असलीं कृत्यें बेलाशक चालूं देतो, तो तीं कृत्यें करणाऱ्यांचा सांथीदारच समजला पाहिजे; पण जो तशीं कृत्यें चालू देण्याच्या मार्गांत अडथळा आणतो तो त्या कृत्यांचा पुरस्कर्ता अथवा सांथीदार न ठरतां, राष्ट्राच्या राज्यकर्त्यांच्या अप्रीतींतला ठरून, त्याबद्दल त्या निर्लज्ज राजकर्त्यांच्याकडून त्याला अनपेक्षित असें शासन मिळतें.

स्वदेशाभिमान हा ज्याचा त्याला असणें अगदीं स्वाभाविक आहे व जो तो आपापल्यापरी तो व्यक्तही करीत असतो. स्वदेशाभिमानाचा दर्जा उच्चतर मानलाच पाहिजे व त्याची प्रौढीही गाणें योग्यच आहे. देशाभिमानाची गोष्ट यःकश्चित न मानतां, तिला नेववेल तितक्या उन्नतीला नेऊन पोंचवली पाहिजे. परावलंबनांत

सौख्य मानणारे कांहीं या गोष्टीला हलकी व अडाणी मताची मानतात, त्याला त्यांचा इलाज नाहीं; कारण ते आयतखाऊ बनलेले परान्नपुष्ट असतात.

आपली जन्मभूमी हीच आपली मुख्य माता असल्याकारणानें—ती पशुतुल्य, दुष्ट, अनीतिमान, खोटी व चोरटी असावी असें तिच्या खऱ्या सत्पुत्राला कधीं तरी वाटेल काय ? जी भूमी अशा सत्पुत्रांनीं प्रपूरित नसते तिला व तिच्या पुत्रांना काय नांव द्यावें व कोणच्या विशेषणांनीं त्यांचा व तिचा गौरव करावा, हें स्पष्ट सांगण्याचें कारणच नाहीं.

असें जरी आहे तरी, अशा त्या अनीतिमान भूमातेच्या अनीतिमान पुत्रांतही असे कांहीं देशाभिमानी सत्पुत्र आढळतात कीं, त्यांच्याच्यानें आपल्या मातेचें व देशबांधवांचें तें नीच वर्तन सहन होत नाहीं. ज्यांची देशमाता—ज्या आपल्या पुत्रांना—दुसऱ्यांचे मुलुख व मालमत्ता लुबाडण्याचा धडा देते, कमजोर व शस्त्रास्त्रांच्या बाबतींत हीन स्थितींत असलेल्या राष्ट्रांवर जबरदस्ती करण्याचा जेंव्हां ती उपदेश करते, इतकेंच नव्हे तर त्या राष्ट्रांतील मूळच्या रहिवाशांची सर्रहा कत्तल करण्याचीही जेंव्हा ती आज्ञा सोडते आणि परकीयांचे हक्क जबरदस्तीनें गुंडाळून ठेवून, त्यांना गुलाम बनविण्याची जेंव्हा सल्ला देते—तेंव्हा ती आपल्या अभिमानानें तट्ट फुगून जाऊन, तीं कृत्यें तिच्या ज्या लेंकरानीं केलीं असतील त्यांचा ती गौरव करते व तशीं कृत्यें करण्यास अडथळा आणूं पाहणाऱ्यांचा धिःकार करते. त्या तिच्या लेंकरांचा तिला त्यावेळीं जसा अभिमान वाटतो तसा पुन्हा केंव्हाच वाटत नाहीं. अशा तऱ्हेचीं कृत्यें करणारे जे आप-

त्याला स्वदेशभक्त समजतात, ते असल्या अनैसर्गिक व अनीतीच्या कृत्यांबद्दल शरमेनें ठार न होतां, उलट गर्वोद्धतेनें प्रतिष्ठितपणें भूपृष्ठावर मिरवतांना दृष्टीस पडतात व त्यांची ती भूमाताही आपल्या—पुत्रांचे ते गुन्हे न समजतां सत्कृत्येंच मानिते.

शिकारी कुत्र्यांप्रमाणें आपल्या पुत्रांना रक्ताची पिपासा उत्पन्न करून, त्यांच्याकडून दुसऱ्यांचे खून करवणें व त्यांची संपत्ति निंद्य अशा बलात्कारानें व फसवेगिरीनें हरण करून घेऊन वैभवी बनणें, म्हणजे देशाभिमानी पुत्र प्रसवणें नव्हे! खरा देशाभिमान या गोष्टींत नसतो! शिकारी कुत्रा जसें एखादें नवें भक्ष्य पकडून आणून आपल्या धन्यापुढें ठेवतो व धन्याकडून शाबासकी मिळवितो, त्याप्रमाणेंच दुसऱ्याचें सर्वस्व, आपल्या जबरदस्त कपटानें पसरलेल्या भुजपंजरांत पकडून जे कोणी ती लूट आपल्या मातृभूमीच्या पदकमलीं समर्पण करतात, ते देशाभिमानी या विशेषणाला नैसर्गिक नीतीनें कधींच पात्र व्हायचे नाहींत व होतही नाहींत. अशांना शत्रु उत्पन्न झाल्याशिवाय कसे बरें राहतील ?

अशीं नीचतर कृत्यें करूनही जे त्याबद्दल पश्चातापी होण्याच्या ऐवजीं गर्वानें ताठून जातात व अशांचीं तीं कृत्यें लक्षांत घेऊन जे शरमेनें आपलीं तोंडें खालीं करतात तेच खरे देशभक्त! दुसऱ्यांच्या संपत्तीचें कपटानें हरण करून आपली मातृभूमी श्रीमंत झालेली पाहण्यांत ज्यांना दुःख होतें तेच खरे देशभक्त! अशा देशभक्तांना, त्यांची मातृभूमी, तशी त्या परवित्तापहारानें गबर झालेली पाहून तिचें तें कपटी वैभव त्यांना दारिद्र्याच्या स्वरूपांत दिसूं लागतें व

नैतिकदृष्ट्या तीं कंगाल दशेंत खितपत पडली आहे असें ते मानितात. आपल्या मातृभूमीचा जगतांत कोणच्याही तऱ्हेनें मानभंग होऊन तिच्या उज्वल मुखाची कांती रक्तमांसाच्या चिखलानें दूषित न होतां, तिचें इमान व शुद्धता हीं निष्कलंक राहावींत अशी इच्छा करणारे देशाभिमानी लोक राष्ट्रांत नसतात असे नाहीं! प्रत्येक राष्ट्रांत असे देशाभिमानी जरी असतात, तरी ते अल्पसंख्यांकच असतात ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे.

या गोष्टी मूलभूत असून, तीं जणूं काय अगदीं साध्या व सर्वसाधारण नैतिक नियमांचीं गहन तत्वेंच आहेत यांत संशय नाहीं. आमची भरतभूमी एके काळीं मोठ्या संस्कृतीच्या शिखरावर देदीप्यमान झाली होती, अशा लब्धप्रतिष्ठेच्या भूतकालीन गोष्टी आतां वर्तमानकाळीं सांगत बसण्यांत अर्थ नाहीं! चक्रनेमिक्रमानें आमच्या सध्यांच्या स्थितींत प्रत्येक राष्ट्राला केव्हां तरी जावें लागणारच आहे. सध्यां जगतीतलावर जीं राष्ट्रें स्वतःला सुसंस्कृत म्हणवून घेत आहेत व आम्हांला स्वराज्याला अपात्र ठरविण्याचा प्रयत्न करून आपल्या मातृभूमीचा अप्पलपोटेपणा दाखवीत आहेत, तीं राष्ट्रें–खरें पाहिलें असतां, त्यांच्या रक्तपाती स्वभावावरून, अद्यापी निःसंशय रानटी हिंस्र पशूंच्याच स्थितींत आहेत यांत मुळींच संशय नाहीं. ही जगाची अनिष्ट स्थिति सुधारण्यास आतां आरंभापासूनच सुरुवात झाली पाहिजे. कोणीही पहिला धडा चुकतां उपयोगी नाहीं. खरी प्रगती यांतच होणार आहे.

प्रत्येक कुटुंबांत जसा एक अध्वर्यु असतो, तो आपल्या कुटुंबासह जसा गांवांत राहतो, तें गांव जसें प्रांतांत असतें, तो प्रांत जसा देशांत असतो व तो देश जसें एक स्वतंत्र राष्ट्र असतें, त्याप्रमाणेंच आपल्या भारतभूला आतां आपण स्वतंत्र राष्ट्रांच्या पंक्तींत गोंवण्याची खटपट करण्यास आपल्या जीवांची पर्वा करतां उपयोगी नाहीं.

आपला देह हा आपल्या स्वतःसाठीं नसून, आपल्यापुढें जें एक मोठें ध्येय आहे त्यासाठीं आहे असें समजून, आपलें जिवंत राहणें हें त्या ध्येयाची प्राप्ती करून घेण्यासाठींच यापुढें समजलें पाहिजे. राष्ट्राचा व मानवी जातीचा नैतिक कायदा याच तत्वानें रक्षण केला जाऊन, याच गोष्टीनें जगाची शांतता प्रस्थापित होणार आहे. जगांत शांतता नांदण्यास याशिवाय दुसरा उपायच नाहीं। ईश्वरी महत्त्वाचें हें जें ध्येय तेंच सर्व मानवजातीचें खरें ध्येय आहे. सध्या पाश्चिमात्य मुत्सद्यांनीं जे शांततेचे उपाय म्हणून योजिले आहेत त्यांत त्यांचा स्वार्थ लपून बसलेला असल्यामुळें, ते खऱ्या शांततेचे नाहींत असें त्यांना समजून चुकलें असतांही, स्वार्थाची मगरमिठी सोडण्याची त्यांची लालसा सुटत नाहीं व त्यामुळेंच जगाला त्यांच्या उपाययोजनेपासून खरी शांतता मिळणारी नाहीं. वर जो शांततेचा एकच उपाय सुचविला आहे तोच खरा आहे असें त्या मुत्सद्यांना जसें अंतर्यामीं पटलें आहे, तसेंच हें विधान यापुढें सर्व जगालाही पटल्यावांचून राहाणार नाहीं हें खास ! या सूचित एकच उपायावांचून जे जे म्हणून इतर उपाय अमलांत आणिले

जातील त्या सर्वांपासून नाश झाल्यावांचून कधींही राहायचा नाहीं. जनतेचा खरा कायदा हाच होय.

## —जनतेचें ध्येय—

एखाद्या माणसाचा काय किंवा एखाद्या राष्ट्राचा काय—मोठेपणा हा त्याच्या ध्येयाच्या थोरपणानें जरी मोजायचा असतो, तरी तें त्याच्या ध्येयाचें तत्व अनुभवाला आलें पाहिजे ही त्यांत शर्त असते! कारण, पुष्कळ वेळां असें अनुभवाला येतें कीं, ध्येयाचें तत्व मानलें गेलें असतें एक व प्रत्यक्ष कृतींत तें उतरलेलें दिसतें त्याच्या विरुद्ध दिशेचें! ह्याचें प्रत्यक्षप्रमाण हवें असल्यास प्रे. वुइल्सनचीं शांतताप्रस्थापित करणारीं अमूल्य चौदा तत्वरत्नेंच घ्या! युरोपांतल्या मुत्सद्यांनीं तीं सर्व तत्वें धाब्यावर बसवून, त्यांचा शांततेच्या तहांत मागमूसही न राहूं दिल्याकारणानेंच सांप्रतची स्थिति युरोपाला प्राप्त झाली आहे व त्यामुळेंच जगभर वणवा पेटूं लागला आहे.

सध्यां जीर्णोद्धार होत असलेल्या जगाचीं पूर्वींचीं तत्वें अशीं होतीं व तीं होतीं त्यापेक्षां भूतदयेच्या साम्राज्यांत कधींच अधिक उदारतेनें प्रकाशित झालीं नाहींत. याचीं कारणें जरी अनेक असलीं, तरी मुख्यत्वें तीं सर्व एकाच कारणपंचकांत अंतर्भूत होतात. स्वातंत्र्य, न्याय, शस्त्र, प्रगति व सुधारणा ही ती कारणपंचकडी होय!

जीं राष्ट्रें स्वतःला थोर व भाग्यशाली समजतात, त्यांनीं स्वातंत्र्याचा उपयोग आजवर कसा केला हें जर पाहूं लागलों, तर असें आढ-

ऊन येईल कीं, त्या स्वातंत्र्याचा त्यांना जणुं काय स्वतःपुरताच मक्ता मिळाला होता व त्यामुळें तीं राष्ट्रें त्याचा हवातसा उपयोग करून घेण्यासाठीं, दुसऱ्यांना त्यांतला एक अंशही घेऊं देण्याच्या आड येण्याची रात्रंदिवस काळजीपूर्वक खटपट करीत होतीं. जगाला गुलामगिरींत राबवण्याची त्यांनां मोकळीक पाहिजे म्हणूनच तीं स्वतंत्र राष्ट्रें आपल्या स्वातंत्र्याचा हवातसा जबरदस्तीनें उपभोग घेत आहेत; पण आतां हें त्यांचें वर्तन यापुढें फार वेळ टिकणें शक्य नाहीं !

न्यायाचीहि त्यांनीं अशींच विटंबना केलेली दृष्टीस पडते. स्वतःच्या मतलबाच्या हमीपेक्षां त्यांनीं न्यायाचा अधिक उदारतेनें उपयोग केलेला कोठेंच दिसत नाहीं. दुसऱ्यांचे हक्क त्यांनीं जबरदस्तीच्या मापानें मोजण्याची आपली वहिवाटच जणूं काय प्रस्थापित करण्याचा मक्ता आपल्याच हातांनीं आपणच घेतला आहे.

स्वतःच्या इच्छा पुरविण्याचें साधन म्हणूनच त्यांनीं शास्त्रीय शोधांचा उपयोग करून घेतलेला प्रत्ययाला येतो. भविष्यत्कालीन इतिहास त्यांच्या या अपमतलबाच्या बाबतींत असें खास लिहील कीं, त्या राष्ट्रांनीं पुष्कळ ज्ञान संपादन केलें होतें खरें, पण त्याचा त्यांनीं दुरुपयोग केला ! अहंपणानें व ताठ्यानें दुसऱ्यांवर अंमल चलविणें यांतच त्यांनीं प्रगतीचा उपयोग करून, तिला आपलें उपयोगी शस्त्र बनविलें; पण तें त्यांचें शस्त्र अखेरीस निर्जिव साधनाप्रमाणेंच त्यांच्या उपयोगी पडलें.

आपले अत्यंत निंद्य उद्योग झांकून टाकण्यासाठीं त्यांनीं कपटाचें पांघरूण घेऊन त्याखालीं—बंदुका, तोफा व इतर शस्त्रास्त्रें निर्माण केलीं आणि अशा तऱ्हेनें मानवांचे कसाईखाने उभारण्यांत त्यांनीं सुधारणेचा स्वार्थासाठीं जो उपयोग करून घेतला त्याचेंच प्रत्यक्ष प्रमाण युरोपांतलें महायुद्ध हें होय !

तीं राष्ट्रें भूतदयेला—आपल्या स्वार्थाचें साधन व नफा मिळविण्याचा बाजार समजून, इतर राष्ट्रांना क्रयविक्रयाचा माल व स्वतःसाठीं पोसलीं जाणारीं गुरेंढोरें असें मानूं लागलीं व मानितात. यामुळेंच भाषेंतल्या सर्व बिनमोल शब्दांचें उज्वल व निष्कलंक तेज पालटून त्या तेजाचा रंग रक्तबंबाळ अशा प्रचंड वणव्याच्या प्रखर ज्वालांप्रमाणें झालेला दृष्टीस पडतो आहे. मोठेपणा हेंच जरी लोकांचें जुनें तत्त्व होतें, तरी तें संकुचित होतें. कारण, ती त्यांची मोठेपणाची हाव संपत्तीच्या प्राप्तीपुरतीच होती. जी गोष्ट मोजतां येणार नाहीं अशी त्यांच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नींहि नव्हती.

संपत्तीनें सत्ता प्राप्त होते व सत्तेनें संपत्ति प्राप्त होते असें बीजतत्व असल्यामुळेंच संपत्ती व सत्ता यांतच मोठेपणा आहे अशी त्यांची ठाम समजूत होती आणि त्या समजुतीप्रमाणें संपत्ती व सत्ता यांनीं मोठें होण्याची त्यांची इच्छा होती. मुलुख व त्याचा मोठा विस्तार यांवरच त्यांचा मोठेपणा असे. कारण, मुलूख ताब्यांत असले म्हणजे सत्ता व संपत्ती यांची प्राप्ती होते व यास्तव, त्या जोडीची प्राप्ति

करून घेण्यासाठीं, म्हणजे आपमतलब साधण्यासाठीं, ते हवें तें करीत. प्रत्यक्ष स्वतःच्या जीवाचाही त्याग करण्यास ते भीत नसत.

ह्या त्या खटपटी व लटपटी करून विजय मिळविणें आणि दुसऱ्यांचे देश पादाक्रांत करून आपल्या पंजांत ओढणें हाच त्यांचा आजवर क्रम असे. हा क्रम त्यांनीं शेवटास नेऊन आपसांत पृथ्वीची वांटणी करून घेतली. यापेक्षां ते अधिक तें काय काय बरें करणार? फार तर, हिस्सेदार कमी करून ते फेरवांटणी करूं शकतील! हल्लीं पाश्चिमात्य राष्ट्रांचे जे प्रयत्न चालले आहेत ते असेच आहेत. जबरदस्तीनें एकमेकांमधून मार्ग काढून आपलें महत्व वाढविण्याचेच हल्लींचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

याप्रमाणें, सांपत्तिक व मुलखाच्या विस्ताराची हांव पुरी न होणारीं राष्ट्रें जोंपर्यंत पृथ्वीवर विद्यमान असूं शकतील, तोंपर्यंत त्यांना वारंवार रक्तबंबाळ करणारी त्यांच्या मोहाची त्यांची ग्रहदशा सुटणें अशक्य आहे. लढतांना समोरासमोर अखेरीस जरी अवघीं दोनच राष्ट्रें जगावर राहिलीं, तरी तीं सुद्धां एकमेकांचा प्राण घेण्याचीच जबर कालसा धरतील व अखेरीस तीं दोन्ही मरून जातील! या प्रकाराची त्यांना कधीं किळस येईल ती येवो! युनायटेड स्टेटस्सारख्या सभ्यांच्या राष्ट्राला ह्या प्रकारचा पूर्ण कंटाळा येऊन त्यानें जरी हा प्रकार बंद पाडण्यासाठीं प्रे. वुइल्सनच्या तोंडून शांतीपाठाचे चौदा मंगलपाठ गावविले, तरी युरोपांतल्या राष्ट्रांना, त्या आपल्या पूर्वपरिचित वहिवाटीच्या हक्कांपासून अलग होण्याची

इच्छा होत नाहीं, यांतलें वर्म संपत्ती व सत्ता या स्वार्थांतच आहे व त्या स्वार्थाची हांव, तीं विद्यमान राष्ट्रें जेव्हां कधींकाळीं पूर्वींच्या साम्राज्यांप्रमाणें नामशेष होतील, तेव्हांच त्यांच्याबरोबर नष्ट होणारी आहे असें त्यांच्या चालू वर्तणुकीवरून अनुमान काढतां येतें.

वैभवशाली म्हणून जीं साम्राज्यें या भूतलावर गतकालीं होऊन गेलीं व ज्यांच्या कांहीं विशिष्ट खुणाही अद्यापि दूरवर पसरलेल्या दृग्गोचर होत आहेत, त्यांचा जरी सध्यां बेपत्ता आहे, तरी त्यांचाच कित्ता हल्लींचीं साम्राज्यें गिरवीत आहेत. सत्तेच्या वेडानें व मतलबी लोभानें सध्यांचीं राष्ट्रें अगदीं वहकून गेलीं आहेत हें अद्यापि त्यांच्या लक्षांत येत नाहीं, हें त्यांचें दुर्दैव आणि गुलामगिरीचें सुदैव होय !

सध्यांच्या प्रचंड वसाहतीराज्यांप्रमाणेंच पूर्वीही सांपत्तिक वैभवाचें प्रसृत राज्य ह्या भूमीवर होतें व तें योग्यही होतें; कारण मानवी जातीला राज्य हवेंच असतें. सध्यांच्या साम्राज्यांप्रमाणें त्याचें ध्येयही—संपत्ति, सत्ता व विस्तृत प्रदेशाचा ताबा अशा प्रकारचें संकुचित ध्येय असल्यामुळेंच त्यानें अखेरीस त्याखालींच स्वतःला चिरडून घेतलें.सृष्टीची अथवा निसर्गाची इच्छा उन्नतीकडे जाण्याची असल्यामुळें, राष्ट्रांनां उच्चतम अशा नैतिक उन्नतीवरच नेऊन बसविण्याची तें इच्छा करीत असतें; पण तें उच्चतत्व जीं राष्ट्रें ओळखीत नाहींत,त्यांची अखेर वरील राज्याप्रमाणें नामशेषत्वांत होते हें ठरलेलेंच आहे ! जीं राष्ट्रें निसर्गाची इच्छा ओळखून तदनुवर्ती होतील तींच जिवंत राहणें शक्य आहे.

मोठेपणा मोजण्याचें खरें माप राज्याचा प्रचंड विस्तार हें नसतें! एकरबिघ्यांनीं तो कधींच मोजतां यायचा नाहीं. एखाद्या साम्राज्याचा मोठेपणा त्याच्या विस्तृतपणावर नसून, तो त्याच्या नैतिक उच्चतेंत असतो. साम्राज्याच्या मुलुखाचा विस्तार जरी प्रचंड प्रमाणांत असला, तरी त्यांतल्या स्त्रीपुरुषांची जर नैतिक उन्नती झालेली नसेल, तर त्या साम्राज्याच्या मुलुखाच्या विस्ताराचा तो विस्तृतपणा व्यर्थ होय! स्त्रीपुरुषांची नैतिक उन्नती म्हणजे प्रजावर्धन नसून, त्यांच्या नैतिक आचरणांत ती असते! जें राष्ट्र भूतदयेच्या तत्वांत उच्च दर्जाला पोंचलेलें असतें तेंच खऱ्या वैभवी मोठेपणाला शोभतें; मग तशा त्या देशाच्या अथवा राष्ट्राच्या सरहद्दी कितीहि संकुचित असोत अथवा विस्तारलेल्या असोत.

समजा कीं, एक राष्ट्र अगदीं लहान पण उदार व सुंदर आहे व दुसरें हल्लींच्या प्रचंड साम्राज्यासारखें आपमतलबी व भूतदयाहीन आहे, तर त्यांपैकीं पहिल्या छोट्या पण उदार आणि भूतदयायुक्त राज्यांतला नागरिक होण्याचें कोणाला बरें आवडणार नाहीं? रामराज्य किंवा रावणराज्य, अथवा प्लेटोचें ऍथेन्स किंवा क्यालिगोलाचें रोम या दोन जोड्यांपैकीं अनुक्रमें पहिलीं दोन राज्यें वास्तव्याला कोण बरें नापसंत करील?

संपत्तीनें गबर होणें हें कांहीं खरें तत्व नव्हे! राष्ट्राची किंमत कांहीं संपत्तीनें वाढत नसते! राष्ट्रांत सर्वत्र चमकणाऱ्या सोन्यांत राष्ट्राची खरी किंमत नसून, ती त्याच्या न्यायबुद्धीच्या बुद्धिप्रभावाच्या प्रकाशावर अवलंबून असते. सर्व मानवी जातीच्या खजीन्यांत ज्याच्या योगानें

सर्व मानवी हिताची भर पडेल तेंच राष्ट्राचें खरें धन होय! जें राष्ट्र नैतिक प्रगतीचें एखादें नवें तत्व शोधून काढतें अथवा जीवनाची एखादी अधिक उन्नत रीति घालून देतें तेंच राष्ट्र खरें श्रीमंत जाणावें! ज्या वस्तु अस्तित्वांत आहेत, त्याच वस्तूंची जगांत लूटमार करून त्यांचे ढीग आपल्या राज्यांत करणारें कोणचेंहि राष्ट्र धनवान मानतां येत नाहीं! ज्या हितकर वस्तु अस्तित्वांत नाहींत अशा नव्या वस्तु निर्माण करून, मानवी जातीचें हित करण्यानें व मानवी जातीच्या सदसद्विवेकबुद्धीचा फैलाव करण्यानेंच राष्ट्राला खरी संपत्ति प्राप्त होते!

संपत्तीप्रमाणेंच सत्ता हेंही कांहीं तत्व नव्हे. मानवजातीला जी सत्ता सुख देते तीच खरी सत्ता होय! सैन्यें व त्यांना दिलेलीं शस्त्रास्त्रें यांच्या बळावर कांहीं सत्ता अवलंबून नसते! खरा टिकाऊ जय म्हणजे मानसिक व आत्मिक उन्नतीचाच होय. अशाच त्या खऱ्या जयाचें तेज सर्वत्र फांकलें पाहिजे. जगाला ज्ञानी करून सोडण्यांतच राष्ट्राचें खरें वैभव असतें!

बळ, संपत्ती व मुलुखाचा विस्तार या गोष्टी मोठ्या चांगल्या व थोर जरी असल्या, तरी त्यांचा तो चांगुलपणा, ज्या मानानें त्या उच्च तत्वाला मदत करतील त्या मानानेंच असतो. राष्ट्राराष्ट्रांत चालणारी स्पर्धासुद्धां ती जेव्हां उच्च तत्वाचा मान मिळविण्यासाठीं सुरू असते तेव्हांच फलद्रूप होते.

श्रेष्ठतत्व निरपेक्ष स्वरूपाचें असून, तें राष्ट्रांच्या अपरिमित हितार्चे असतांनाही तें निरपेक्ष असल्यामुळेंच राष्ट्रांना स्वहिताच्या विरुद्ध दिसतें.

भविष्यत् कालानें ज्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा विचार केला आहे, त्यालाच तत्व म्हटलें पाहिजे. कारण आजचें तत्व उद्यां प्रत्ययाला यावचें असतें. जें राष्ट्र ज्या मानानें तें तत्व आपल्या कृतींत उतरविण्याचा प्रयत्न करतें, त्याच मानाचे त्याला भावी काळाचे डोहाळे होत असतात. तें आपलें भविष्य ठरवूनच त्याच्या तयारीला लागतें. स्वातंत्र्य, न्याय व प्रगती हीं त्याला ज्या मानानें प्रत्यक्ष कृतींत उतरलेलीं दिसतील, त्याच मानानें त्याला स्वानुभव येतो. याच्या उलट दिशेनें पाहूं लागल्यास असें स्पष्ट दिसूं लागतें कीं, जेव्हां एखादें राष्ट्र वरील गोष्टींकडे दुर्लक्ष करून, त्यांपासून पराङ्मुख होतें व स्वार्थाच्या आपमतलबी हिताच्या पाठीस लागतें, तेव्हां तें अशा अनुभवालाही पारखें होऊन, भविष्यकाळाशीं त्याचा कलह सुरू होतो. असा कलह सुरू झाला म्हणजे राष्ट्र कितीही सामर्थ्यवान् असलें तरी अखेर त्याचा नाश व्हायचा हें ठरलेलेंच असतें. आजपर्यंत जीं मोठालीं साम्राज्यें लयाला गेलीं आहेत त्याचें मुख्य कारण त्यांचा अपमतलब व भूतदयेशीं फारकत हेंच एक होय. प्रस्तुतकालीं जीं साम्राज्यें लयाला गेलीं आहेत त्याचे मुख्य कारण त्यांच्या अपमतलबाच्या ध्येयाशिवाय दुसरें कांहीं जाणत नाहीं. त्यांचीही तशीच दशा होणार हें निश्चित आहे.

मानवी जातीची सेवा करणारेंच राष्ट्र दीर्घकाळ जिवंत राहतें. तें स्वतःसाठीं जिवंत राहात नसून भूतदयेच्या प्रभावानेंच जिवंत राहतें. ज्या राष्ट्रानें भूतदयेचा परित्याग केला तें नष्टदशेला जातें. एखाद्या राष्ट्रानें स्वतःपुरताच जरी विचार केला, त्यानें स्वतःचें हित तेवढेंच जरी साधलें तरी तें हित, ज्या मानानें मानवी जातीचा फायदा न कळत साधतें त्या मानानेंच मानवी जात त्याची कृति सहन करते; पण जेव्हां तें मानवी जातीच्या उपयोगी पडण्यापासून परांङ्मुख होतें, तेव्हां जें ज्या आश्रयावर उभें असतें तो त्याचा आश्रय त्याच्या पायांखालून निघून जातो; कारण तें त्याचें वर्तन मानवी जातीला नापसंत झालेलें असतें.

पाश्चिमात्य राष्ट्रांची भयंकर आणि विचित्र कर्मगति जे कायदे आज त्यांना शिकवून राहिली आहे त्या कायद्यांचें खरें स्वरूप पुढें त्यांच्या लक्षांत येणार आहे! त्या कायद्यांचें उल्लंघन करण्याइतकें कोणचेंही राष्ट्र मूर्ख बनणार नाहीं. पण प्रश्न एवढाच आहे कीं, ते कायदे समजण्याचें शहाणपण अंगीं धरून, त्यांचा प्रत्यक्ष कृतींत उत्तरविण्याचा मान मिळवण्याच्या कामांत कोणच्या राष्ट्राला पहिल्या प्रतीचा मान मिळेल! स्वकृतीच्या उत्तमपणाचें उदाहरण इतरांस घालून देण्यास प्रथमतः कोणची मानवी जात पुढें येऊन आपल्याला धन्य करून घेईल ती घेवो! वास्तविक हा मान आर्यभूच्या लेकरांचा प्राचीन काळापासून असता, तो जरी दैवदुर्विपाकानें आज हरपल्यासारखा झाला आहे, तरी त्याचा-शोध करून, त्याच्या

प्तीनें भरतभूच्या लेंकरांनीं वैभवी झालें पाहिजे. कारण तो त्याचा आजपर्यंतचा हक्कच आहे व तो गेलेला हक्क परत मिळवण्याचा रुव्यां काळही आज्ञा आहे. सर्वोत्तम असें भूतदयेचें जें तत्व त्याचा सर्व आयुष्यभर जे निःस्वार्थबुद्धीनें अंगिकार करतील आणि त्याचा तत्वाच्या आश्रयावर भविष्यत् काळाला आपलासा करून घेतील तेच धन्यता पावतील.

## —जनतेची प्रगती—

शेंकडों निरनिराळ्या देशांनीं जो या पृथ्वीचा भाग व्यापला आहे ते देश म्हणजे या पृथ्वीचे निरनिराळे परगणेच असून, त्यांत राहणारे मानवी प्राणी हीं एक समुच्चयाची शेंकडों कुटुंबेंच होत; पण ही कल्पनाहीं कोणाच्या ध्यानांत येत नसल्यामुळें, जो तो आपल्या पुरतेंच पाहात असतो.

खरें पाहिलें तर या लोकांपैकीं बहुतेक लोक आपल्याशिवाय दुसरे लोक जगांत आहेत किंवा काय याबद्दल पर्वाही करीत नाहींत. एकत्र समाज करून राहण्याचा विचार त्यांना स्पर्शही करीत नाहीं. प्रत्येक-जण आपल्या विशिष्ट जीवितापुरताच विचार करतो व दुसऱ्यां-पासून आपल्या इच्छित सुखांत बाध येऊं नये असें इच्छितो. स्वतः-च्या संवर्द्धका जी परिस्थिति अनुकूल असेल तिला ते प्रगती या नांवानें संबोधितात. अशा तऱ्हेच्या स्वभावाच्या लोकांनीं या पृथ्वीचे निरनिराळे भाग व्यापिलेले आहेत.

अशा लोकांपैकीं कांहीं समुदाय असे आहेत कीं, त्यांची ओळख स्वतःच्या भागापुरतीच त्यांना नसून फार दूरवरच्या जगाच्या भागांत ती पसरलेली असते. अशा जनांचा अहंभाव फक्त स्वतःपुरताच नसून जगांतल्या इतर भागांची काय परिस्थिति आहे, ती जाणण्याचीहीं त्यांची इच्छा असते; कारण, त्या भागांत आपला हितसंबंध ठेवण्याची ते इच्छा करीत असतात. जगाच्या प्रत्येक हालचालींत ते भाग घेतात व त्यापासून आपला फायदाही ते करून घेतल्यावांचून राहात नाहींत. अशा लोकांचे समुदाय हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेही भरपूर नाहींत, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. असे हे अल्प समुदाय साध्याभोळ्या स्वभावांचे नसून, त्यांत निरनिराळे लोक अत्यान्त विलक्षण प्रकृतींचे सांपडतात. अशा या संघांचें दूरच्या लोकांशीं संघट्टण होत असल्यामुळें, त्यांच्या हितसंबंधांचा परस्परांत असा योग घडून येतो कीं, त्यांतले कांहीं संघ आपसांत वैरी बनलेले असतात व कांहीं मैत्रीनें बांधले गेलेले असतात. याचा परिणाम असा होतो कीं, त्यांच्या आपापसांतल्या विरोधानें अथवा स्पर्धेनें ते निरनिराळे कटवाले बनलेले दृष्टीस पडतात. हेच कटवाले म्हणजे मोठमोठ्या राष्ट्रांचे निरनिराळे आपसांत स्पर्धा करणारे छोटे छोटे संघ अथवा मित्र–राष्ट्रें होत. अशा कटांतल्या जनतेच्या आकांक्षांनां अनुकूल होण्यालाच ते लोक प्रगति हें नांव देतात.

वर निर्दिष्ट केलेले कट हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत ही गोष्ट इतरांच्या सुदैवाची आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; कारण,

स्थितींत जोंपर्यंत राहतील, तोंपर्यंत ' लांडगा व कोंकरूं ' या न्यायानें बलवान् निर्बलांचे बळी घेत रहाणार हें जरी सत्य असलें, तरी बलवान् राष्ट्र सदोदित कोणचें टिकणार ? हा प्रश्न उरतोच.

सध्यां राष्ट्रांना जो अहंभाव नानाप्रकारचे खेळ खेळायला लावून आपसांत झुंजायला प्रोत्साहन देतो आहे, तोच त्यांना हिंस्र प्राण्यापेक्षां वरच्या दर्जाचें न होऊं देण्याचीही खबरदारी घेऊन राहिला आणि म्हणूनच त्यांचे डोळे उघडून तीं राष्ट्रें अद्यापी खऱ्या मानवी स्वभावांत येत नाहींत. असें आहे तरी, गेल्या महायुद्धानें तो त्यांचा अहंभाव आतां जरासा जिरला असून तोच त्यांना आतां मानवी स्थितींत नेऊन पोंचवण्यास मदत करूं लागला आहे असें तुरळक दिसूं लागलें आहे. उदाहरणार्थ--अहंमन्यतेनें तट्ट फुगलेलीं जीं राष्ट्रें कांहीं काळापूर्वीं पशुतुल्य बेबंदशाहीचें स्वैरवर्तन करीत होतीं, तो त्यांचा दुर्गुण सध्यां त्यांच्यापासून जरासा दूर होऊन, एकमेकांना मदत करण्याची त्यांना आतां बुद्धि होऊं लागली आहे व भावाभावांप्रमाणें वागण्याचेंही तीं ठरवीत आहेत. यावरून, त्यांनीं जंगली हिंस्र पशूंच्या वृत्तीचा त्याग करून माणुसकीला थारा देण्याचें योजिलें आहे असें दिसतें.

राष्ट्रांचा इतिहास याच ध्येयाकडे बोट दाखवीत असून त्याचसाठीं तो त्यांच्या मनांची तशी प्रवृत्ति बनवीत आला आहे. आज परस्परांत तीं जी गट्टी करूं पाहात आहेत, तिचा उगम शांतता व युद्धें यांतूनच झालेला आहे. आतां त्यांना पृथ्वी लहानशी वाटूं

लागून कंटाळवाणी भासूं लागली आहे. तिच्याकरितां त्यांनीं आपल्या जवळचें बरें वाईट सर्व कांहीं बदला देऊन टाकलें आहे. त्यांची कायमची मालमत्ता ही आतां सर्व जगाची मालमत्ता झालेली आहे; कारण, अत्यंत उच्च प्रतीची कला, शस्त्रास्त्रें व ज्ञान यांचा उपयोग त्या राष्ट्रांनीं स्वतःचा प्राणनाश करण्यासाठीं उपयोगांत आणल्यामुळें, त्यांच्या ज्ञान आणि विचार यांच्या शोधनाचे फायदे जगाला आयतेच मिळाले आणि त्यांचें पूर्वींचें बुद्धीचें भांडवल जगानें अडकावून टाकलें. शतकेंच्या शतकें तीं राष्ट्रें श्रम करून व आपसांत लढून खुषीनें अथवा नाखुषीनें परस्परांत लग्नें लावून परस्परांचीं नातेवाईक बनलीं आहेत. त्यामुळें त्यांच्या मतांच्या सुधारणा, त्यांच्या जातींचा विभिन्नपणा त्याणि त्यांच्या रक्तांचें संमिश्रण यांच्यांत गट्टी जमून आलेली आहे. त्यांनीं परस्परांचा जो द्वेष केला तोच त्यांचें ऐक्य घडवून आणण्यास कारणीभूत झाला आहे. जगांतल्या सर्व रणक्षेत्रांतले विजयी म्हणविणारे व पराजित यांचे जीव परस्परांत मिसळून गेले आहेत. त्यांच्याशीं बंधुत्वाची कधींही इच्छा न केलेल्यानांही त्यांनीं आपल्या रक्तांत मिळवून घेतलें आहे. द्वेष ही प्रेमाची खोटी अथवा चुकीची बाजू असतां-तोच त्यांचे नकळत कसें आव्हान असतें हें यावरून समजण्यासारखें आहे. तहनामे व ऐक्य हीं घडवून आणण्यास हा द्वेषच अप्रत्यक्षपणें कारणीभूत होऊन निकट संबंध जोडतो. हा द्वेषच एकी करण्यास अशा क्रूरांना भाग पाडून जगाचें साहाय्य मिळविण्यास त्यांचे दांत विचकावितो. असें आहे तरी हीं राष्ट्रें

अशा ऐक्यांत असतां ज्या द्वेषानें व ज्या कारणांसाठीं तें त्याचें ऐक्य घडवून आणलें आहे त्या कारणाचाच तीं पुन्हां द्वेष करूं लागतील असा एक दिवस पुन्हां उगवणार आहे.

राष्ट्रें आपसांत लढाया करून जेव्हां परस्परांपासून फुटतात तेव्हांच त्यांना त्यांचा पूर्वींचा संबंध किति निकट होता हें समजतें. आपसांतलीं बंधनें तीं मोडतात त्यावेळींच त्यांना त्या बंधनांची बळकटी समजून येते. इतकेंच नव्हे, तर ज्या बंधनांची त्यांना पूर्वीं कल्पनाही नसते, तीं त्यांना अचुकपणें दिसूं लागतात. अशा राष्ट्रांपैकीं जीं राष्ट्रें सर्वांत बेफिकीर असून युद्धाचीं केवळ तमासगीर असतात, अशांनाही असा अनुभव येत चालला आहे कीं, आपल्या-पैकीं एखाद्याला जरी युद्धाचा धक्का बसला, तरी तो सर्वांना भोंव-ल्याशिवाय राहात नाहीं.

राष्ट्रसंघाचें हें सध्याच्या स्वरूपाचें घोंगडें अधुनिक काळांतलेंच असून, पूर्वीं याची माहिती कोणालाहीं नव्हती. सध्यां होऊन गेले-ल्या युद्धाचा विस्तार हा मानवी जातीचें ऐक्य कोठपर्यंत जाईल याचें दिग्दर्शन करतो आहे. या युद्धाचे धक्के जगांतल्या कोणच्याही मानवी प्राण्याला बसले नाहींत असा त्याच्या आयुष्याचा कोणताही भाग सांपडायचाच नाहीं. सध्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्व जगाची घडामोड होत असून, माणसांची व राष्ट्रांची पूर्वींची राहाणी बदलत चालली आहे. नवीन काळाचा प्रारंभ झाला आहे हेंच या सर्वांचें कारण होय.

नव्या जीवनचारित्र्याची लाट सध्यां सर्व जगावर येऊन आदळली आहे. ही लाट प्रथम युरोपांतून निघून अमेरिकेवर जाऊन आदळली व तेथून ती निघून तिनें निद्रिस्त एशियाला जागृत केलें. दीर्घ काल मेहनत केल्यानंतरच जीं राष्ट्रांचा बराच काल स्वप्नरहित अशा निद्रासुखाचा अनुभव घेण्यास समर्थ होतात तींच राष्ट्रें खरीं सुखी होत. कारण, त्यामुळें दुसऱ्यांना मात्र व्यर्थ मरावें लागतें आहे.

वर सांगितलेल्या लाटेनें जगाला फेरा मारून ती आतां जेथून निघाली त्या युरोपास परत जाऊन आदळली आहे. तिचें रूपांतर वडवाग्नीच्या भडक्यांत होऊन तो सध्यां तेथील मानवी जातींना जाळून खाक करून टाकतो आहे. याच कारणानें परकीयांचा तिरस्कार टाकून देणें व त्यांची मदत घेणें त्यांना आतां भाग झालें आहे. याच लाटेच्या प्रखर ज्वालांनीं राष्ट्रीय गर्वाचें हरण चालविलें आहे. त्या राष्ट्रांनीं इतउत्तर एकमेकांवर वरचढ होण्याची आपापली हांव आतां स्पष्ट आवरली पाहिजे. मानवी जातीची सेवा केल्यावांचून त्यांना आतां गत्यंतर राहिलेलें नाहीं. हीच भूतदयेच्या मंदिरांत प्रवेश करण्यास चढून जाण्याची पहिली पायरी होय.

प्रगतीची सेवा करण्यास जे नाकारतात त्यांच्याकडून सेवा घेतल्यावांचून ती राहात नाहीं. अशा तऱ्हेनें त्यांच्यावर बलात्कार करून त्यांची सेवा करण्यांत त्यांचा नाश करण्याचीच तिची

इच्छा असते व ती आपली इच्छा पुरवते. गतकालीन साम्राज्यें अंधळेपणानें याच प्रगतीचीं दासानुदास बनल्यामुळें एकामागून एक अशीं क्रमानें सर्व नामशेष झालीं आहेत व सध्यांचीही तशींच होणार आहेत. मनांतून खरी वासना नसतांहीं त्यांच्या अन्यायी व्यवहारांत तीं मानवी जातीची एकी घडवून आणण्याचा खोटा प्रयत्न करीत आहेत, आणि म्हणूनच त्यांची स्थिति गतकालीन राष्ट्रांप्रमाणें होऊं घातली आहे. हें जें मानवी जातीचें ऐक्य घडवून आणण्याचें कर्म चाललें आहे त्याच्या अंतर्यामांत जें कांहीं काळेंबेरें असेल त्या सर्वांचा नाश झालाच पाहिजे. आज कित्येक वर्षेपर्यंत ज्या अर्थी राष्ट्रांच्या ऐक्याची तयारी चालली आहे, ज्या अर्थीं सर्व प्रगतीचें—श्रेष्ठ प्रगतीचें ध्येय ही एकीच आहे, त्या अर्थी त्यांच्या अराजक राजव्यवस्थांची क्रांती ही एकींतच झाली असल्यामुळें, याचा शेवट असा होणार आहे कीं अशाच राष्ट्रांना यापुढें प्रगतीचीं राष्ट्रें म्हणावें लागणार आहे.

ज्या मानवी जातींत या ऐक्याची जागृति जितपत झाली असेल किंवा होईल त्याच मानानें तिची सुधारणा व उन्नति या गोष्टी झाल्या असल्या पाहिजेत अथवा होतील. भूतदयेशीं राष्ट्रांचा तह जुळवून आणण्यांत—म्हणजे शांततेचा तह करण्यांत—ज्या माणसांनीं अथवा राष्ट्रांनीं आपसांत एकी केलेली दृष्टीस पडेल त्याच माणसांना अथवा राष्ट्रांना अतःपर—सुधारलेलीं माणसें अथवा राष्ट्रें—हें नांव शोभेल.

## —राष्ट्रांची सनद—

मनुष्याचा आणि राष्ट्राचा जो संबंध असतो तोच राष्ट्राचा

आणि सखिल मानवी जातीचा असतो. मनुष्याप्रमाणें राष्ट्राला कर्तव्यकर्मे असून हक्कही असतात. कांहीं काळापूर्वी जे हक्क नागरिकांसाठीं म्हणून जाहीर करण्याचा मान फ्रान्स देशाला मिळाला होता, तेच हक्क आतां राष्ट्रांकरितां म्हणजे जगाच्या नागरिकत्वासाठीं आतां जाहीर झाले पाहिजेत. व्यक्तीची सनद आखून देतांना अर्वाचीन काळाच्या शिरोभागीं फ्रान्सनें जीं तीन तत्वें नमूद करून ठेविलीं आहेत, तीं आतां राष्ट्रांच्या सनदेपुढें येणाऱ्या काळाच्या आरंभींच घालून दिलीं पाहिजेत.

**स्वातंत्र्य, समता** आणि **बंधुत्व** हीं जीं तीं तीन तत्वें त्यांतल्या **स्वातंत्र्य** या शब्दाचा असा अर्थ आहे कीं, प्रत्येक राष्ट्रानें आपल्या हुकमतीखालींच आपल्या राष्ट्राची व्यवस्था केली पाहिजे. दुसऱ्या कोणच्याही राष्ट्राच्या अमलाखालीं कोणचेंही राष्ट्र परावलंबी असतां कामा नये. मानवी जातीकारितां जीं राष्ट्रें मोठालीं कामें भूतदयेनें प्रेरित होऊन करतात, तींच खऱ्या थोर वैभवाचीं होत. लहान राष्ट्रांनीं सुद्धां मोठाल्या राष्ट्रांप्रमाणें थोर कामें करण्याचें व्रत स्वीकारलें पाहिजे. प्रे. वुइल्सन यांच्या स्वयंनिर्णयाचा अंतर्भाव त्याच ध्यादयेंत होतो. आपल्या देशाचा म्हणजे राष्ट्राचा स्वतंत्र कारभार करण्यास प्रत्येक मानवी जातीला हक्क आहे. अशा जातींनीं पाहिजे तर निरानिराळे आपसांत वर्ग करून आपल्या देशचा राज्यकारभार चालवावा. कारण, तो त्याचा जन्मसिद्ध हक्कच असतो. एकच पाया व एकच हमी हें राष्ट्रीयत्वाच्या हक्कांचें स्वातंत्र्य होय. लहान

असो किंवा थोर असो—हे हक्क सर्व राष्ट्रांना सारखेच असले पाहिजेत. मग तीं राष्ट्रें अफ्रिकेंतलीं, युरोपांतलीं, अमेरिकेंतलीं किंवा एशियांतलीं का असेनात् ! अर्थ एकच !

प्रत्येक राष्ट्राला त्याच्या मर्जीप्रमाणें वाढण्याची आणि बुद्धीप्रमाणें विकास पावण्याची मोकळीक असली पाहिजे. मानवी जातीच्या अनेक अंगांपैकीं अथवा अनेक शक्तींपैकीं एखादें अंग अथवा एखादी शक्ति व्यक्त करण्यास जर एखाद्यास दुसऱ्या कोणच्याही राष्ट्रानें बंदी केली तर त्यायोगें मानवी जातीचें नुकसान होतें; म्हणून तशी कोणी कोणास बंदी करतां कामा नये. सर्व मानवी जातींना आपापल्या इच्छांप्रमाणें स्वतंत्रपणें राहण्यास व व्यवस्था ठेवण्यास स्वातंत्र्य आवश्य असलें पाहिजे. ऐक्य अथवा एकी म्हणजे एकसारखेपणा नव्हे. सर्व राष्ट्रांनीं जी आपापली स्वतंत्रपणें राज्यव्यवस्था करायची तिचा सामावेश एकीमध्यें होत असतो.

भूमंडळावरील सर्व राष्ट्रें स्वातंत्र्यांत जिवंत राहून त्यांना त्यांचें व्यवहार निष्प्रतिबंधपणें करतां आले पाहिजेत. राष्ट्रांनीं आपापल्यांत वर्ग केले तरी हरकत नाहीं व प्रत्येकानें आपल्या इच्छेनुसार आपली राज्यव्यवस्था चालवली तरी हरकत नाहीं. मात्र प्रत्येक राष्ट्रानें अथवा राष्ट्राच्या प्रत्येक वर्गानें, आपल्याहून मोठी अशी सर्वांची माता जी मानवी जात तिची सेवा केली पाहिजे.

आतां दुसरें तत्व जी **समता** तिचा अर्थ काय तो पाहूं. समाज ही राष्ट्रांच्या परस्परांतील स्वातंत्र्यांची हमीच आहे; कारण, सर्व राष्ट्रें

जन्मसिद्ध हक्कानें एकमेकांच्या बरोबरीचींच आहेत. समता सर्वांना पाहाते आहे. ज्याप्रमाणें सुधारलेल्या मानवांत एखाद्या व्यक्तीसंबंधीं झालेला अन्याय सर्वांच्याच हक्कावर गदा आणतो, त्याप्रमाणेंच सुधारलेल्या सर्व राष्ट्रांची स्थिति आहे. एका राष्ट्रासंबंधानें घडलेला जो अन्याय तोच सर्व राष्ट्रांबद्दलचा अन्याय असें सर्वांनीं समजलें पाहिजे. अन्याय सोसणारें राष्ट्र जर कमकुवत असेल तर हा नियम जास्तच कडकपणानें अमलांत आला पाहिजे. सर्वांना समतोल न्याय मिळाल्यावांचून मानवांत अथवा राष्ट्रांत सुधारणा होणें अशक्य आहे. असा समतोल न्याय मिळाला तरच सर्वांत दुर्बळ असलेल्या राष्ट्रांचे हक्क, सर्वांत बलाढ्य असलेल्या राष्ट्राइतकेंच भक्कम राहूं शकतील. कारण, हक्कांची मोजणी बलावर करायची नसते. बलाहून हक्कांचा दर्जा श्रेष्ठ असल्यामुळेंच ते बलाचे हक्क मर्यादित ठेवूं शकतात. सुधारलेलें मनुष्य अथवा सुधारलेलें राष्ट्र या तत्वावरच दुबळ्यांच्या विरुद्ध आपल्या बलाचा उपयोग करूं शकणार नाहीं व आपण स्वतःला न्यायाची वांटणीही कोणी मग करून घेणार नाहीं. सर्वांनीं सर्वांना ज्याची खात्री दिली आहे तोच सर्वांचा न्याय समजला पाहिजे. हक्क हे समान असल्योंनच त्यांची वांटणीही समानच झाली पाहिजे. जो कायदा हक्क ठरवील तोच कायदा सर्वांना एकसारखाच लागू झाला पाहिजे. ज्या श्रेष्ठ राष्ट्राचे जे अवयव असतील त्यांना त्यांतले राजकीय हक्क सर्व सारखे लागू झाले पाहिजेत. उदाहरणार्थ— मानवी जातीच्या प्रतिनिधिमंडळांत—फक्त नेमक्या जातीच्याच माणसांनीं बसायचें नसून, सर्व जातींच्या लोकांचा त्यांत सामावेश झाला

पाहिजे व सर्वांची सदिच्छा असली पाहिजे. लहान राष्ट्रें, मोठीं राष्ट्रें, धनिक राष्ट्रें, गरीब राष्ट्रें, गुलाम राष्ट्रें, हुकमी राष्ट्रें वगैरे सर्वांनीं समानतेच्याच तत्वावर वागलें पाहिजे. अशी स्थिति झाल्यावर कोणीही गुलाम व धनि राहाणारच नाहीं. बोल्शेविझमचें म्हणजे मूळचे टॉलस्टाय साधूचें हेंच तत्व आहे. असें झालें म्हणजे धनी म्हणवून घेणाऱ्यांना भिण्याचें कारणच उरणार नाहीं. धनीपणा जर वाजवी असेल, तर तो स्थापित करण्यासाठीं, ज्ञान व अक्कल यां-व्यतिरिक्त इतर कशाचीही जरूर लागणार नाहीं. शस्त्रास्त्रांच्या बलाहून आत्मतेजाचें बल फार मोठें असतें. राष्ट्र जरी लोकसंख्येनें अल्पसंख्याकित असलें, तरी तें जर उत्तम गुणांनीं मंडित असेल, तर त्याच्याकडे जगाचें नायकत्व आपल्याआपुणच येतें. त्याचा उत्तमपणा जोंपर्यंत टिकतो, तोंपर्यंतच त्याचें श्रेष्ठत्व कायम राहतें. पण बंधुतत्वांत जेव्हां समतोल न्यायाचा कांटा असतो, तेव्हांच हें शक्य असतें.

एथपर्यंत समतेच्या तत्वाचें विवेचन केलें. आतां बंधुत्वाची व्याख्या काय आहे व तिचें विशद स्वरूप कसें आहे त्याचा विचार करूं. परस्परांबद्दलचा आदर, परस्परांविषयीं औदार्य व परस्परांचे देश ह्या गोष्टी एकमेकांच्या सख्ले नातेवाईक होत आणि पृथ्वी ही त्या सर्वांची माता होय ! आकाश अनंत असून तें प्रत्येक राष्ट्रावरचें जरी निरनिराळें मानिलें, तरी त्या आकाशांत सर्वांवर एकच सूर्य उगवतो आणि मावळतो. कोणत्याही राष्ट्राच्या भाग्यानें त्या राष्ट्रांत कशाही प्रकारची जरी जमीन असली, तरी तीं सर्व राष्ट्रें ज्या एकाच

ध्येयाकडे जात असतात, तें ओळखून, त्याचा शेवट एकमेकांच्या संगनमतानें लावावा हें बरें नव्हे काय ?

मातृभूमीवरचें प्रेम म्हणजे दुसऱ्याबद्दलचा द्वेष जरी नसला तरी तिरस्कार व बेफिकीरपणा, असा कांहीं थोडया काळापूर्वी अर्थ केला जात असे. विस्तीर्ण पृथ्वीवरील निरनिराळ्या देशांतील हवामानावरून एकाच मानवी जातीचे जरी अनेक भेद झालेले आहेत तरी त्या सर्व जातींच्या जिवंत प्रतिमा जो आपल्या देशांत समतेच्या बंधुत्वानें पाहतो, तोच मानव्याचा खरा प्रेमी व बंधु होय. अशा माणसावर कोण प्रेम करणार नाहीं? पृथ्वीवरच्या सर्व देशांस आपल्या देशाप्रमाणेंच देखून, जे कोणी त्या देशांतून प्रवास करतील, त्यांना त्या देशांतल्या मानवी कुटुंबांचीं पवित्र घरें हें एक आपल्या पवित्र देशाप्रमाणेंच घर आहे असें मानण्याला आतां शिकलें पाहिजे. परकीयांशीं करावयाचें जुनें कर्तव्य, यापुढें विसरून जाऊन आपण आपल्या मातेच्या–मातृभगिनीच्या घरीं आलों असून, त्या देशांतले लोक हे आपले बांधवच आहेत अशी आतां समजूत धारण करून, मातृगृहीं जें वर्तन करणें योग्य असतें, तेंच तेथेंही यापुढें त्यांनीं केलें पाहिजे. असें झालें म्हणजे स्वार्थासाठीं जगभर पेरल्या जाणाऱ्या चुगलखोर हेरांची गरजच उरणार नाहीं. इतकेंच नव्हे तर, राष्ट्रांना मग एकमेकांच्या मुलुखांत—गुप्त, महशूर, पक्के फसवे, शहाणपणाच्या जोरावर गैरशिस्त काम करण्यांत गुंतलेले वगैरे प्रकारचे लोक ठेवण्याची तरी काय जरूरी राहील ? गुप्त शत्रुत्व राखण्याच्या ऐवजीं सर्व राष्ट्रांतील व्यवहार चोखपणें व

सरळ अंतःकरणानें पूर्ण मैत्रीचा होण्यास हें तत्त्व फारच श्रेष्ठपणें कामास येईल. राष्ट्रांचे प्रतिनिधि—मग ते—राष्ट्रांचा आयुर्दाय ठरविणारे वाकबगार दलाल असोत अथवा त्यांच्या हितसंबंधांची विल्हेवाट लावणारे सुदैवी पुरुष असोत त्यांची आवश्यकताच राहणार नाहीं. राष्ट्रप्रतिनिधि मग शहाणे व सच्चे सल्लागार बनून, सर्वांचे हितसंरक्षक होतील आणि अशा प्रतिनिधींचें प्रत्येक राष्ट्रांतलें मंडळ, त्यायोगें मानवी जातीच्या उच्चतम मंडळाच्या योग्यतेला जाऊन पोंचेल. हें तत्त्व अशक्यतेच्या कोटींतलें असल्यामुळें, आजमित्तीस जीं राष्ट्रें रानटीपणाच्या जुलुमाखालीं एकमेकांना चिरडून टाकीत आहेत, त्यांनीं या तत्त्वावर आपली सुधारणा करून घेऊन, आपापली रानटीपणाच्या क्रौर्यांतून सुटका करून घेणें इष्ट नाहीं काय ? हीं तीन तत्वें जर सद्यःकालीन राष्ट्रें आपल्यापुढें ठेवून, त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न न करतील, तर—गुलामगिरी, मानभंग आणि रक्तपात—यांतच त्यांना आपलें जीवित कंठावें लागणार आहे.

स्वतंत्र, लोकसत्ताक, समतेच्या तत्वावर चालणारीं आणि बंधुत्वाच्या नात्यानें वागणारीं अशीं जर राष्ट्रें बनणार नाहींत, तर त्यांचें अल्पप्रमाणांत पण प्रचंड जुलमी असें स्वतंत्र वर्गीकरण झाल्यावांचून राहणार नाहीं. हे वर्ग मानवी जातीचे प्रतिस्पर्धी होऊन हल्लींचीं साम्राज्यें त्यांचे गुलाम बनतील. इतकेंच नव्हे, तर अशा त्या जुलमी मानववर्गांचीं—छोटीं व बडीं—सर्व राष्ट्रें पदभ्रष्ट होऊन स्वातंत्र्याला मुकतील व त्यांची गुलाम प्रजाच बनतील. त्या जुलमी वर्गांतसुद्धां अशा तऱ्हेची कायमची युद्धपद्धति उत्पन्न होईल कीं, त्यापुढें—सध्यां

होऊन गेलेलें महायुद्ध—तें किती जरी भयंकर झालें असलें तरी त्या भावी युद्धाचें संक्षिप्त रूप अथवा नान्दीच ठरेल.

सद्यःकालीन स्वतंत्र म्हणविणारीं राष्ट्रें सध्यां जो मार्ग आक्रमीत आहेत, तो मार्ग त्यांना याच स्थितींत नेऊन पोंचविणार आहे. कारण, तशा प्रकारचे रक्तपिपासेनें तडफडणारे प्रचंड राक्षस क्षितीजावर दिसूं लागले असून, अद्यापि कांहीं राजकीय दृष्ट्या उदयासाठीं जन्माला येत आहेत; पण खरी गोष्ट अशी आहे कीं, सृष्टी जरी असे राक्षस उत्पन्न करते, तरी त्यांत तिचा कांहीं विशिष्ट हेतु असल्यामुळें, तो त्यांच्याकडून पार पडला कीं, त्यांचा ती तत्काळ निःपात करते. तिला त्यांचें दर्शन चिरकाळ नको असतें. भूतकाळीं झालेले असे राक्षस जसे अल्पावधींतच नष्ट झाले, त्याचप्रमाणें सध्यां राष्ट्ररूपानें जरी ते निर्माण होत असले, तरी त्यांचीहि हीच गती व्हावयाची आहे. ज्या कार्यासाठीं ते राक्षस जन्माला येत आहेत, तें कार्य घडून येण्याचा काळ आतां अगदीं समीप आला असल्याकारणानें, कार्य घडल्याबरोबर त्यांचा नाश होणार आहे हें ठरलेलेंच आहे.

असले जरी रक्तपाती व प्रचंड राक्षस असले, तरी त्यांच्यापासूनही राष्ट्रांना कांहीं चांगले धडे मिळत असतात. त्यांनीं जी आपली विक्राळ छाया सध्यां राष्ट्रांपुढें पसरली आहे व त्यामुळें राष्ट्रें जरी भीतीनें लटलट कांपत आहेत, तरी राष्ट्रांनीं जर आपल्या अनिष्ट मार्गाचा त्याग केला आणि इष्ट मार्ग जर त्यांनीं आतांपासूनच धरला, तरच त्यांची धडगत लागणार आहे, हें मागाहून सर्वांच्या लक्षांत येईल.

त्या प्रचंड राक्षसरूपी राष्ट्रांनीं जेव्हां अराजक राज्यव्यवस्थेचे जगाचे काहीं भाग आपल्यांत सामील करून घेतले, त्याच वेळीं सृष्टीनें गुप्तपणानें, त्यांच्या अहंपणाला लोकसत्ताक राज्यपद्धतीचा भविष्यत्कालीन भरभक्कम पाया घालून देण्याची तजवीज अमलांत आणण्यास भाग पाडलें आहे. सध्यांच्या होऊन गेलेल्या महायुद्धानें अहंपणाला जो वास्तविक धडा द्यायचा तो देऊन टाकला आहे. सर्वांना धडा देण्याइतका अहंपणा भयंकर माजल्याबरोबर तो इतक्या हिंसक स्वरूपांत प्रगट झाला कीं, पूर्वीची सर्व प्रतिशक्ति त्यामुळें नष्ट झाली व त्या अहंपणाचा डंका सर्व पृथ्वीवर निनादित झाल्याकारणानें, सर्व राष्ट्रांना त्यांच्या भावी काळाच्या सनदेची ताजी खबर मिळाली गेली.

हे जे राक्षसरूपी राष्ट्रवर्ग जन्माला आले आहेत, त्यांच्यापुढें आतां फक्त दोनच मार्ग आहेत. एका मार्गानें त्यांनीं रक्तपाती युद्धाची परस्परांना मगरमिठी तरी आतां मारून परस्परांचा नाश करून घेतला पाहिजे, अथवा दुसरा मार्ग म्हणजे—सर्व जगाशीं मोकळ्या मनानें सख्य करून शांततेचा तह तरी घडवून आणला पाहिजे. याशिवाय तिसरा मार्गच त्यांना आतां उरलेला नाहीं.

## —जगाची शांतता—

अखिल विश्वामध्यें या पृथ्वीवर मनुष्यप्राण्याला विहार करण्यास अनंत काळाच्या मानानें जो क्षणैक काळ परमेश्वरानें दिला आहे, त्या काळांत ज्ञानार्जन करून, एकजुटीनें आनंदांत राहाण्यासाठीं

एकमेकांस मदत करण्याऐवजीं, मनुष्यप्राणी या पृथ्वीचे तुकडे पाड-ण्याची फार काळजी घेऊन, मोठ्या दगदगीनें कृतांताला त्याच्या कामांत मदत करण्याचा जो त्रास सोसतात, तें त्यांचें करणें वेडे-पणाचें आणि मौर्ख्याचें आहे, असें जरी त्यांना फार पुरातन काळा-पासून समजलेलें आहे व तो त्यांचा वेडेपणा सुधारून मौर्ख्याचा नाश करण्याचीही जरी ते खटपट करीत आहेत, तरी त्या कामांत त्यांना अद्यापि सिद्धी कां येत नाहीं याचा उलगडा करून सांगणें कांहीं फारसें अवघड नाहीं.

आजपर्यंत तत्त्ववेत्त्यांनीं शांततेचीं पुराणें वाचलीं व शांततेचें साम्राज्य जगावर पसरेल अशीं अनेक भविष्यवाद्यांनीं भविष्येंही कथन केलीं, तरी अद्यापि जगाला शांततेचा लवलेशही मिळत नाहीं; याचें कारण इतकेंच कीं, शांतता ही स्वर्गीय देणगी नसल्यामुळें, भूतदयेनेंच तिला आपलीशी करून घेतली पाहिजे; पण भूतदयेची मानवी प्राण्याच्या अंतःकरणांत स्फूर्ति होईल तेव्हांच हें घडून येणारें आहे. शांततेचा पाया घालण्याचें काम साम्राज्यांनीं जरी चालविलें असलें, तरी ते त्यांचे प्रयत्न स्वार्थरूपी गर्दभावर चढविलेल्या सिंहाच्या कातड्याप्रमाणेंच आहेत. जे आपल्याला विजयी म्हण-वितात अशा लोकांना—आपण जबरदस्तीनें शांततेची प्राणप्रतिष्ठा करूं अशीं जरी स्वप्नें पडलीं आहेत, तरी तीं त्यांच्या स्वार्थी गर्द-भाच्या लाथांनीं पार लाथाडून टाकलीं आहेत. शांतता प्रस्थापित कर-ण्यास, जबरदस्ती किंवा बळ यांचा कधींच उपयोग होत नाहीं व तिचा उगम युद्धांतूनही होऊं शकत नाहीं.

सध्यां ह्यात असलेलीं राष्ट्रें फिरून एकवार जुन्या साहसाचा प्रयोग करून पाहण्यांत मग्न झालेलीं दिसत आहेत. त्यांची सर्व भिस्त युद्धावरच असून, फौजांच्या शक्तीला नामोहरण करण्यासाठीं, तीं फौजांच्या शक्तीचाच अवलंब करीत आहेत. हें असलें थट्टेचें औषध लागूं पडणें शक्य असतें, तर झालेलें महायुद्ध केव्हांच थांबलें गेलें असतें. विजयी म्हणविणाऱ्या मुत्सद्यांना वाटतें कीं, आपण शस्त्रास्त्रांच्या जोरावर शांततेची प्राणप्रतिष्ठा करूं; पण विजयी कोण आणि पराजित कोण याचा निर्णय करणें काळानें आपल्या हातीं ठेवलें असल्यामुळें, तो त्याचा न्याय केव्हां करणार आहे कोणाला ठाऊक ? रणांगणावर शस्त्रास्त्रांच्या खणखणाटानें विजय संपादन करून, जर शांततेकडून माळ घालून घेण्याची कोणी इच्छा करीत असतील तर ती त्यांची समजूत फोल आहे. विजयानें व सर्वश्रेष्ठ बलांनीं उत्पन्न करूं पाहणाऱ्यांची शांतता—ही सर्व जगाची शांतता कधींच होऊं शकणार नाहीं. अशा त्या ‘ रोमन ’ शांततेची जगाला जरूर नाहीं. जग ‘ मानवी ’ शांततेची अपेक्षा करतें आहे. अशा शांततेच्या तहावर, जेत्यांच्या सह्यांची जरूर नसून, स्वतंत्र राष्ट्रांच्या सह्यांची आवश्यकता आहे. असा हा तह भूतदयेशिवाय जगाला इतर कोणापासूनही प्राप्त होणारा नाहीं.

फौजांच्या बळावर जशी शांतता प्रस्थापित होणें शक्य नाहीं, तद्वतच ‘ शमनप्रिय ’ लोकांचा दुबळेपणाही जगच्छांतता करूं शकणार नाहीं. शमनप्रिय लोकांनीं जगाला पुष्कळ आशा दाखवली,

पण तिचा शेवट निराशेंतच झाला. निराशा होण्याचें कारण, हीं वरील तत्वें अहंमन्यतेनें फुगलेल्या राष्ट्रांचीं व राजकर्त्यांचीं जणुं काय वेदवाक्येंच ठरलीं होतीं.सर्व जगाच्या राज्याचा अभिलाष करणारीं हीं सूत्रें एका रशियाच्या मतलबी झारनें जेव्हां स्पष्टपणें जगजाहीर केलीं,तेव्हां त्याच्या आग्रहावरून,कित्येक पाश्चिमात्य राष्ट्रांनीं ज्या भारदस्त जाहीर सभा बोलावल्या त्यांत पौर्वात्यांस मुळींच आमंत्रण नव्हतें; कारण, पौर्वात्य देशांना तीं राष्ट्रें आपलीं पाशवी वृत्तींतील राखीव कुरणें मानीत होतीं व अद्यापीहि मानीत आहेतच. त्या सभांनीं एका छद्मी शांतिदेवतेच्या मंदिराची उभारणी केली आणि त्या वेळेपासूनच अखिल भूमंडळाला अत्यंत असहनीय व रक्तबंबाळ करून सोडणाऱ्या अनेक भावी युद्धांच्या बीजांची पेरणी त्यांनीं केली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कायदे करणारे, शांततेच्या पंचायती ठरवणारे व जगाची शांतता असावी असे उद्गार काढणारे त्यावेळीं त्या सभेंत सर्व स्वार्थी युरोपियन पंडितच होते. त्यांतला बाह्यात्कारी उद्देश फारच सुंदर होता. आपसांतल्या हक्कांचा, आपसांत लढून निकाल करून घेण्यापेक्षां तो सत्यतत्वावर आधारभूत ठेवावा असें त्यांतलें बीजतत्त्व असतांही, लढण्याचाच प्रसंग आला, तर कसे कायदे असावेत, याचेंहि ठराव त्यांनीं सर्वानुमतें पसंत केले; पण त्यावेळेपासून, कोणत्याही युद्धांत सत्यतत्वाच्या जितक्या चिंधड्या होत आल्या आहेत, तितक्या बलात्कारानेंही सत्याची दुर्दशा त्यापूर्वी कधीं झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

सर्व राष्ट्रांतल्या मजूरवर्गानें एकी करून, युद्ध जुंपल्यास आपण बंद करूं अशी धमकी राष्ट्राच्या पुढाऱ्यांस दिली असतांही, त्या राष्ट्रचालकांनीं 'विषकुंभं पयोमुखम्' या न्यायानें आपलीं तत्वें गोड भाषेंत प्रतिपादन केल्यामुळेंच मजूरवर्ग आपल्या शब्दाच्या निश्चयापासून भोळ्याभावानें फसला गेला.

या एकंदर गोष्टीचें तात्पर्य असें कीं, युद्धाच्या सैतानाला पार पिटाळून लावण्यासाठीं सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांनीं, आपसांत हजारों करारमदार केले पण ते सर्व व्यर्थ गेले. तशा बंधनांत तीं राष्ट्रें त्यापूर्वीं कधींच बद्ध झालेलीं नव्हतीं. असें असतां, सोयीप्रमाणें ज्या त्या राष्ट्रानें स्वहितासाठीं अथवा आपला प्रताप दाखविण्याकरितां त्या युद्धपिशाचानें, आतां आपल्यापेक्षांही अत्यंत क्रूर अशा सात राष्ट्रांचे समंद उठविले आहेत आणि त्याचमुळें चौदा राष्ट्रें एकमेकांच्या माना कापीत आहेत तात्पर्य काय कीं, युद्धाच्या सैतानाला गाडून टाकण्यासाठीं, विजयी म्हणविणाऱ्या राष्ट्रांनीं आपसांत जे हजारों करारमदार व एक्या केल्या आहेत, तें सर्व व्यर्थ आहे. तो स्वार्थाचा लपंडाव आहे. एवढ्या थोरल्या प्रचंड अटींचें बंधन त्यांना पूर्वीं कधींच भोगावें लागलेलें नव्हतें. सर्व बाजूंनीं हुसकून दिलेल्या युद्धाच्या सैतानानें आतां रणमैदानांतलीं रक्तमांसाची दलदल सोडून कोरड्या जागेंत आपल्या भोंवतीं आपल्यापेक्षांही ज्यास्त निर्दय अशीं सात भुतें आपल्या मदतीला घेतलीं आहेत. हल्लीं एकंदर चौदा राष्ट्रें एकमेकांच्या व जगाच्या अपवित्र रुधिरानें आपले हात भारवीत आहेत.

वाढतें आर्थिक उत्पन्न व अर्वाचीन शस्त्रास्त्रांची पराकाष्ठा या गोष्टी आपल्या पाठिराख्या होत्या अशी शमनप्रिय लोकांनीही आपली समजूत करून घेतली होती. दुकानदारांच्या व्यापाराच्या दैवी राज्यांत कामधंद्यांचे बाजार हेच आतां रणसंग्राम होणार आहेत. फक्त एकच लढाई आणि तीही व्यापाराची चढाओढ! त्यांतल्या उत्पन्नावरच विजय संपादन करून दाखवायचा, या व्यापारी तत्त्वानें जगाला वेढा देऊन, त्याचें जबर नुकसान केलें आहे. याच आर्थिक युद्धांत सध्या जगांतले लाखों प्राणी युरोपांत मरताहेत व उत्पन्नानें उत्पन्न करणारालाच खाऊन टाकलें आहे.

या सर्वांच्या अखेरीस असा वाद घालण्यांत आला कीं, अलीकडच्या मनूंत उपलब्ध झालेल्या यंत्रांची प्राणघातक शक्ति, लोकांना शांततेंत राहण्यास भाग पाडील, इतकी ती भीति मनांत उत्पन्न करील! गेलीं चार पांच वर्षें नाशाधिपतीनें आपल्या कालदंडानें एकसारखें नाशाचें काम चालविलें असून, नरकांतल्या हालअपेष्टांचें पृथ्वीवर प्रदर्शन होत आहे. या कामांत लाखों लोक आपापल्यापरी हातभार लावीत असून, द्रव्याचा एकसारखा फन्ना उडून राहिला आहे. असलें हें युद्ध एकसारखें रेंगाळत असून, त्याचा फैलाव चांगल्याच तऱ्हेनें होण्याचा रंग आला आहे.याचें कारण काय बरें असेल?

युरोपांतल्या शमनप्रिय जनतेला एवढें अपयश येण्याचें कारण काय? याचीं स्पष्ट कारणें दोन सांगतां येतील. पहिलें कारण—ते सर्व प्रयत्न युरोपच्याच लोकांचे होते व तेथील लोकांनीं, क़ायदे-

पंडितांनीं, राजकारणपटु मुत्सद्यांनीं आणि राजेलोकांनीं स्वार्थापलीकडे शांततेच्या तहाची खरी इच्छा कधींच केली नव्हती. दुसरें कारण—अशा तऱ्हेच्या सर्व युरोपीय लोकांनीं ज्या गोष्टींची इच्छा केली होती तो सर्वांचा सर्वांशीं खऱ्या शांततेचा तह झाला नसून, फक्त त्यांच्या स्वतःच्या अहंपणाचा तो खोटा व अशक्यतेचा तह होता. हेग येथील सभेंत जरी न्यायाधीश होते, तरी त्यांचा न्याय—ज्यांच्या दूरदूरच्या प्रदेशांवर मतलबी दृष्टी गेल्या होत्या अशा दुर्दैवी लोकांसाठीं नव्हता. अरक्षित लोकांच्या विरुद्ध बुध्या शस्त्रास्त्रांची स्वारी करणें, ही गोष्ट राष्ट्रांच्या हक्कांच्या आणि सुधारलेल्या लोकांच्या लौकिकाच्या विरुद्ध आहे, या सबबीवर ती त्यांच्या कायदेकानूंच्या आड येत नसे. मात्र असे लोक भिन्न रंगांचे असले म्हणजे झालें. अशा गोष्टी जेव्हां घडत तेव्हां एकही समाजवादी त्यांच्या विरुद्ध ओरड करण्यास पुढें येत नसे. यावरून प्रत्येकाला कांहीं तरी वसाहतींच्या शिकारींत मोकळा हात मिळेल असें आश्वासन मिळाल्याशिवाय त्यांच्यांत तह झालेलाच नव्हता असें सिद्ध होतें. शमनप्रिय लोक त्यासंबंधानें आपल्या ठाळक्यांना कधींच त्रास देत नसत. याचें कारण तशा त्या दोन्ही लोकांनीं ज्या एका गोष्टीकडे दुर्लक्ष केलें होतें, ती गोष्ट म्हणजे—तरवारीचा वार व त्याचा प्रत्याघात ही होय !

सर्वांचा सर्वांशीं जो मोकळ्या मनानें तह होतो, तोच काय तो टिकाऊ असतो. जोंपर्यंत जगांतलें निदान एक तरी राष्ट्र युद्धा-मुळें दुःख सहन करीत जळफळत राहील, तोंपर्यंत जगांत शांतता होणें

शक्यच नाहीं. युरोपातच शांतता पाहिजे होती आणि त्या बाबतींतील बेत मात्र असे होते कीं, युरोपांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं रक्तांचे पाट दुसरीकडे वाहावेत. युरोपाच्या वरील इच्छेप्रमाणें त्याला शांतता मिळाली नाहीं व मिळणारही नाहीं. हल्लींचीं युद्धमान राष्ट्रें जगाच्या इतर भागांत सामील न करतां, किंवा त्यांच्या राष्ट्रीय सभेची पूर्व रेखा त्यांनीं भूतदयेच्या तत्वावर न आखतां, जर तीं आपसांत तहावर सह्या करतील, तर तो त्यांचा तह सर्वस्वी कुच-कामाचा ठरेल;कारण, खरा शांततेचा तह इतउत्तर भूतदयेला झुगा-रून देण्यानें कधींच होणें शक्य नाहीं. भूमंडळावरील सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या सभेंत त्या भूतदयेला श्रेष्ठत्वाचा मान मिळाल्यानंतरच शांततेचा खरा तह होईल.

युरोपांतल्या राष्ट्रांनीं प्रथम आपले जगांतले गुलाम मोकळे केले पाहिजेत आणि त्यांना अखिल राष्ट्रांच्या परिषदेंत बरोबरीचा मान दिला गेला पाहिजे. नाहीं तर शांततेचें नांवच काढूं नका.

पण या सर्व गोष्टींच्या आधीं, सध्या गाजत असलेल्या स्वार्थी मुत्सद्यांनीं आपलीं अंतःकरणें खुलीं करून त्यांतून स्वार्थकामनेला हुसकावून लाविली पाहिजे;कारण, शांतता आणि युद्ध हे जे परस्पर-विरोधी शब्द एकाच अंतःकरणांतून निघत असतात. ज्या अंतः-करणांत शांततेच्या खऱ्या दैवताला थारा नाहीं त्या अंतःकरणांनीं विनाकारण शांतता प्रस्थापित करण्याच्या स्वार्थी गोष्टी जगाला सांगून फसवण्याचा प्रयत्न कां करावा? अशाच स्वार्थमूलक स्वभा-

यांच्या मुळथापांनींच युद्ध उपस्थित होतें आणि तें त्या ढोंगाचा नाश करतें.

संस्था, कायदे, न्यायमंदिरें, लवादांच्या कचेऱ्या, राष्ट्रांतर्गत करारनामे, समित्या आणि संघ—या गोष्टी—आपसांतील दळणवळण, उन्नति, राष्ट्रांच्या आपसांतील नात्यांची दृढता वगैरे—शांतता प्रस्थापित करण्यास अयोग्य आहेत असें नाहीं; पण जेथें अंतर्गत वस्तुस्थिति स्वार्थप्रपूरित आहे, तेथें अशा कट्टकटु नांवांमागें लपून राहून स्वार्थ साधण्यास टपलेलीं अंतःकरणें जगच्छांतता कधींच करूं शकणार नाहींत व जगाची स्थितीही कधीं सुधारणार नाहींत. नाशवंत लोंढयाच्या रस्त्यांतले जरी हे त्याला आडवणारे उन्नत खडक आणि बांध असले, तरी तो लोंढा अशा वेगाचा आहे कीं, तो या सर्व ढोंगी संस्था हां हां म्हणतां ढासळून टाकूं शकतो व त्यानें त्या गेल्या महायुद्धांत ढासळून टाकल्याचें सिद्ध करून दाखविलेंही आहे त्या लोंढ्याच्या मार्गांत जितके अधिक अडथळे उभारण्यांत आले तितका त्याचा वेग अधिक जोराचा वाढला आणि त्यामुळेंच कल्पनातीत नाशही झाला. तो नाश टाळायला त्या लोंढ्याच्या उत्पत्तिस्थानापाशीं जाऊन पोंचायला हवें होतें; पण या संस्था तेथें जाऊन पोंचल्या नाहींत. त्या संस्थांचीं कार्यें बाह्यात्कारी असून, त्यांनीं शांततेची प्रस्थापनाही अंतःकरणपूर्वक केलेली नव्हती व त्याचमुळें त्या संस्थांतून शांतता जन्म पावूं शकली नाहीं. बाह्यात्कारें पुकारलेली शांतता कधींही युद्ध टाकूं शकत नाहीं; कारण, तें अंतरंगांतून उद्भवलेलें असतें. मानवी जातींचा तिरस्कार आणि भूतदयेचा

धि:कार यांतच युद्धाचें बीज असतें ! त्याच बीजापासून रक्ताचा निर्झर जन्म पावून तो भूतलावर जोरानें पसरतो. अशा स्थितींतही अक्षयींचें युद्ध थांबवणारा अडथळा उत्पन्न होऊं शकेल. तो अडथळा म्हणजे भूतदया हा होय ! या अडथळ्याचें जर धरण बांधलें गेलें नाहीं तर अंतस्थ आणि तात्विक, सर्व कांहीं बाह्य अवडंबराचें ठरून त्यापासून कल्पनामय अशक्यता आणि शांततेचीं खोटीं स्वप्नें उत्पन्न होऊन, युद्धाचा जिवंत कोळसा मात्र दबलेला जशाचा तसाच राहील.

खोट्या आशा आणि नाटकी प्रवेशबारी यांचा आतां नायनाट झाला आहे. त्या ढोंगी गोष्टी—पुरातन जिवंत निखाऱ्याची शांति करायला शक्त नव्हत्या हें सिद्ध आहे. सांत्वन करणें म्हणजे शांतता करणें नव्हे ! त्यांतच शांततेचा बळी पडतो. पण तिचा तो पराजयाचा बळि आपल्या मृत्यूबरोबरच जयोत्कर्षाच्या इंगिताची परिस्फुटता करीत असतो ! जें खड्ग्, सांध्याचेही तुकडे उडवूं शकतें त्याच्या प्रखर तीक्ष्णधारेची उणीव तेंच तेथें निर्माण करतें. चालू असलेलीं युद्धें हीं तिच्या खोट्या सह्या असून, तें रक्तपाती शस्त्र अखेरीस आपलाच घात करून घेणार आहे.

भूतकालीन राष्ट्रें व धर्म जें कांहीं करूं शकलीं नाहींत, सध्यांचीं सुधारलेलीं राष्ट्रें जें कांहीं घडवून आणण्याच्या प्रयत्नांत घसरलीं आहेत व ज्यासाठीं त्यांनीं तत्परतेनें अनेक शतकांनीं आपली उत्सुकता प्रदर्शित केली तें सर्व एकच गोष्ट करूं शकणार आहे ! मानवाला जिची विस्मृति पूर्णपणें झाली आहे अशी ती जुनीच पण श्रेष्ठतर गोष्ट आहे. कोणची म्हणाल तर ' भूतदया ' ही ती गोष्ट होय !

त्या भूतदयेची जागृति मानवाच्या हृदयांत झाली पाहिजे, म्हणजे आपोआपच स्वयंनिर्णयाचें तत्व अस्तित्वांत येईल व भूतदयेच्या जागृतीनें कलहकारक शस्त्रास्त्रांचा नायनाट व्हायला वेळ लागणार नाहीं. असें झालें म्हणजेच जगच्छांतीपाठाचीं स्तोत्रें सर्वत्र अंतःकरणपूर्वक गायली जाऊन, जगभर शांतता नांदूं लागेल.

## ——भूतकालीन् लबाडी——

खरें बोलायचें म्हणजे लबाडीनें तुडुंब भरलेल्या सभ्यांच्या जगांत आपल्याला जर मनमोकळें करून रहावयाचें असेल, तर त्यापासून अलिप्त राहण्यासाठीं त्याच्या सर्व लबाड्या आपल्याला मुकाट्यानें सहन करून मूग गिळले पाहिजेत. कारण, प्रकाशापेक्षां अंधःकारांत राहण्यांतच सुख मानणाऱ्या लोकांची संख्यां पृथ्वीवर गर्दी डसळून राहिलेली आहे. फसवेगिरीचा धंदा करण्यांतच जे सचोटी मानतात त्यांचा तो धंदा त्यांनांच लखलाभ असो ! खोटेपणा आणि लुच्चेगिरी याच गोष्टींवर त्यांची उपजीविका चालू आहे ! पण त्या दोन्ही गोष्टींचा तिरस्कार करणाऱ्यांना अशा लोकांचे ते धंदे पाहून मरणप्राय दुःख होत आहे. ते त्या दुःखानें करपून गेले आहेत. त्या दुःखाचा त्यांना कंटाळा येऊन मरण पुरवलें असें ते आतां बोलूं लागले आहेत. दुसऱ्यांच्या स्वार्थासाठीं ज्यांना बळी देण्याची तयारी चालविलेली असते, असे समरांगणाच्या मानवी कसाईखान्यांत नेण्यासाठीं सज्ज केलेले व दुसऱ्यांचा जीव घेण्यास स्वतांचा जीव धोक्यांत घालण्याच्या कवाईतीच्या शाळेंत तयार झालेले सैनिकही

आतां या लबाड्या ओळखूं लागले असल्यामुळें, सत्यांतच आपल्या मुक्तीचें खरें पावित्र्य आहे असें त्यांस आतां वाटूं लागण्याचा दिवस अगदीं समीप येऊन ठेपला आहे. मेंढरांप्रमाणें युद्धभूमीच्या कत्तलखान्यांत नेण्यास एकाच दावणींत तयार केलेल्या सैनिकांना जो आतां लवकरच एक नव्या चमत्कारांनीं भरलेला दिवस दिसणार आहे, त्या दिवसाच्या प्रकाशांत ते सैनिक—सत्यतत्त्वाचा अंगिकार केलेले असेच आपले पुढारी शोधून काढल्यावांचून राहणार नाहींत. तो दिवस आतां अगदीं समीप येऊन ठेपला आहे.

महायुद्धांतल्या तोफांच्या राक्षसी गडगडाटांनीं तें सत्यतत्व आतां सर्व जगाच्या कानांत दुमदुमविलें आहे. तें न ऐकूं येणारा असा बहिरा आतां कोण असेल ? ज्या युक्त्यांत शांततेचें ढोंग करून बसलें आहे त्यांच्यापासून तों अखेरच्या सर्व लबाड्यांच्या शिखरांपर्यंत तें सत्यतत्व आतां त्या सर्वांचा नायनाट करायला सज्ज झालें आहे !

शांतता या शब्दांत सध्यां अशा मूर्तीचा अवतार उत्पन्न झाला आहे कीं, जिच्या जोरावर मोठ्या राष्ट्रांनीं लहान राष्ट्रांना हवेंतसें मनसोक्त वागवावें! अशीं तीं मोठीं लब्धप्रतिष्ठित पण आंतून कुजलेलीं राष्ट्रें स्वतःला शांतताप्रिय असें केव्हां म्हणवतात ? तर त्यांना जेव्हां त्यांच्यापेक्षां बलवान् राष्ट्रांशीं युद्ध करण्याचा प्रसंग येतो तेव्हां! पण तें त्यांचें निव्वळ ढोंग असतें ! आपल्यावर फारशी जबाबदारी न घेतां जीं राष्ट्रें दुर्बल राष्ट्रांशीं युद्ध करूनच तृप्त होतात, अशांचें तें कर्म फार काळ टिकणारें नसतें. याबद्दल

परिस्थितींत घडून येणाऱ्या अनेक गोष्टींनीं त्यांची खात्री केलेली असते. कारण, दुर्बळांशीं जबरदस्तीनें केलेल्या युद्धाचा अखेरीस परिणाम अशा गोष्टींत होतो कीं, त्यांच्यापेक्षां शेरास सवाशेर असा त्यांना भेटतोच भेटतो.

हें जग एका वर्तुळांत व्यापलेलें आहे. त्यांतील प्रत्येक गोष्ट त्यांतच गुरफटलेली आहे. जो कोणी जें कृत्य करतो त्याचा त्याच्या-वर उलट परिणाम घडतो. जगांत कांहींच नाश पावत नसून, सर्व कांहीं एकात्रित झालेलें असतें. एका जुलुमांतून दुसरा जुलूम जन्म पावत असतो. मेघगर्जना जशी मेघगर्जनेला आकर्षण करते, तद्वत जबरद-स्तीला जबरदस्तीचें आव्हान होतें. अनेक वेळीं आणि अनेक स्थळीं युरोपनें जे आजपर्यंत दुसऱ्यांवर आघात केले, त्याचेंच प्रायश्चित्त म्हणून अभिशापानें त्याची सध्यांची विस्कळित स्थिति करून टाकली आहे! न्याय हा असा आहे ! युरोपानें स्वतःच्या कृतीनें जें भयंकर वातावरणांत मेघडंबर उत्पन्न केलें व ज्याची काळीकुट्ट छाया आज त्याच्यावर पसरलेली आहे, ती दिसत नाहीं म्हणणें म्हणजे दृष्टीची थट्टा करून अंधळेपणाचें ढोंगच आणणें होय !

सध्या युरोपांत जीं राष्ट्रें एकमेकांना रक्तबंबाळ करण्याचा डाव मनांत धरून अगदीं टपून बसलीं आहेत, त्यांपैकीं प्रत्येकानें पक्षपात सोडून त्यांच्या सध्यांच्या न्यायाच्या कल्पनांना जर त्यांनीं फांटा दिला, तर आज जें त्यांच्यावर दुर्दैवाचें अरिष्ट कोसळलेलें आहे तें त्यांच्याच कृतीनें त्यांनीं आपणांवर कोसळवून घेतलें आहे असें त्यांचेंच तर्कशास्त्र त्यांना निर्भिडपणें सांगेल !

उदाहरणार्थ मोरोक्कोचें युद्ध घ्या ! तुर्कांना दुर्बल करणारें ट्रिपोलीचें युद्ध हें त्या युद्धावरून सिद्ध झालेली दुसरी गोष्ट नव्हे काय? बाल्कनचें युद्ध ही त्या सिद्ध गोष्टीला पुष्टी देणारी गोष्ट असून त्याप्रमाणेंच ऑस्ट्रिया आणि रशिया हीं एकमेकांच्या मानगुटीस बसल्यामुळें महायुद्धांतल्या जंगी तोफखान्यांनीं जबरदस्त मानवी कसाईखाने निर्माण केले ! अशा स्थितींत दिसायला जे कोणी निरुपद्रवी-स्वरूपांत दिसत होते, तें त्यांचें खरें स्वरूप नव्हतें. यावरून कोणी हक्कांचा खरा उपयोग करतात, तर कोणी जबरदस्तीनें हक्कांची बजावणी करतात, ही गोष्ट खरेपणानें प्रत्ययाला येते. तीं राष्ट्रें तोंडानें जरी वाटेल ते शब्द उच्चारीत असलीं, तरी त्यांचे स्वार्थी पंजे नेहमीं पसरलेले दिसत असून, ते तोंडानें साधुपणाच्या गोष्टी सांगून त्या आपल्या पंजांत दुर्बळांना पकडण्याचे युद्धाचे डाव मनांतून खेळत असतात. अशा आपमतलबी राष्ट्रांची भाषा ऐकून मोठी मौज वाटते. जुलुमाच्या जुंवाखालीं सांपडलेल्या राष्ट्रांचे इतके संरक्षण व त्यांना जुलुमांतून सोडवण्याची गोड भाषा बोलणारे स्वार्थी दृष्टीसमोर उभे राहिले म्हणजे त्यांच्या अंतरंगांतले विचार त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट वाचायला सांपडतात. पोलंडला आधीं स्वातंत्र्य कोण देणार म्हणून रशिया व जर्मनी एकमेकांच्या उरावर बसूं पाहतात. अल्सेस आणि आयर्लंड, सर्विया, ईजिप्त, बेल्जम अथवा हिंदुस्तान यांच्याही स्वातंत्र्याकरितां तोंडानें मिष्टास--गुळचट भाषा बोलणारे मार्जारव्रती धूर्त वीरशिरोमणि कांहीं कमी आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. असे ते वीरशिरोमणि धूर्त, वर सांगितलेल्या

राष्ट्रांना दास्यपंकांतून सोडविण्याच्या गप्पा तोंडानें मारीत असतां-नाच आपसांत एकमेकांच्या नरड्या कडाकड फोडीत आहेत.

युद्धाचें खरें कारण आणि कुकर्माचें मूळ यांतच आहे. वस्तुतः प्रथम कांहींची तीच अपेक्षा होती व त्यांतच आपला खरा खरा फायदा आहे, असें त्यांस वाटलेंही होतें. पण अखेरीस सर्वांनींच त्यांत आपला फायदा आहे अशी भ्रामक समजूत करून घेऊन, त्या संकटांतून निभावून जाणें आपल्या कृतीनेंच त्यांनीं अपरिहार्य करून घेतलें.

नीच मनोवृत्तीच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन स्वार्थी राजकार-स्थानाचा डाव खेळला म्हणजे तर्कशास्त्रदृष्ट्या हीच स्थिति होते. दुसऱ्याचें वित्त हरण करण्याचा अपवित्र हेतु मनांत धरून, निर्लज्ज-पणाच्या अथवा स्वार्थाच्या कपटी न्यायाखालीं अन्यायाची इमारत उठवूं पाहणारांची अशीच स्थिति व्हावयाची हें निसर्ग बोलून चुकला आहे ! स्वार्थरूपी हिंस्रप्राणी अथवा सैतान त्या सर्व राष्ट्रांच्या मनांत संचार करून राहिल्यामुळेंच त्यांची रुधिरपिपासा एकसारखी वाढत होती.

ओकारी येईपर्यंत परद्रव्यापहार करणाऱ्या विजयी राष्ट्रांच्या विरुद्ध भुकेनें तळमळणाऱ्या राष्ट्रांचें हें युद्ध होतें. त्यांच्या भुका समसमान नव्हत्या. त्यांच्या भुकीच्या प्रमाणांत महदंतर होतें. त्यामुळें अखेरीस तीं राष्ट्रें एकमेकांच्या उरावर बसलीं. मुख्य कारण काय तर त्यांना पृथ्वी आटोपशीर अशी अगदीं लहान वाटूं लागली आणि म्हणून ती एकमेकांनाच खायला उठली !

१८९३

सर्व पृथ्वीवर जी लूट केली गेली होती तिची अखेरची तडजोड त्या युद्धानें लाविली. स्वकर्माच्या सामर्थ्याच्या दारूबाजीचा गोंधळ, सर्व तऱ्हेच्या तृष्णा आणि सर्व तऱ्हेची मद्याची धुंदी यांचा अखेरचा तंटा या युद्धानें संपुष्टांत आणला. निर्लज्जपणा, नाश आणि मृत्यु यांचा रस्ता याप्रमाणें सध्यांच्या पिढीच्या लोकांनीं आपलें उदाहरण दाखवून भविष्यत्कालीन पिढीला, मोकळा करून दिला. हा एकच धडा त्यांनीं शिकविला असें नव्हे, तर आणखीही असले कित्येक धडे त्यांनीं स्वकृतीनें जगापुढें मांडले आहेत.

## —नाटकी विजय—

युरोपांत होऊन गेलेलें महायुद्ध हें अपरिहार्य होतें असें नव्हे, तर तें आवश्यच होतें; इतकेंच नव्हे, तर भविष्यत्कालाची इच्छाच तें घडवून आणण्याची होती. राजनीतिनैपुण्याची दिवाळखोरी—युरोपांत माजलेल्या सांसर्गिक खोटेपणाच्या वातावरणाचें उच्चाटन करण्यास आवश्यकच होती. अमुक राष्ट्राच्या कचाटींतून अमुक एक देश सुटण्यासाठीं किंवा दुसऱ्याच्या फायद्याकरितां युरोपांतील मोठाल्या राष्ट्रांचा नाश व्हायला पाहिजे होता अशांतली गोष्ट नाहीं, तर ज्या अधिकारमदाच्या स्वैरवर्तनानें तीं जगभर धिंगाणा घालीत होतीं, तो मोडण्यासाठीं त्यांचा नाश होणें जरूर होतें-ज्यायोगें भूतदयेला पुढें सरकायला सांपडून, ज्या लबाडीच्या युक्त्या आणि व्यापाराची मत्सभा यांत अडकलेल्या खऱ्या हुन-

ष्यपणाला मुक्त होतां येईल अशा तऱ्हेची ढोंगी वैभवाच्या आणि लबाडीच्या सुधारणेची संस्थापना व्हायलाच पाहिजे होती. शिथिल झालेला खरा मनुष्यपणा पुन्हां अंगीं बाणण्यास अशा या नरकाची जरूरी होती, नवी सृष्टि नवें वातावरण आणि जुन्या पंथांतून नवीन पंथ निघण्यासाठीं हा ब्रह्मघोटाळा होणें अवश्य होतें.

ज्यासाठीं मुत्सद्दी युद्ध करवीत होते, त्यासाठीं खरें पाहिलें असतां, हें युद्ध झालें नसून, हीं जीं वर सांगितलीं तींच युद्ध होण्याचीं खरीं तात्विक कारणें होतीं ! प्रत्येक राष्ट्र आपण विजयी आहों असेंच म्हणत आहे, व त्यांतच सध्यांचें कपटपाटव भरून राहिलेलें आहे! आपसांत युद्ध करून एकमेकांनीं एकमेकांचा जो चुराडा उडविला व अखेरीस गम खाल्ली, अशा या युद्धांत 'विजय' या शब्दाचा अर्थ कोणचा बरें करतां येईल ? सर्वसाधारण रक्त आणि सुवर्ण यांचा जसजसा एकसारखा सडा पडणें लांबत चाललें तसतशा मानवी जीवनाच्या रक्ताच्या नद्या जोरानें वाहूं लागल्या आणि त्यामुळें तो प्रकार जितका दिवसेंदिवस अप्रसन्नता उत्पन्न करूं लागला तसाच 'विजय' हा शब्दही कर्णकटु आणि मिथ्या वाटूं लागला.

दोहों बाजूंना किती जय मिळाले असतां, सर्वांचाच पराजय झाला असें मानण्यास बरें पडेल ? त्यांनीं जरी आपल्याला विजयप्राप्ति झाली म्हणून डंका पिटून वर्तमानपत्रांतून आणि इतर दुसऱ्या साधनांच्या द्वारें आपल्या वैभवाच्या जगभर तुताऱ्या वाज-

चून प्रसिद्धी केली, तरी दिवसेदिवस प्रगतीच्या मार्गांत जी पुढें-पुढें आत्महत्येची भीतिप्रद मुख्य हकाटी बोंबमारीत धांवत चालली आहे–तिला कांहीं ते काणठळ्या वसविणारे तुमच्या वैभवाचे नगारे थांबवूं शकणार नाहींत ! कारण, हें जें युद्ध झालें त्यांत प्रति दिवशीं त्या युरोपीय युद्धमान राष्ट्रांचें नफानुकसान किती कां झालें असेना, पण सर्वांचीच त्यांत चोख चांदी उडाली आहे हें मात्र नाकबूल करतां यायचें नाहीं.

सर्व जगताला आपल्या पंज्यांतल्या अधिकारांत वागवूं अशी जी घमेंडीची महात्वाकांक्षा ती या युद्धानें युरोपची पुरी जिरवली आहे. ती ' यावच्चंद्रदिवाकरौ ' आतां त्यांना सोडून गेली आहे असें भविष्य कथन करायला कांहींच हरकत नाहीं. अशा तऱ्हेनें हा महत्वाकांक्षेच्या गणिताचा हिशेब साफ चुकून बेभवू झाली हें निर्विवाद आहे. या युद्धापासून जे फायदे व जे जय झाले असें सांगण्यांत येतें त्यांची कधीं स्वप्नींही कोणी आशा केलेली नव्हती ! त्या राष्ट्रांचा जो सर्वसाधारण नाश झाला व त्यामुळें मानवी प्राण्यांच्या प्रगतीची जी पीछेहाट झाली ती मात्र पदरीं पडली हें खरें.

अशा तऱ्हेच्या या नाटकी विजयाचें स्वरूप युरोपांतले मुत्सद्दी जनतेच्या मनांत ठाशीत असतां, ते आपल्या मनांत असे खुशीचे मांडे खात आहेत कीं, आपल्या त्या कृतीनें युद्धापूर्वी जी आपल्या राज्याची आणि मनाची स्थिति होती ती खात्रीनें पुन्हां आपणांला प्राप्त होईल. अशा तऱ्हेच्या राक्षसी महत्वाकांक्षेच्या युद्धानंतर आपण

आपल्या आवडत्या धंद्याच्या सिंहासनावर पुन्हां खात्रीनें चढूं अशा निष्फळ आशेनें ते आपल्या मनांत गाजरें खात होते. भूतकाळीं ज्या मनःस्थितीच्या तत्वावर त्यांनीं शांततेच्या तहाची उभारणी केली होती तशाच तऱ्हेचा शांततेचा तह भविष्यत् काळीं घडवून आणण्याची त्यांची बुद्धि हवेंत बंगले बांधीत होती; पण त्यामुळें ते आपल्या त्या स्वार्थी बुद्धीकडून इतक्या भयंकर तऱ्हेनें फसले गेले आहेत कीं, ते ज्या अरिष्टांतून सुटण्याचा जों जों प्रयत्न करीत आहेत तों तों ते उलटे त्या अरिष्टांत अधिकच गुरफटले जात आहेत. त्या परस्पर युद्धमान राष्ट्रांत अशा तऱ्हेचा अफाट दर्या उचंबळून राहिलेला आहे कीं, तो युद्धापूर्वीं ज्या स्थितींत होता त्याच स्थितींत युद्ध समाप्तीनंतरही तसेंच आपलें स्वरूप प्रगट करण्यास माघार घेत नाहीं. तो त्या भीतिप्रद महासागराचा खळबळाट शांत होणें शक्य नाहीं. आणि तीं युद्धयमान राष्ट्रें जेथें जाऊन पोंचण्याची इच्छा करीत आहेत तेथें तो त्यांना जाऊंही देणार नाहीं.

युद्धामुळें घडून आलेल्या ज्या गोष्टींनीं सर्व जगाला हालवून सोडलें आहे त्यांचा भविष्यत् काळीं जगावर कांहींच परिणाम घडलेला दिसणार नाहीं अशी त्या युद्धमान राष्ट्रांची समजूत आहे काय ? ज्या थोर अनुभवानें त्या राष्ट्रांना हालवून जागीं केलीं आहेत तो त्यांना काय फायदा देणार आहे ? या युद्धांत मानवांच्या ज्या भयंकर हालअपेष्टा झाल्या, जें क्षात्रतेज चमकलें, जे गुन्हे घडले, रणयज्ञांत ज्या आहुत्या पडल्या, ज्या राष्ट्रांचा रणयज्ञांत चुराडा उडाला त्या सर्व गोष्टींपासून मिळणाऱ्या शिक्षणाला इतर लोक

पराङ्मुख कसे होतील ? या भयंकर रणयज्ञांत जे अश्रु व जे रक्ताचे पाट वाहले त्यांचा परिणाम दुसरा तिसरा त्या राष्ट्रांवर कोणचाच होणार नसून, त्यांनीं जें कर्म भूतकाळीं केलें तेंच कर्म करण्याची पूर्ण मुभा त्यांना स्वयंसिद्धतेनें मिळणार आहे काय ?

जो अभिशाप इतक्या वस्तूंचा आणि मानवी प्राण्यांचा संहार करण्यास उद्युक्त झाला,तो युद्ध उत्पन्न करणाऱ्यांचा घात केल्याशिवाय कसा राहील ? नव्या पिकासाठीं जमीन नांगरणारा नांगर जमिनीच्या पोटांतले जुने बुडखे उखडून टाकीत नाहीं काय ?

पुरे झालें आतां त्या नाटकी विजयासंबंधानें ! आतां यापुढें जी शांतता जगावर येणार आहे, ती स्वार्थी मतलबाची येणार नाहीं. कारण, जे एकमेकांशीं लढले, लढत आहेत किंवा जे युद्ध उपस्थित करण्याच्या विचारांत आहेत त्या सर्वांपेक्षांही श्रेष्ठ असें युद्ध भविष्यत् काळ पुकारणार आहे !

होऊन गेलेलें युद्ध हें जर सर्वांच्या अपराधाचें फळ असेल, तर तोच दोष जगाच्या कल्याणाच्या ढोंगी खटपटी करण्याचें मिथ्या प्रदर्शन करीत असलेल्यांच्याही माथीं पडूं शकतो. युद्धाच्या आड येणाऱ्या विघ्नांचे शतशः तुकडे उडविणारे त्यांच्याच घणाचे जबर्दस्त आघात होते ! ज्यांचा दैवानें धिःकार केला होता त्यांनींच आपल्या दुर्दैवाच्या आज्ञेनें युद्ध उपस्थित केलें. अशा लोकांपैकीं कांहीं हक्क आणि न्याय या दोन शब्दांचा जरी आतां प्रामुख्यानें उच्चार करीत आहेत,तरी तें व्यर्थ आहे ! कारण त्यांनीं खरोखरी हक्क आणि

न्यांय यांची बेअदबी केली असल्यामुळेंच त्यांनीं एकमतानें त्यांच्या-मध्यें स्वतःच्या तेजानें युद्ध सुरू केलें असून, आतां तीं युद्ध्यमान राष्ट्रें त्या युद्धांतून अधिक उज्ज्वलतेनें आणि प्रखर न्यायानें मुक्त होणार आहेत. हें युद्ध कोणच्या ना कोणच्या तरी रूपानें सुरूच राहणार असून, त्यांतून दुसरें एखादें असेंच युद्ध उपस्थित होईल. अथवा दुसरी कोणची तरी चमत्कृति निसर्गाला जरूर वाटल्यास जन्म पावेल. भूतदयेला भ्रष्ट करणारी अमंगल कालिदेवता हजर राहून, जोंपर्यंत सामाजिक व्यवस्थेची अव्यवस्था करून आपसांत तंटा लावीत राहील तोंपर्यंत या राष्ट्रांची यादवी मिटणें शक्य नाहीं. त्या कालि-देवतेनें काळें केल्यावरच आपसांतील सहकारितेच्या तत्वाचा उदय होऊन, तीं राष्ट्रें सुखसमाधानांत राहूं शकतील. सध्यां चालू अस-लेली यूरोपांतली यादवी कदाचित् प्रत्येक राष्ट्रांतही निरनिराळी सुरू होईल. त्यामुळें भूतदयेचा कडेलोट होऊन, परमेश्वरी संकेतानें जें व्हायचें ठरलेलें असेल तें घडून आल्यावर पुन्हां तिचा उदय होईल.

वर सांगितलेल्या मुख्य मुद्याच्या गोष्टींचा युरोपीय सर्व राष्ट्रांत अभाव असल्यामुळेंच कोणचीही शक्ति तें युद्ध थांबवूं शकली नाहीं. या युद्धामुळें जगाला जी जखम झाली होती तिच्यावर तप्त लोहशलाकांची डागणी बसण्याचीच वेळ येऊन ठेपली होती व त्याप्रमाणें जरी त्या डागणीनें जगाची जखम होरपळून काढली आहे, तरी तो त्या जखमेंतला आगीचा उठलेला डोंब जगाला फायदा करून देणार आहे !

अशा तऱ्हेच्या परिस्थितीचें मार्मिकपणानें निरीक्षण करा म्हणजे खरी वस्तुस्थिति तुमच्या निदर्शनास येईल; परस्परविरुद्ध आपलेपणा आणि स्वार्थाचा दोष यांचीं चित्रें त्यांत स्पष्ट दिसण्या-सारखीं आहेत ! ज्यांबद्दल कोणाचाही विश्वास पटत नाहीं अशा गोष्टींची दीर्घकालीन् शाश्वतता जेथें मोजली जाते आणि प्रलयाची जेथें कधींच कोणांकडूनही इच्छा प्रदर्शित केली जात नाहीं अशा ज्या ठिकाणीं जगाला जो मोठा धक्का बसला आहे त्याचें स्वरूप व तो बसण्याचें कारण तुम्हांला यावरून सहजीं समजण्या-सारखें आहे.

दृश्याच्या पाठीशीं जें कांहीं लपवलें गेलें आहे व जे दृष्टीस पडा-यलाच हवें आहे तें तुम्हांला समजून येईल आणि अदृश्याच्या पली-कडलें जें कांहीं आहे त्याच्या आगमनाची वाट आतां तुम्हांला डोळे उघडून बघत बसलें पाहिजे; कारण, तें यदृच्छेनेंच तयार झालेलें आहे ! सध्यां जो भविष्यत्काळ तुमच्याकडे येण्यास निघाला आहे त्याच्या विजयी पावलांची प्रेरणाशक्ति अशी कांहीं जबरदस्त आहे कीं, तिनें सगळ्या जगाला त्याच्या पायासकट हालवून सोडलें आहे

## —भावी सत्यता.—

उद्यां ! चला पुढें चला ! चालू रात्रीचा मार्ग आक्रमण करूं लागा आणि उद्यांच्या प्रभातकाळापर्यंत चालत राहा ! अपार खोल अशा खड्यांतून पर्वतशिखरापर्यंत जो खडतर मार्ग गेलेला आहे

आणि रुधिरासक्त नसणारी भूतदया रुधिरमलिन अशीं आपळीं पदें उमटवीत जो मार्ग आक्रमण करते त्याचें अवलंबन करा. त्याशिवाय आतां तुम्हाला दुसरें गत्यंतरच नाहीं. ती तुमची कृति-आतां निसर्गाच्या दोन्ही बाजू-चांगली आणि वाईट-आपापले डोळे घट्ट मिटून-तुम्हांला आतां बिनहरकत करूं देतील; कारण, त्या दोन्ही बाजूंच्या अंगीं आतां, हें जाणण्याची बुद्धि आणि हुकमत हीं राहिलेलीं नाहींत ! खासगी अथवा राष्ट्रीय हिताच्या अदूरदृष्टीला ही तुमची कृति पराजित करणारी आहे ! जर उंच स्थलावरून-उच्च भावनेनें-अव. लोकन केलें तरच दूरवरचें कृत्य दिसणें शक्य आहे.

उद्यां कदाचित् युद्धाची परिसमाप्ति होईल ! पण अंतर्गत भावनांच्या कलहाचें मात्र निर्मूलन होणार नाहीं. तो वाढेल इतकेंच नव्हे तर बहुतकरून स्फोटही पावेल. प्रत्येक गोष्टीचा बदल वाईटांतून घाणेऱ्यांत झाल्याशिवाय बाह्यात्कारें आशेला मूळ धरण्यास जागा मिळणार नाहीं. घाणेऱ्यांतून चांगल्याची उत्पत्ति झालीच पाहिजे, व्हावी तितकी अवनति होऊन अद्यापि त्यांना आमच्या-इतका खातेऱ्याचा अनुभव आलेला नाहीं. तशी स्थिति प्राप्त होणार आहे असें सुचविणारें युद्ध ही त्याची केवळ प्रस्तावना आहे. चालू असलेल्या नाटकाचा शेवट कसा कां होईना ! त्याचें विशेषसें महत्व नाहीं. निसर्ग आपलें नाटक या प्रकारें सध्या घडवून आणतो आहे व त्यांत जे देखावे दिसताहेत त्यांच्या परिणामाच्या मागून काय घडून येणार आहे त्याची मातब्बरी विशेष आहे.

घडून येणारे परिणाम पूर्ण स्वरूपांत तयार होण्याच्या आधींच युद्धाची परिसमाप्ति खरोखरीच जर झाली असली, तर त्या संधीला निर्घृणच म्हणावें लागलें असतें ! पण तशी निर्घृण संधि उद्भवलाच नाहीं हें बरें झालें! युद्ध थांबणें आतां जितकें अपरिहार्य आहे तितकीच ती संधि येणें कठिण आहे ! शेवटचे परिणाम तर्कशास्त्रदृष्टच्या आतां ठरवायचे आहेत ! कोणच्याही कारणानें अथवा कोणीही अडथळा करून जर अद्यापि युद्ध बंद झालेलें नाहीं, तर तें यापुढेंही चालू असण्याच्या आवश्यकतेच्या मार्गांत यापुढें तरी कोण येऊन उभा राहणार ? युद्धाची अखेर काय स्वरूपाची होणार याचा निश्चय वास्तविक निसर्गानें ठरवून ठेवलेलाच असला पाहिजे. तो शेवट समजण्याच्या आधींच कांहीं लोक त्या अखेरीबद्दल आतांच खात्रीचें भविष्यकथन करूं लागले आहेत! पण खरें पाहिलें असतां कोणाही न समजतां लढाई कां व कशी जशी एकदम सुरू झाली तशीच एकदम बंद होणेंही शक्य आहे ! सध्यां युद्ध बंद झालें आहे असें तुम्हांला जें वाटलें आहे तें तुमचें वाटणें खरें आहे काय ? एका ग्रँडड्यूकच्या मरणानें जर युद्धाचा निखारा प्रज्वलित होऊं शकतो, तर तशाच एखाद्या अनपेक्षित यःकश्चित् गोष्टीनेंही परिस्थित्यनुसार युद्ध एकदम बंद कां होणार नाहीं ? या गोष्टीप्रमाणेंच त्या युद्धाचा जरी आतां सर्वांनाच कंटाळा आलेला आहे, तरी त्याची पूर्तता होणेंही असंभवनीय आहे, कारण, ज्यांची नामोष्की झालेली आहे अशांनीं तो आपला अपमान भरून काढण्याच्या खटपटींत दंग राहणें स्वाभाविक आहे ! आणि त्यांचा मान त्यांना परत मिळेपर्यंत युद्धाचा निखारा गिझाला

हें म्हणणें व सांगणें असयुक्तिक आहे. तह झाला म्हणतात खरा पण तो अनिश्चित स्वरूपांतच अद्यापि दृष्टीस पडतो आहे; कारण, त्यांत अद्यापि वारंवार फेरफार होताहेतच. असे तह पूर्वीं झालेलेच होते आणि त्यांतूनच जसें हें युद्ध उपस्थित झालें, तद्वतच यांतूनही पुन्हां दुसरें एखादें जगड्व्याळ युद्ध उत्पन्न होणार नाहीं कशावरून? आतां जर एखादें तसें युद्ध उत्पन्न झालें, तर त्याचा मात्र जगावर फारच चमत्कारिक असा कायमचा परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्यामुळें जगद्रचना बदलली जाऊन एक प्रकारचें विशिष्ट वळण त्याला लागेल! युद्ध उपस्थित करणारे मुत्सद्दि जरी सध्यां युद्धनौकेचें वल्हें विश्रांतिस्थानांत ठेवून, स्वस्थ आराम घेताहेत असें दिसतें आहे, तरी तें खोटें आहे! एक अखेरचें युद्ध करून जगच्छांतता करण्याचे त्यांचे अद्यापि अंतर्गत विचार चालूच आहेत, अशा मुत्सद्यांना 'युद्धनिर्माते' या विशेषणानें अलंकृत करण्यास काय हरकत आहे?

कांहीं झालें व कसेंही असलें, तरी इतर होऊन गेलेल्या भूतकालीन् युद्धांप्रमाणें ह्या युद्धाचा खरा शेवट एथेंच झाला असें मानणें अप्रामाणिकपणाचें आहे हें निर्विवाद आहे! सध्यांच्या वातावरणाचें नीट पर्यालोचन करून जी स्थिति दृष्टीस पडते तीच हवी तर ह्या युद्धाची परिसमाप्ति आहे असें ज्याला वाटेल त्यानें म्हणावें! सध्यांच्या वातावरणाची स्थिति बदलून त्या जागीं नवें स्वच्छ वातावरण उत्पन्न करण्यासाठीं जो काळ टपून बसला आहे, त्याला अनुकूल वेळ प्राप्त होण्यासाठींच—सध्यां बंद पडलें आहे असें बाह्यतः वाट-

णारें युद्ध–सुरू असणेंच अवश्य आहे व त्याचा निखारा धुमसतोहीं आहे; व ती संधि येईपर्यंत तो तसाच धुमसत राहणार आहे !

वेडेपणा येतो लवकर, पण जातो फार उशीरा ! दैव फिरलें म्हणजे सर्वच उलटें होत जातें! युरोपची स्थिति अशीच झाली आहे व त्याचा जगावर चमत्कारिक परिणाम घडला आहे । युरोपची फजीती उडवण्याचेंच त्याच्या नशीबानें ठरवलें होतें आणि म्हणूनच तेथील मुत्सद्दि प्रथम भ्रमिष्ट बनले. त्यांचे ते भ्रमिष्ट मेंदु युद्धरसानें भरून गेले आणि त्यानें त्यांच्या सर्व देहांत प्रवेश केल्यामुळें ते युद्धाची प्रत्यक्ष अमलबजावणी करूं लागले. त्याच उद्देशानें त्यांनीं परस्परांचे हात आपसांत बांधून घेतले आहेत. शांतता प्रस्थापित होण्याच्या सरळ मार्गातले जे अडथळे तेच त्यांचे आपसांतले तहनामे होत ! याप्रमाणें परस्परविरुद्ध अशा शक्तींचा समतोलपणा अशा कांहीं स्थितींत आला आहे कीं, त्याचा वजनदार भरीवपणा कोणच्याही भीतिप्रद स्थितीला तुच्छ मानूं शकेल ! ती त्याची स्थिति त्याच्या गर्भाला यत्किंचितही धक्का न बसता शेंकडों ठिकाणीं फुटून जाण्यासारखी आहे ! ही स्थिति दीर्घ काळ टिकणारी आहे !

असें असतांही हें युद्ध जितकें लांबलें जाईल तितकीं त्याच्या लांबणीबद्दलचीं विविध कारणेंही तसतशींच वेळोंवेळीं नवीं नवीं उत्पन्न होत राहतील व ज्यांचें जें नष्ट झालें आहे तें परत मिळवण्याची त्यांची वासना उत्तरोत्तर वाढत राहील. याप्रमाणें युद्धाच्या संधि

काळाच्या वृद्धि करण्याचे संधि उत्तरोत्तर जास्तच उत्पन्न होतील व तें जितकें लांबेल तितकाच त्याचा त्यायोगें शेवटही लांबतच जाईल! अजून तरी तें युद्ध लांबणार असेंच वाटत आहे! तें जरी निराशेनें अखेरचें म्हणून लढण्याचा कोणी प्रयत्न केला, तरी त्याची अखेरी मात्र दूरच असणार हें ध्यानांत असूं द्यावें! खरोखरच, हें युद्ध लांबण्याच्या मार्गांत एक अडथळा होता यांत संशय नाहीं. तो अडथळा काटकसरीच्या खर्चाचा होता; पण युरोपीय राष्ट्रांनीं त्या अडथळ्याला क्षुद्रांतःकरणानें लाथाडून टाकलें. वास्तविक पाहिलें असतां त्या काटकसरवाल्यांची त्यांत कांहीं चूक नव्हती; कारण, युद्धसाहित्याचा व तें लढणाऱ्यांचा आणि लढविणाऱ्यांचा फारसा नाश न होतां थोड्या महिन्यांच्या अवधींतच तें संपेल अशा अंदाजाचें त्यांनीं आधींच भाकित करून ठेविलें होतें; पण सशाच्या शिकारीला जावयाचें असेल तर वाघाच्या शिकारीची तयारी करावी लागते हें सामान्य व्यवहारांतलें तत्व ते आपल्या आगच्या अति शहाणपणाच्या अदूरदर्शी मुत्सद्देगिरींतल्या आंकडेशास्त्राच्या भ्रमांत साफ विसरून गेले होते. त्याचाच परिणाम दीर्घकाल युद्ध टिकण्यांत झाला. अन्यायांनीं जरी हवी तेवढी, शांतता अथवा नाश या मंत्राची मोठमोठ्यानें ओरड केली, तरी कोणचेंही राष्ट्र आतां त्याकडे लक्ष देणार नाहीं. तीं सर्व रुचिभ्रष्ट झालीं असल्यामुळें, त्यांना अनुभवाला येतो आहे त्यापेक्षां अधिक असा त्यांचा कधींच नाश झालेला आहे. त्यांचा जों जों अधिक नाश होतो आहे तों तों तीं त्याला कस्पटाप्रमाणें बिनदिक्कत मानीत असून, तो त्यांचा नाशच

त्यांना युद्धाचें अधिक प्रोत्साहन देऊन, युद्धानेंच आपल्या उदरांत उतरवीत आहे. त्यांचा जों जों अधिक नाश होत चालला आहे तों तों तीं राष्ट्रें अधिकाधिकच निराशेनें जिवावर उदार होऊन युद्धासारखा सर्वश्रेष्ठ असा रक्तबंबाळ करणारा खेळ खेळताहेत !

युरोपांतल्या युद्धमान् राष्ट्रांच्या युद्धसामुग्रीचे झरे जसजसे आटत जाऊं लागले आहेत तसतसे तीं शेवटचा प्रयत्न म्हणून, अधिक खडतर संकटांत पडत आहेत ! त्यांच्याजवळ जोंपर्यंत रणयज्ञांत आहुती देण्यास मनुष्यबळ सज्ज राहील तोंपर्यंत—त्यांच्यापुढें असलेल्या हालत्या सरहद्दींचें संरक्षण करण्यास तीं रूबरू राहणारच ! कारण, 'जगावें कीं मरावें' या उद्देशानेंच त्यांच्यापुढें तें युद्ध अवतीर्ण झालेलें आहे ! विश्वासघातानें केलेली ठकबाजी आणि विफल झालेली आशा यांबद्दलचा पश्चाताप करण्याचा दिवस उजाडेपर्यंत हें युद्ध थांबणें अशक्य असल्याबद्दलची त्यांची बालंबाल खात्री झालेली आहे. असें आहे तरी, त्यांना जोंपर्यंत मानवी बल रणक्षेत्रांत रक्ताचे सडे घालायला अनुकूल होतें आहे, तोंपर्यंत तीं राष्ट्रें, जाणूनबुजून आत्मघातापासून परावृत्त होणें अशक्य आहे. यावरून उद्याचा दिवस हा या लोकांसाठीं आहे असें ठरत नाहीं काय ?

कांहीं अकल्पित अशा शास्त्रीय अथवा सैनिक जादूनें -सध्यापेक्षां अनपेक्षित अशा अधिक मारक शस्त्रास्त्रांचा या अवसरांत मध्येंच शोध लावला, दैवानें उलट खाल्ली, ज्याला तीं राष्ट्रें सध्यां विजय आणि शांतता असें म्हणत आहेत तें सर्व शक्य ठरलें तरी हें युद्ध संपणार

आहे काय? किंवा संपलें असें म्हणतां येईल काय? नांव काढूं नका!

अनिश्चित अशा सद्य:काळीं घडत असलेल्या गोष्टी जोंपर्यंत अबाधितपणें घडत राहतील, तोंपर्यंत—हें युद्ध जरी भस्मीभूत झालें आहे असें मानिलें, तरी त्या स्वत:च्या राखाडींतून तें पुन्हां उद्भूत होईल! शंकरांनीं कामाला भस्मीभूत केला, तरी तो रक्षारूपानेंच अविचारी जनांना पापमार्गाकडे खेंचीत नेत नाहीं काय? तह मुदतीचा ठरेल, विजयप्राप्ति ही केवळ संधि ठरून, तिच्यांतून नवें युद्ध जन्म पावेल आणि त्याचा रक्तपात बहुतेक भूतकालीन् मित्र-राष्ट्रांतच होईल! कारण, नाश पावलेल्या आणि सशस्त्र राष्ट्रांमधल्या हकीकतींच्या तडजोडी इतकी भयंकर गोष्ट दुसरी कोणचीच नसते!

यांशिवाय जगतांत आणखीं दुसरीं सशस्त्र आणि उत्तम सशस्त्र अशीं जशीं इतर राष्ट्रें आहेत, तद्वतच—अहंकार, तेज आणि निष्फळ कलमी महत्वकांक्षा—या सर्व गोष्टी आपली पाळी केव्हां येते म्हणून टपून बसलेल्या आहेतच! इतकेंच काय, पण बंडखोर ठरलेलीं राष्ट्रेंही संधींची वाट बघत आहेतच.

तरमग--उद्यांचा भावी दिवस--हा त्यांचा कल्पना केलेला उग-वणारा दिवस त्यांच्यासाठीं नाहीं काय? घडत असलेल्या ज्या अप्रिय व किळसवाण्या गोष्टी नष्ट होण्याचा जो अखेरचा दिवस ठरेल त्याच दिवसाच्या पुढच्या दिवशीं नव्या आठवड्याच्या सुर-

वातीच्या पहिल्या दिवसांतून नव्या प्रफुल्ल जगाच्या नव्या वातावरणांतल्या उत्तम गोष्टी घडायची सुरुवात होणार आहे !

## —गुलामगिरीचा अखेरचा दिवस—

जगभर जे निरनिराळे मानवी संघ पसरलेले आहेत—त्यांच्यांत युरोपांतील राष्ट्रांतल्या लोकांनीं हलके हलके चंचुप्रवेश करून ते त्यांचें राखणदार कुत्रे बनले. त्यांनीं तें आपलें राखणदारीचें काम अत्यंत अघाशीपणानें मोठ्या निष्ठुरतेचें केलें. त्या ढिल्या, सुस्त व मागसलेल्या निरनिराळया जनसंघांशीं ते निर्दयतेनें वागले. त्यांनीं त्यांचे हातपाय आणि सुळे दांत जिवंत मांसांतच बद्ध केले. ते राखणीचे युरोपीय रक्तपाति कुत्रे जर आपसांत लढून नाश पावले नसते, तर त्यांच्या त्या खादाडपणाच्या तीव्र लालसेपुढें त्यांनीं कशाची बाकी ठेवली असती-अथवा राहिली असती ? हीं संरक्षक म्हणून आपल्याला आपणच म्हणवून घेणारीं युरोपांतलीं राष्ट्रीय रक्षक कुत्रीं, जर एकोप्यानें राहिलीं असतीं, तर त्यांनीं जगाला शृंखलाबद्ध करून, त्याच्या उत्साहाच्या वाढींत अर्धांगवात उत्पन्न केला असता आणि त्याच्यावर ओकारी येईपर्यंत ताव मारण्यासही कमी केलें नसतें !

इ. स. १९०० मध्यें त्या युरोपियन राष्ट्रांनीं स्वार्थप्रेरित होऊन जर्मनीच्या नेतृत्वाखालीं पेकीनमध्यें कोणकोणचे अत्याचार एकमतानें केले ते आम्हांला माहीत नाहींत काय ? ज्या अत्याचारांबद्दल

मित्रराष्ट्रें सध्यां जर्मनीची निंदा करीत आहेत, तेच अत्याचार त्या वेळीं त्यांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं केले असल्याची साक्ष इतिहास देतोच आहे ! यावरून, तीं राष्ट्रें कोणचें बरें कर्म करण्यास उद्युक्त होणार नाहींत ? त्यावेळीं त्या राष्ट्रांचें स्वामित्व अखिल जगतावर स्थापन करण्याची संधि त्यांना मिळाली होती, पण त्यांच्या दुर्दैवानें म्हणा किंवा त्यांच्या मस्तीनें म्हणा—ते जी सुधारणा करण्यासाठीं म्हणून एकजुटीनें तेथें गेले होते, ती त्यांची जूट त्या देशांत उलट त्रासदायक व सर्वनाशक ठरून, त्या सुधारणेच्या कल्पित यंत्राचे तुकडे तुकडे उडाले. अधिकार चालविण्याची त्या राष्ट्रांची शक्ति त्यांच्याबरच उलटली आणि त्यांचा संघ फुटून तीं एकमेकांना पाण्यांत पाहूं लागलीं. त्यांचा समतोलपणा जगाच्या कल्याणासाठीं भंग पावला !

सुधारणेच्या मार्गांत मंद गतीनें जात असलेले लोक कधीं कधीं निःशस्त्रप्रतिकारानें, तर कधीं कधीं सत्याग्रहानें या गुरगुरणाऱ्या सजीव रक्षक कुत्र्यांची रग जिरविण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा स्थितींत हे सुधारलेले म्हणविणारे त्यांच्यांत फूट पाडून आपापसांत कलागती लावतात, आणि आपला कार्यभाग साधण्याचा प्रयत्न करतात ! कधीं कधीं ते निर्बलांचें ऐक्य फोडण्यासाठीं शस्त्रास्त्रांचाही राक्षसी उपाय अमलांत आणतात; याचें अगदीं अलीकडील उदाहरण म्हणजे, जालियनवाला बागेंतल्या हजारों निर्बल आणि कच्च्याबच्च्यांच्या निर्दयतेच्या प्राणनाशाचें जें चित्र तें स्मरणांतून कसें नष्ट

होईल ? सध्यां ते धनी बनले आहेत, पण चक्रनेमिक्रमानें त्यांनाही दास्यत्व येणारच ! ते म्हणजे नेहमींच धनी किंवा गुलाम राहणार आहेत असें नाहीं. सध्यांचा काळ दास्यमुक्ततेचा आला आहे व तसा दिवस जगावर लवकरच उजाडणार आहे !

झालेलें महायुद्ध हें–खरें पाहिलें तर–गुलामगिरीचा अखेरचा दिवस, किंवा दास्यमुक्ततेचा अरुणप्रकाशच होतें असें म्हटल्यास बाध येणार नाहीं. पण हें, तें करणाऱ्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें व अद्यापिही नाहीं. स्वतांच्या जुवाडाखालीं जगांतील मानवी जातींना गुंतवल्या असतां, दुसऱ्यांनीं बनवलेल्या गुलाम राष्ट्रांना-आपलीं तशींच ठेवून-मुक्त करण्याचा कांहीं राष्ट्रें हास्यास्पद प्रयत्न करताहेत याला काय म्हणावें ? स्वतःच्या पायांखालीं काय जळतें आहे तें दिसत नाहीं असें नाहीं, पण स्वार्थ त्यांना तशाच स्थितींत ठेवीत असल्यामुळें दुसऱ्यांच्या पायांखालची आग विझविण्यास धांवून, आणखी कांहीं स्वार्थ साधला तर पहावा अशी त्यांची वासना आहे; पण आतां ती लबाडीची स्वार्थी युक्ति त्यांनीं या काळांत साफ विसरावी हेंच बरें. कारण जगानें त्यांना आतां चांगलें ओळखलें आहे ! ते दुसऱ्यांच्या बादशाह्यांच्या विरुद्ध लढताहेत ! पण ज्यांनीं जिंकलेल्या मानवी जातींवर अत्यंत निष्ठुरतेचे आघात केले आहेत, अशांचें शत्रुत्व पतकरण्यास आतां यापुढें खुशीनें कोण तयार होणार ?

युरोपांतलीं जीं लहान राष्ट्रें गुलामगिरीच्या शृंखलेनें बद्ध झालीं आहेत, तीं दास्यत्वांतून इतक्यांत सुटतील असें निश्चयानें सांगणें

जर कठिण आहे, तर आशिया खंडांतल्या राष्ट्रांसंबंधानें तरी निश्चित असें काय सांगावें? पण इतकी गोष्ट मात्र सत्य आहे कीं, आशिया आणि आफ्रिका या खंडांतील जीं जीं मोठालीं विस्तृत राष्ट्रें आज गुलामगिरीच्या पंकांत लोळत पडलेलीं दिसताहेत, त्यांच्या मुक्ततेचा दिवस जवळ जवळ येत चालला आहे हें खास !

मोठ्या कळवळ्यानें व कृतज्ञपणें ज्या अरबलोकांची तुर्कांच्या निर्घृण जाचांतून मुक्तता करण्यांत आल्याचें कौतुक सांगण्यांत येतें, त्यांना जणूं काय स्वातंत्र्य आणि जीवन यांची—नुकती नुकती परवां-पर्यंत चाड नव्हती व ती त्यांना नवी शिकविण्यांत पाश्चिमात्त्यांनीं त्यांच्यावर मोठाच उपकाराचा बोजा करून ठेवला आहे ! त्यांच्या सर्वसाधारण धर्ममतापेक्षां त्यांच्या सर्वसाधारण प्रारब्धानेंच त्यांच्यांत त्वरेनें ऐक्य उत्पन्न करून, त्यांचा उल्हास वाढल्यानेंच अटलांटिक पासून तांबड्या समुद्रापर्यंत व तांबड्या समुद्रापासून इराणच्या आखातापर्यंत त्या सर्व विस्तारलेल्या प्रचंड आरबांची दास्यत्वापासून मुक्तता झालेली नाहीं काय ?

आरबस्तान, ईजिप्त आणि ट्रिपोलीपासून तों मोरोक्कोपर्यंत जो आरब जातीचा प्रचंड विस्तार पसरलेला आहे, तो योग्य पुढाऱ्या-कडून एक स्वतंत्र बलाढ्य राष्ट्र बनण्याचीच वाट पहातो आहे ! प्रचंड आणि मोठ्या विस्तृत मानवी जातीनें दीर्घ कालापासून अपेक्षिलेला पुढारी त्यांना निसर्गदत्त मिळतो व तो पूर्ण विजयी होईपर्यंत त्याचें वारंवार पुनरावतरण होत असतें आणि अखेरीस

र्णावतारांत 'विनाशाय च दुष्कृतां' तो जन्म घेऊन स्वजातीचें ममतेनें परिपालन करून दुष्टांचें शासन करतो.

हीच स्थिति आमच्या भारत-भूमातेची आहे! आरबस्तानाप्रमाणें हिंदुस्तानालाही स्वातंत्र्याचें स्वराज्य मिळणार नाहीं काय? 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥' हें भगवद्वाक्य कधीं तरी खोटें होऊं शकेल काय? जी हिंदभूमी आज सर्व जगाला अमृत पाजत आहे, ती तिच्या आम्हां लेंकरांना आतां फार दिवस दास्यत्वांतलें जहर पिऊं देईल काय? छेः! नांव सुध्दां काढूं नका त्या गोष्टीचें! आतां तो तिच्या स्वातंत्र्याचा दिवस फार जवळ येऊन ठेपला आहे! तो त्या आमच्या लाडक्या जन्मभूमातेच्या स्वातंत्र्याचा भविष्यत्कालांतला उद्यांचा भावी दिवस, सांप्रतच्या दास्यांतल्या रात्रीच्या अगदीं अखेरच्या प्रहराजवळ मार्ग आक्रमित आलेला असून, तो आतां लवकरच भगवत्कृपेनें अरुणोदयांतल्या सुवर्णकिरणांत रंगला जाणार आहे, हें आप्रिय देशबांधवहो, पक्कें लक्षांत ठेवा! तो दिवस बघायला मी पुन्हां तुमच्यांत अन्य स्वरूपानें येणार आहें; कारण पुनर्जन्मावर माझा पूर्ण भरंवसा आहे!

आरबजातीच्या लोकांना तुर्कांनीं अत्यंत निष्ठुरतेनें वागविल्यामुळेंच त्यांच्यांत ऐक्य उत्पन्न झालें आहे. तुमच्यांतही तशीच ऐक्याची मगरमिठी होऊं द्या! त्यांच्यांत जसा एकजीव उत्पन्न झाला आहे तसा तुमच्यांतल्या विविध जातींत आणि पंथांत एकजीव

उत्पन्न करा! त्यांनीं आपली एक प्रचंड राष्ट्रसत्ता उभारण्याचें जसें योजिलें आहे तशीच तुम्हीही योजना करा! इंग्रजांकडूनच तुम्हांला आतां पूर्ण स्वातंत्र्य खास मिळणार आहे! तुम्ही उद्यांच्या दिवशींच्या स्वातंत्र्याकडे आरबांप्रमाणेंच उत्सुकतेनें पाहात राहा—म्हणजे तो तुम्हांला लवकरच दिसेल! कारण त्यांना पश्चिमेस जो दिसला आहे तोच तुम्हाला पूर्वेस दिसणार हें निश्चित आहे! आपणांप्रमाणें आरबलोक जरी भगवद्गीता वाचणारे व तिच्यावर श्रद्धेनें भक्ति करणारे नाहींत तरी त्यांच्या धर्मग्रंथांत कांहीं ती स्वातंत्र्याची सुप्रभात कोठें अशुभ मानलेली नाहीं. जो सध्यां आरबांना दिसला आहे तो तुम्हांला दिसणारा प्रभात काळ, भूतदयेला सिंहासनाधिष्ठित करून—हिंदुस्तानचें तेज जगावर फांकविणार असल्यामुळें, तो बघण्याची राहिलेली माझी आशा मला पुन्हां भूमंडळावर घेऊन येण्यास मोठ्या त्वरेनें निघाली आहे! मी लवकरच तुमच्यांत येऊन मिसळेन अशी माझी पूर्ण खात्री आहे! माझी वाट पाहा! मी आलोंच!!

झालेल्या युद्धांत थकून क्षीण झालेल्या राष्ट्रांना आतां जो धडा मिळाला आहे, त्या धडयावरून तीं खिळखिळीं झालेलीं राष्ट्रें आतां इतउत्तर जुनाट वृद्ध राष्ट्रांवर आपली जुलूमजबरी अव्याहतपणें चालूं न ठेवतां व त्यांना निर्दयतेनें न वागवितां, बालराष्ट्रांना तीं छळणार नाहींत; कारण, बेल्जम कांगोची इतिश्री झालेली आहे! ज्या युरोपीय राष्ट्रांनीं आजपर्यंत जगतांत अव्यावाधि गुलाम करून सोडले, त्यांच्या घरांतच एखादा तरी त्यांच्यांतलाच गुलाम कसा नसूं शकेल?

तेथें जुने गुलाम तर आहेतच पण त्यांच्यांत आणखी नव्यांची भरती झाली आहे, होत आहे आणि होणारही आहे ! कारण, निर्दय व्याजोक्तीनें झालेल्या या स्वातंत्र्योन्मुख युध्दामुळें, जीं राष्ट्रें युरोपांत कालपर्यंत स्वतंत्र होतीं तीं आज आपल्याच कृतीनें परतंत्र झालीं आहेत. सर्वियाचेंच उदाहरण घ्याना ! युद्धाच्या प्रारंभीं जो सर्विया देश ज्या पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेत होता तें त्याचें स्वातंत्र्य सध्यां कोठें तरी दिसतें आहे काय ? त्याच्या ज्या सध्यां हालअपेष्टा दुर्दैवानें झाल्या आहेत, त्यांचा युद्धारंभीं मागमूस तरी होता का ? पण त्या कशा असतात, यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठींच त्यानें ग्रँड डयूकच्या खुनाचें कर्म केलें. तें कर्म जर त्यानें केलें नसतें, तर त्याला तो अनुभव कसा बरें घेतां आला असता ? त्याच्या इतर भाईबंद राष्ट्रांनीं या त्याच्या सद्यःस्थितीपासून धडा घेऊन वेळींच सावध व्हावें हें बरें !

जुने अथवा नवे कोणचे कां गुलाम असेनात--त्या सर्वांच्या वैभवाचा दिवस जवळ जवळ येत चालला आहे; पण तो केव्हां दिसणार आहे ? त्यांचे संरक्षक सरकारी अधिकारी त्यांच्यासाठीं त्यांच्या शत्रूचें बाहेरून निवारण करतील तेव्हां काय ? छेः ! मुळींच नाहीं ! उद्यांच्या भविष्यत्काळीं युरोपांतलीं सर्व राष्ट्रें व त्यांच्यावर जुलूम करणारे या सर्वांना ज्या दुष्ट व निर्घृण सर्वसाधारण शत्रूनें ग्रासून टाकून गुलामगिरींत अडकविलें आहे, त्या शत्रूचा त्यांच्याच घरांत युरोपांत नायनाट झाल्याबरोबर तो उद्यांचा सोन्याचा दिवस उगवणार आहे! तोंपर्यंत सर्वच गुलाम आहेत !

अशा त्या उद्यांच्या दिवशींच या युद्धाचा खरा शेवट होणार आहे, आणि तोच दिवस सर्वांची गुलामगिरींतून मुक्तता करणार आहे ! लहान मोठीं, जित अथवा विजयी अशीं युरोपांतलीं सर्व राष्ट्रें व एशिया आणि आफ्रिकेंतलीहिं सर्व परतंत्र राष्ट्रें, ती काळी-कुट्ट रात्र संपल्याबरोबर दुसऱ्या दिवसाची स्वातंत्र्याची शुद्ध अमृतमय सकाळ मोठ्या उल्हसित अंतःकरणानें पाहणार आहेत ! तो दास्यमुक्ततेचा दिवस—इतर गोष्टींप्रमाणें सर्व पंचांगांतून ठळक अक्षरांत लिहिला जाऊन सणाप्रमाणें सर्व पृथ्वीवर एकसमयावच्छेदें-करून पाळला जाणार आहे; भूतदयेच्या खऱ्या उत्कर्षाचा तोच खरा प्रातःकाळ !

## —अखेरची काळ—रात—

युरोपांतल्या बहुतेक राष्ट्रांतून बंडें होतील असेंच जनता बोलत असून, तशी सर्वत्र भावना झाल्याचेंहि आढळून येतें. ही गोष्ट जर तेथील राज्यचालकांना माहीत नसेल, तर ते खरोखर बहिरे आणि आंधळे आहेत असेंच म्हणणें आतां प्राप्त होतें. ही गोष्ट आम्हांस माहीत नाहीं असें जरी ते म्हणाले आणि ती गोष्ट समजावून घेण्याचें जरी त्यांनीं नाकारिलें, तरी त्या गोष्टीसंबंधानें त्यांचीं मनें अर्धवट जागृत झालेलीं असून, त्याबद्दलची भीति त्यांच्या हृदयांत उत्पन्न झालेली आहे, ही गोष्ट त्यांच्या कृति न्याहाळल्या आणि त्यांचीं संदिग्ध भाषणें मनःपूर्वक ऐकिलीं म्हणजे ताबडतोब निदर्शनाला येते ! राष्ट्रांराष्ट्रांतून बंडें उद्भवतील, ही जी कल्पना ती कांहीं

कोणच्याही प्रकारें युद्धाचा काळ दीर्घ होण्यास कारणीभूत होणारी नसून, युद्ध जितकें अधिक काळ लांबेल तितकीं त्यांतून बंडें अधिक प्रसवतील. सध्यां चालू असलेला प्रकार व युद्ध सुरू झालें त्यावेळीं मुत्सद्यांनीं तें सुरू करण्याचीं सांगितलेलीं कारणें, यांचें पर्यवसान याच बंडाच्या अखेरीस होणार, अशाच तऱ्हेच्या त्या सर्व योजना केलेल्या होत्या यांत शंका नाहीं.

ज्यांनीं युद्ध लढण्यास सुरुवात केली व जे त्यांचे साथीदार आहेत त्यांचें जरी कांहीं कारण नसलें, तरी युद्धाला स्वतःचाच तें होण्याचें कारण होतें. त्या त्याच्या कारणाकडे तें लढणाऱ्या व लढविणाऱ्यांनीं जरी लक्ष देण्याची पर्वा केली नाहीं, तरी अखेरीस तें कारण त्यांना जबरदस्तीनें समजून घेणें प्राप्त होईल! तें कारण अति साधें व सरळ आहे! युरोपांतील जनतेच्या रहाणीच्या व कार्यकर्तृत्वाच्या जुन्या तऱ्हेच्या सर्व पायांचें उच्चाटन होऊन, त्यांच्या ठिकाणीं नव्या प्रकारच्या सत्यत्वाच्या सुधारणेचे पाये उभारायचे असल्यामुळें, युरोपचें खड्ग युरोपनें आपल्या विरुद्ध आपल्याच छातींत खुपसून घेऊन, तेथें दडून बसलेला जो एक भयंकर राक्षस आहे तो ठार होईपर्यंत एकसारखें पडताळींत राहिलें पाहिजे हें सत्य आहे.

शांततेचा तह म्हणाल, तर युरोपच्या बाहेरच्या लोकांत घडून येईल, पण युरोपांतली जनता व त्यांचीं राष्ट्रें चालविणारे राज्याधिकारी यांच्यामध्यें मात्र कधींच तह होणें शक्य नाहीं. युरोपांतील जनता ज्या भयंकर रोगाच्या साथींत सांपडून तिचे हाल होताहेत,

तीं सांथ कांहीं तेथील राष्ट्राधिकाऱ्यांच्या सिंहासनांतून उगम पावलेली नाहीं; पण तेथील मुत्सद्दी तसें भासवितात, तिला तसें रूप देतात आणि त्या स्वरूपांत तिचें पुनरावतरण करितात. ती सांथ राज्यचालकांच्या कृतींतल्या गुप्त हेतूंतून निष्पन्न झाली आहे, ही गोष्ट त्यांची संदिग्ध भाषाच सिद्ध करते आहे ! सत्ताच जेव्हां त्या संदिग्ध भाषणाचा धि:कारपूर्वक तिरस्कार करून उच्चारणाऱ्यांना शरमेनें खालीं माना घालायला लावते, तेव्हां त्यांच्या त्या निर्लज्जपणाची स्वयंभु मूर्ति त्यांच्या नेत्रांपुढें उभी राहते. त्या शरमेनें मग ते अंतर्यामीं जरी विव्हळ होतात, तरी मोठेपणाचा गर्व त्यांना त्यांच्या दुष्कृतींपासून पराङ्मुख होऊं देत नाहीं. खरें पाहिलें असतां, जनतेचें खरें कल्याण करण्याची तशा लोकांनीं जर मनांत वृत्ति धारण केली, तर अजूनही त्या दुष्कीर्तीच्या प्रसंगांतून सुटून जायला त्यांना एक सरळ मार्ग राहिलेला आहे. त्यांनीं आपल्या अंत:करणांतले सर्व स्वार्थी बेत प्रथम झुगारून देऊन आपलें वर्तन सत्यतत्त्वावरच चालूं करावें आणि जनतेपुढें झालेल्या चुकांचीं खरीं कारणें मांडून तंटा मिटता घ्यावा, हाच तो सरळ मार्ग होय ! पण हें व्हावें कसें ? युरोपांतल्या कोणच्या राष्ट्रांतलें मंत्रिमंडळ ही गोष्ट अंगिकारण्यास पात्र आहे ? जर तसें करण्याचें कदाचित् कोणी मनांत आणलेंच, तर अहंमन्यतेच्या मोठेपणाचा गर्व त्यांच्या रस्त्यांत आ पसरून उभा राहील ! तेव्हां ही गोष्ट युरोपच्या सर्वसाधारण जनतेनेंच जर अंगिकारली तर होणार आहे ! पण ही गोष्ट तेथील जनता केव्हां अंगि-

करील ? तिला जेव्हां तिच्यापासून लपवून ठेवलेल्या गोष्टींचा प्रकाश तिचे डोळे दिपवील तेव्हां !

आजमितीला त्या जनतेला फक्त मृत्यूची सत्यता पटलेली आहे ! बाकीच्या सर्व खऱ्या स्वरूपांत भासविलेल्या खोट्या गोष्टी तिनें ऐकल्या आहेत. त्या कोणच्या ? तर युद्धविषयक् उद्देशाचें खोटें आविष्करण व युध्दाच्या अखेरी बद्दलच्या बाता ! त्या बाता मारण्याच्या उद्देशाच्या गप्पा, आणि त्याचा शेवट व पूर्वस्थिति कशी होती, सद्यःस्थिती काय आहे व पुढें कशी स्थिति प्राप्त होणार याबद्दलचें शब्दाचें केलेलें खोटें मायावी प्रदर्शन ह्या त्या होत ! पण ह्या सर्व खोट्या खोडसाळपणाच्या सत्यता एके दिवशीं चिंधड्या चिंधड्या उडवणार आहे हें त्याच्या स्वप्नींही अजून येत नाहीं, यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं.

अशी एक काळ—रात्र आतां उत्पन्न होणार आहे कीं, त्या रात्रीच्या अखेरीस हें युध्द एकदम बंद पडेल अथवा त्यांतून दुसरेंच एखादें प्रचंड युध्द उत्पन्न होईल, आणि तेंच युध्द अखेरचें असें ठरलें जाईल! कारण, ज्या गोष्टींतून ह्या युध्दाचा जन्म झालेला आहे, त्याच गोष्टींच्या विरुध्द अखेरच्या युध्दाचें रणशिंग फुंकलें जाणार आहे, ही गोष्ट सध्यांच्या परिस्थितीवरून सत्य मानण्यास हरकत नाहीं. रणयज्ञांत ज्यांच्या प्राणांच्या आजपर्यंत या युध्दानें असंख्य आहुत्या पाडल्या आहेत व त्या पडण्यास जे कोणी कारणीभूत झाले आहेत, त्यांच्या प्राणांच्या आहुत्या ज्या अखेरच्या रात्रींत सूड म्हणून

पडणार आहेत, तीच काळ–रात्र अखेरची मोठी अशी मानण्यांत येईल! आतां ही गोष्ट घडून येण्याच्या बाबतीची शंकाच उरली नाहीं. कारण, ती गोष्ट अपरिहार्य आहे. त्याला आतां दुसरा मार्गच नाहीं. ज्या गोष्टी आतां आंवाक्याच्या बाहेर गेल्या असल्यामुळें हातच्या राहिल्या नाहींत, त्याच स्पष्टपणें ही गोष्ट सिद्ध करताहेत!

हे युरोपांतील सर्व राष्ट्रांच्या मुत्सद्यादि मंत्रिमंडळांनो, तुम्ही आपल्या भुलथापांनीं आपल्या जनतेला आतां यापुढें अजून किती दिवस लुंगवणार आहांत? तुमच्या अंतस्थ हेतूंना, भुलथापा मारून आणखी किती दिवस त्यांच्यापासून लपवून ठेवणार आहांत? जे तुमचे हेतु केवळ निराशाजनक आहेत, जे तुमच्या युरोपच्या जनतेच्या भावी सर्वोत्तम प्रगतीच्या सुधारणांचे शत्रु आहेत—हें तुम्ही जाणतां आहांत, त्यांच्या भ्रामक कल्पनातरंगांवर त्यांना आतां किती दिवस भुरळ पाडून गुंगवणार आहांत? तुमच्या सर्व स्वार्थी हेतूंचे वधस्तंभावरील फांसांनीं गळे दाबून प्राण घेतल्यावर तरि ते तुमच्या जनतेपुढें नग्न स्वरूपांत प्रविष्ट होतील ना? त्यांचा जो आजपर्यंत तुम्ही नाश केला आहे, त्याची सत्यता आतां तुम्ही त्यांच्यापासून कशी दडवून ठेवूं शकाल? कां त्यांना ती सत्यता पटवून घेण्यासाठीं मृत्यूला आमंत्रण देऊन पुनर्जन्म घ्यावा लागणार? काय तें आतां खरें बोला! असत्याची कास सोडा!

तुम्हांला जें जबरदस्त देणें झालें आहे—जें झालेलें देणें फेडणें आतां तुम्हांला अशक्यसें वाटतें आहे, त्याची सत्यता—त्यांच्यावर त्या

हताश आणि निर्बल झालेल्या जनतेवर करांच्या रूपानें लादून-आतां तुम्ही लपवूं शकाल काय ? त्यांच्या निढळाच्या घामाचें रूपांतर त्यांच्या शिल्लक असलेल्या रक्ताच्या करांत नष्ट होईपर्यंत, त्यांच्या-पासून खऱ्या गोष्टी तुम्ही लपवून ठेवणार काय ? आज जें त्यांचें तुम्हीं अब्जावधि देणें आहांत, तें त्यांचें देणें; द्यावयाच्याऐवजीं तेच उलट तुमचे अब्जावधि देणेदार होईपर्यंत तुम्ही खऱ्या गोष्टी त्यांच्या पासून लपवून ठेवणार काय?

अशा तऱ्हेच्या या पर्वताची उभारणी करून—जो तुम्हांला चिर-डून टाकतो आहे, त्यांतून तुमचे जीव वांचविण्यासाठीं त्यांचेही तुम्ही आपल्याबरोबर बळी घेणार कीं काय ? पण ते आतां ही गोष्ट कबूल करणार नाहींत. युरोपच्या जनतेच्या देहाच्या मुडद्यांच्या पर्व-तप्राय ढिगाऱ्यांवर तुम्ही आजपर्यंत जसे तांडव केलेंत, तसेंच ते आतां—तुमच्या हृदयांतल्या खोटया उद्देशांचा ढिगारा करून त्यावर तांडव करण्याचेंच पसंत करतील !

तुमची कधींच न भागणारी अशी अतृप्ततेची भयंकर नफ्याची तहान, तुमची द्रव्य आणि अधिकारबळाची अतृप्ततेची हांव आणि अभूतदयेच्या निष्ठुरतेची तुमची अप्रामाणिकपणाची लूट करण्या-ची दुष्ट वासना ह्या ज्या गोष्टी या युद्धाच्या मूळप्रदेशीं ऐक्यानें वास करीत आहेत, त्या तुम्ही तुमच्या जनतेपासून आतां किती दिवस लपवून ठेवणार? त्या तुमच्या मुळथापांत तूम्ही लपवून, ठेवलेलें विष जें त्या जनतेचें प्राणहरण करीत आहे, तें त्यांनीं कसें शोधून

काढावें ? पण तें शोधून काढल्यावांचून त्यांना आतां गत्यंतरच राहिलें नाहीं. तें त्यांच्या मुखांत असलेलें विष त्यांनीं शोधून काढल्यावर, ते तुमच्या मुखांवर त्यांनीं थूंकून टाकल्यास त्यांचा त्यांत काय गुन्हा घडेल !

शेजाऱ्यापाजाऱ्यांचे देह आणि द्रव्य यांवर जो बुद्धिबलाचा डाव तुम्ही खेळताहांत, त्याचा तुमच्या जनतेला एकाएकीं जर दृष्टांत झाला, आणि त्यांनीं त्या दृष्टांताचें खरें स्वरूप म्हणजे तुम्ही ज्याला राज्यसंस्थान म्हणतां तें निव्वळ थोतांड असून, केवळ एक प्रकारची भ्रामक छायाग्रस्त गुमास्तेगिरी असून, त्या गुमास्तेगिरीसाठीं आवश्यक अशा हमी आणि स्वत्व या गोष्टींसाठीं ज्यांनीं आपल्या रक्तानें सह्या केल्या आहेत, त्यांची साक्ष त्यांना पटल्यावर तुम्ही काय करणार ? खासगी स्वार्थासाठीं घडत असलेल्या ज्या गुप्त गोष्टी त्यांच्यावर अधिकार चालवीत आहेत त्या जेव्हां त्यांच्या दृष्टोत्पत्तीला येतील, त्यांचें शौर्य उल्हासित करण्यासाठीं तुमच्या शब्दावडंबरांच्या अंतर्यामीं ज्या खासगी फायद्यांच्या गोष्टींच्या घडामोडी होताहेत त्या जेव्हां त्यांच्या निदर्शनास येतील, त्यांच्यापैकीं रणयज्ञांत स्वाहा झालेल्यांच्या देहसंतर्पणावर तुम्ही काय फायदा करून घेतला आहे तो जेव्हां त्यांना कळेल त्या वेळीं, अरेरे तीं तुमची जनता, ते तुमचे लोक ज्यांना तुम्ही एकमेकांचे प्राण घेण्यास कुत्र्याप्रमाणें उद्युक्त करीत आहांत, ते तुमचे भाऊबंद तुमच्या विरुद्ध होऊन तुमच्या सभोंवतीं खात्रीनें जमतील आणि तुम्हांला छिन्न-

विच्छिन्न करण्यासाठीं तुमचे लचके तोडूं लागतील, तेव्हां तुमची मानसिक स्थिति काय होईल ? तुमच्या सहस्त्रमुखी राष्ट्रीय अहंकाराच्या गिधाडाला जेव्हां ती तुमची जनता एकमतानें फाडून टाकील तेव्हां कसें होईल ?

बिचाऱ्या गरीब अडाणी मानवजाति तुमच्या भुलथापांना सहज भुलल्या जातात आणि त्यामुळें तुमचे रणमखांतले डावही तुम्हांला त्यांच्या रक्तावर खेळण्यास आयास पडत नाहींत ! तशा त्या गुलामांचे कळपच्या कळप रणमैदानाच्या कत्तलखान्यांत बकऱ्यांप्रमाणें स्वार्थासाठीं तुम्ही कत्तल करण्यासाठीं घेऊन जातां–पण त्यांपैकीं युद्ध करण्याची वासना कोणालाही नसते. असे ते लोक आपखुषीनें लढायला जातात काय ? मुळींच नाहीं. त्यांची प्राणहत्या करायला जे कोणी कारणीभूत होतात, त्यांचीं हृदयें विषमिश्रित मद्याच्या द्वेषानें परिप्लुत झालेलीं असल्यामुळें, त्यांच्या अधिकारबलाच्या जुलुमाचें जें केंद्रीभवन होतें, त्याच्या जोरावर ते त्या गरीब बिचाऱ्यांना स्वार्थासाठीं रणमैदानांवर नेऊन, त्यांच्या हत्यांचें पाप आपल्या माथीं मारून घेतात.

जे लोक युद्धासाठीं अशा तऱ्हेनें रणमैदानावर खेंचून नेण्यांत येतात, त्यांना ते तेथें कशासाठीं व कोणाच्या फायद्याकरितां नेण्यांत येतें याबद्दलचें पूर्ण अज्ञान असतें ! त्यांचें धनि स्वतःच्या हालअपेष्टांचीं आणि दुःखांची मोठी करुणरसप्रपूरित खोटीं वर्णनें त्यांना ऐकवून, त्यांच्या हृदयांत भूतदयेची–स्वार्थासाठीं जागृति

उत्पन्न करतात आणि त्यांना न कळत त्यांचे बळी रणदेवतेला अर्पण करतात. पण आतां अशा लोकांचे डोळे उघडून, त्यांच्यांत खरी जागृति झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. त्यांनीं आपलें वास्तविक म्हणणें जगापुढें मांडलें आहे ! " सर्व देशांतील जनता शांततेंत राहून आपापले धंदेरोजगार, जर गुण्यागोविंदानें जिवंत-राहून आपसांत करण्यास राजी आहे, तर त्यांना प्राणघातक अशा युद्धभूमीवर बलात्कारानें खेंचून नेऊन, त्यांचे प्राण कां घ्यावेत ? कां व ते कोणी घ्यावेत ? तर मग प्रत्येक राष्ट्रांत अशा तऱ्हेनें आपल्याच बांधवांचें रणयज्ञांत स्वार्थासाठीं बलिदान करणारे खुनी आहेत तरी कोणचे नराधम?" हें जनतेचें तें वास्तविक म्हणणें अशा दोन प्रश्नांत जगापुढें मांडलें गेलें आहे.

या दोन्ही प्रश्नांची सरळ प्रांजलपणें सचोटीचीं उत्तरें मिळाल्यावांचून जनता आतां आपली चिकाटी सोडणार नाहीं. त्याकडे आतां यापुढें जाणून बुजून कोण दुर्लक्ष करील ? त्या मुत्सद्दि म्हणविणाऱ्या प्राणघातक राक्षसांचे आत्मे कोणच्या प्रकारच्या रौरव नरकांतून उत्पन्न झाले असावेत, याचा अंदाज अद्यापि कोणालाच झालेला नाहीं. आतां ते निराळ्या स्वरूपांत जगापुढें येणार आहेत ! जरी ते आतां कोणच्याही स्वरूपांत जगापुढें आले तरी तें घडलेल्या अमर्याद हत्याबद्दल जबाबदार असल्यामुळें—कोणाही—साधु अथवा भोंदूच्या अभिशापांच्या तडाक्यांतून त्यांना निभावून जाणें अशक्य आहे ! त्यांनीं जें हत्येचें आपल्या पायाखालीं नरककुंड तयार केलें आहे, त्यांत ते पददलित झाल्यावांचून कसे राहतील ?

## —भूतदयेची जागृति—

आज अनेक शतकें एक मोठा गंभीर आवाज होऊन राहिला आहे! तो आवाज अत्यंत पुरातन हृदयाच्या अगदीं खोल अशा गूढ स्थळांतून ऐकूं येतो आहे! तो सर्वांनाच ऐकूं येतो आहे, पण त्याच्याकडे कोणीच लक्ष्य देत नाहीं. निदान तो आहे तरी काय, याची चौकशीहि कोणी करीत नाहीं! तो मोठी कडक, सर्वश्रेष्ठ आणि भयंकर अशी आज्ञा करतो आहे कीं, "हत्या करूं नका!"

अशाच प्रकारचा भूगर्भांतूनहि भीतिप्रद आवाज निघतो आहे! हाय! हाय! युद्धांतल्या रक्तपातानें अंगावर उठणारे शहारेच युद्धाची चीड उत्पन्न करतात! छेः! फारच अघोर गोष्ट! मनुष्य मनुष्याच्या विरुद्ध माणुसकी विसरून हवे ते गुन्हे युद्धांत करतो; तर मग असा कोणचा रक्तलोभी राक्षस मानवाच्या देहांत छपून बसलेला असावा बरें? या अशा घातकी गोष्टी सुंदरशा प्रगतीच्या ऐवजीं सुधारलेल्या जगाच्या हातून घडणें तरी शक्य कां व्हावें? मानवी जीवनांतल्या सुधारणेच्या प्रगतीचें हेंच प्रदर्शन काय?

या सर्व गोष्टी कां बरें शक्य आहेत? पण याचें कारण फार दूरवर शोधायला जायला नको. आफ्रिका व एशिया खंडांतील हिंदुस्तानासारखीं गुलामगिरींत लोळत ठेवलेलीं राष्ट्रें वजा देतां, पृथ्वीवरच्या बाकीच्या राष्ट्रांतून प्रत्येक शहरांत, प्रत्येक गांवांत, प्रत्येक खेड्यांत किंवा प्रत्येक झोंपडींत, जेथें जेथें म्हणून सध्यांच्या सुधारणेच्या काळीं शाळा आहेत, तेथें तेथें लहान मुलें विद्याभ्यासासाठीं जमल्यावर त्यांचे

पंतोजी त्यांना जें शिक्षण देतात, त्यांत ते त्या बालकांच्या मनावर,— मानवाच्या सर्वश्रेष्ठ कार्याचें अशा तऱ्हेचें प्रतिबिंब वठवतात कीं,— "मानवाची जी कोणची अतिशय उच्च कर्तबगारी आहे, ती आपल्या राष्ट्राचें हित साधण्यांतच आहे आणि तें राष्ट्रीय हित ज्या वेळीं आज्ञा करील, त्या वेळीं मानवानें मानवाचा खून करणें ही गोष्ट मोठ्या सद्गुणाची मानली जाईल. अशा प्रसंगीं जो कोणी मुख्य 'ठार मार' म्हणून आज्ञा देईल, ती आज्ञा ईश्वरप्रणीत आहे असें मानून, बेला-शक अमलांत आणावी आणि देशहितसाधनाला मदत करावी. अशा वेळीं 'हत्या करूं नको' असें जरी हृदय सांगत असेल, तरी तें बाजूला ठेवलेंच पाहिजे; कारण मुख्याधिकारी खून करण्याचा हुकूम देत असतो."

अशा प्रकारच्या शिक्षणाचें बाळकडु लहान मुलांना त्यांच्या बाळ-पणापासूनच प्रत्येक राष्ट्रांत मिळत असल्यामुळें, प्रत्येक राष्ट्रांतला प्रत्येक माणूस आपल्या मानवबांधवाचा खून करणारा मारेकरी—कसाई बनलेला असतो व तो कृति करून दाखवायलाहि तयार झालेला असतो. याचमुळें कोणचाहि गुन्हा घडणें अशक्य होत नाहीं. युद्धा-च्या अघोर गोष्टी अमर्यादित असतात व त्या अशा शिक्षणानें केव्हांही निष्पन्नहि होतात.

ह्या शिसारी आणणाऱ्या भयप्रद गोष्टींचा आरंभ कोठें होतो व शेवट कोठें होतो बरें? तुम्हीं मोकळ्या सोडलेल्या रानटी हिंस्त्र जनावराला भूतदयान्वित होण्यास सांगा पाहूं? तद्वतच युद्ध हें कधीं तरी दया-

भूत होऊं शकेल काय? मानवाला त्याचा पूर्ण वीट आलेला नव्हता! तो मानवी कत्तलींचा गौरव करीत होता! ज्या दिवशीं जगांतला जुनाट वेडेपणा नष्ट होईल, त्या दिवशीं त्याच्या दृष्टीनें जें कांहीं त्याचा अपमान करतें आहे, त्या सर्वांचा नायनाट करण्याचा तो एक दिवस ठरवील! कोणच्याहि सबबीनें आणि कोणच्याहि कारणानें हत्या करायची नाहीं असें एकदां ठरलें, म्हणजे युद्ध ठार झालें असें खात्रीनेंच समजावें.

हें अनुशासन जोंपर्यंत निरोगी स्थितींत राहणार नाहीं व जोंपर्यंत हत्या करण्याची मानवाला मुभा आहे अशी मानवाची समजूत राहील, तोंपर्यंत असंख्य खून करणारे मारेकऱ्यांचे सैनिकरूपी जमाव, एखाद्या स्वतंत्र खुनी माणसापेक्षां अधिक जबाबदार होऊं शकतील. अशा सैनिकांना जोंपर्यंत पगार आणि लष्करी पोषाख मिळत राहतील, तोंपर्यंत युद्ध कधींच थांबणार नाहीं आणि युद्धांतर्गत अत्याचारहि बंद पडणार नाहींत.

सुधारलेलीं माणसें जोंपर्यंत त्यांना त्यांच्या शिक्षणानें प्राप्त झालेल्या नरहत्येच्या, जंतूंच्या तडाक्यांतून आपलीं अंतःकरणें आणि तदंतर्गत विचार यांची शुद्धि करणार नाहींत, तोंपर्यंत बदफैलीपणा हाच त्यांचा सद्गुण राहणार! लहान मुलांचीं मनें आणि मेंदु यांच्यावर, युद्धानें प्राप्त होणारें वैभव आणि जनप्रियता यांच्या गोष्टी व त्यांचीं चित्रें यांचा प्रभाव शिक्षकवर्ग जोंपर्यंत पाडीत राहील, तोंपर्यंत हिडिस अशी मानवी कत्तल अव्याहत चालणारच! पूर्वी घडलेला अपराध जोंपर्यंत अपराध असा गणला जाऊन त्याला शासन होणार

नाहीं, आणि मृत्युदंड हा अत्यंत उद्वेगजनक अपराध आहे असें जोंपर्यंत मानण्यांत येणार नाहीं, तोंपर्यंत—हे मृत्युदंड असेंच आपलें काम निर्दयपणें राष्ट्रावर करीत राहतील.

यापेक्षांहि पुढचा विचार मोठा आश्चर्यजनक आहे! मागें सांगितलेल्या घड्यांच्या जोडीला वस्तुपाठशिक्षणाचेंहि शिक्षण सध्यां दिलें जातें. जोंपर्यंत सामाजिक कायदा आपल्या उदाहरणानें प्रथमतः मानवी कायदा मोडीत राहील, व जोंपर्यंत तो मानवाला योग्य मान देणार नाहीं, तोंपर्यंत तो कायदा मोडणारें असें जें मानवी आयुष्य तें गुन्हेगार—पापीच समजण्यास हरकत नाहीं. अशा गुन्हेगारीची शिक्षा, जोंपर्यंत गुन्ह्यांवर सोइस्करपणाची ठरविली जाईल, जोंपर्यंत एकाचा छपविलेला गुन्हा—धिटाईनें आणि बेशरमपणें सार्वजनिक गुन्ह्यांबरोबर गणला जाईल, आणि रक्तपाताच्या सड्यानें तो सर्वांवरच लागू केला जाईल, तोंपर्यंत हें असेंच चालायचें!

न्यायानें झालेला खून आणि अपराध्याचा मृत्यु, यांची भरपाई काय तर युद्धानें त्यावर बजावलेली लाखों निरुपद्रवी लोकांच्या प्राणदंडाची शिक्षा!

भूतदयेचा हाच सर्व राष्ट्रांना अखेरचा निर्वाणीचा खलिता आहे! असे प्रकार आतां एके दिवशीं नष्ट होणार आहेत! कारण, तो आवाज असें सांगतो आहे कीं, 'तूं हत्या करूं नकोस.' तो आवाज जरी दुरून ऐकूं येतो आहे, तरी तो परकीय अशा कोणाचाहि नाहीं. तो

जनतेच्या हृदयप्रांतांतून थरारून उठलेला आहे! जो भूतदयेचा आवाज सर्व सजीव मानवी प्राण्यांना शोभा देतो, तोच आवाज़ जनतेला आतां एक नवीनच आज्ञा देतो आहे! तो त्यांना अगदीं नव्या वळणाचें शिक्षण देतो आहे! तो तिला सर्वश्रेष्ठ असें एक कर्तव्यकर्म शिकवतो आहे! तें कर्तव्य कोणचें? तर खरें मानवी कर्तव्य हेंच तें होय!

जन्मभूमातेची सेवा हीच काय ती मानवाची सर्वश्रेष्ठ कर्तबगारी आहे काय? नाहीं! तिच्यापेक्षांहि वरच्या दर्जाची त्याची एक सर्व-श्रेष्ठ कामगिरी आहे. ती कामगिरी जशी सर्वश्रेष्ठ आहे तशीच ती उदा-रतेचीहि आहे. ती जशी औदार्यपूर्ण आहे, तशीच ती अविनाशी आहे! ती स्मृतिपथांतून कधींच नष्ट होणारी नाहीं. तिनें जगांतील सर्व लोकसंहृदयेचीं मनें व्यापून टाकिलीं आहेत! असें आहे तरी तिची जागृति फारच थोड्या जनतेंत झालेली आहे! तीच जन्मभूमा-तेची खरी प्रजा होय! ती भूतदयाच सर्वांची आद्य जन्मदात्री अस-ल्यामुळें, तिनेंच आतां यापुढें सर्व मानवी प्राण्यांना तें उच्च शिक्षण देण्याचें व्रत स्वीकारलें पाहिजे!

आजपर्यंतच्या सुधारणेच्या प्रगतीच्या शेंकडों वर्षांत मानवी प्राणि आपल्या कौटुंबिक प्रेमापेक्षां, राष्ट्रीय हित आणि स्वदेशवात्सल्य यांना अधिक मान द्यायला शिकला आहे. आपल्या कुटुंबापेक्षां स्वजन्मभूमीवर अधिक प्रेम ठेवून, तिच्यासाठीं आत्मयज्ञ करण्याचें त्यानें शिक्षण संपादिलें आहे! त्यानें आतां त्याच्या वरच्या पायरीवर चढण्याची वेळ आलेली आहे! स्वदेशाभिमानाच्या वरचें पद त्यानें आतां भूतदयेला देण्यास शिकलें पाहिजे! तो आजपर्यंत स्वदेशवात्सल्यानें

मातृभूमीवर जसें प्रेम करीत आला, त्यापेक्षांहि विस्तृतपणावर आणि शुद्धतेनें त्यानें इतउत्तर भूतदयेवर प्रेम केलें पाहिजे. स्वदेशासाठीं परक्या सत्तेकरितां आत्मार्पण करण्याचें तत्व सोडून, त्यानें इतउत्तर भूतदयेसाठीं आत्मयज्ञ करण्याचें शिक्षण घेतलें पाहिजे.

आपली जन्मभूमि हेंच आपलें सर्वोत्तमगृह आहे, अशी जशी जाणीव त्याच्या हृदयांत झालेली आहे, तशींच जाणीव त्यानें इतउत्तर सर्व जगत् हेंच आपलें सर्वश्रेष्ठ घर आहे अशी उत्पन्न करून, त्या जगत्गृहांतलें आपलें खरें आरामस्थान म्हणजे भूतदयेचा पर्यंक आहे, अशी भावना करून घेतली पाहिजे.

खरोखर ज्याच्या हृदयांत भूतदयेची जागृति झाली असेल, त्यालाच मनुष्य म्हणतां येईल ! तशा मनुष्याला ती भूतदया काय शिकवते ? 'तो मनुष्य आहे' असें त्याला ती प्रथम शिकवून, नंतर 'तूं इंग्रज, जर्मन, फ्रेंच, हिंदु, मुसलमान, जपानी वगैरे जातींचा आहेस' असें सांगते ! त्यानंतर 'तूं स्वदेशभक्त होण्याच्या आधीं भूतदयापूर्ण आहेस असें बजावते' व त्यामुळें मनुष्याचें पहिलें कर्तव्य, जें मनुष्याशीं माणुसकी करणें हें, तें उत्पन्न झाल्यानंतर त्याच्याकडे नगरवासीयाचें कर्तव्यकर्म येतें.

सर्व माणसें हीं आपल्याप्रमाणेंच असल्यामुळें, त्यांच्या बद्दलचा भूतदयान्वितरतेनें आदर करणें आणि मानवी प्राण्याच्या आयुष्याला श्रेष्ठ मानणें,हीच मानवाची कर्तव्यांतली पहिली गोष्ट आहे.या सर्वांतील सार-भूत अशी भूतदयेची आज्ञा काय आहे, तर "तूं हत्या करूं नकोस !"

स्वदेशासाठीं प्राण खर्चीं घालणें, हें एखाद्या कुटुंबाकरतां प्राणदान करण्यापेक्षांहि श्रेष्ठतर आहे! परंतु स्वार्थासाठीं हत्त्या करण्यास गैरहजर राहून, भूतदयेसाठीं स्वतःची हत्त्या झालेली सोसणें हें त्याहीपेक्षां सर्वोत्तम होय! गेल्या महायुद्धांत ह्या मानवाच्या श्रेष्ठतर व्रताची सांगड केलेलीं कांहीं माणसें दृष्टोत्पत्तीस येतात. ज्यांनीं आपले देह धारातीर्थीं खुशाल दुसऱ्यांना ठेवूं दिले पण त्यांनीं कांहीं कोणाला मारिलें नाहीं, अशीं माणसें आढळतात. तीं माणसें निष्कलंक अंतःकरणानें आणि पवित्र हातांनीं भूतदयेसाठींच केवळ इहलोकची यात्रा संपवून परलोकीं गेलीं आहेत. भूतदया ही अबाधित अशी चिरंजीवी असल्यामुळें, तीं माणसें तिच्यासाठीं मेलीं आहेत आणि म्हणून तींहि तिच्याचसारखींच चिरंजीव आहेत.

भूतदया ही एक जिवंत मूर्ति आहे. जे कोणी तिच्यांत फक्त विभक्ततेची शक्ति बघतात ते केवळ अंध होत! माणसें आणि माणसांचीं राष्ट्रें—यांप्रमाणेंच ती एक सजीव विभूति असून, स्वतःसंबंधीं जागृत आहे! राष्ट्रें किंवा माणसें तिच्यासंबंधानें जरी जागृत नसलीं, तरी ती त्यांच्यासंबंधानें जागी असते. घातकी असो, प्रेमळ असो, खुनी असो, लुच्चालफंग्या असो, साधु असो, ज्ञानी असो अथवा मूर्ख असो—सर्व कांहीं तिच्या उदरप्रांतीं सांठवलेलें असतें. सर्वांचें आयुष्य तिच्या आयुष्यावर अवलंबून असतें. तिच्याच झोताच्या जोरावर राष्ट्रांत सजीवपणा आलेला असतो. सर्व मानवी देहांत जें रक्त संचार करीत असतें तें तिचेंच होय. अशा त्या भूतदयेचें जें सजीव शरीर आहे त्याचेंच राष्ट्रें हे अवयव आहेत. मानवी प्राणी तिच्याइतकें सार्वजनिक प्रेम

करायला शिकली नसल्यामुळें, ती त्यांच्या हृदयांत जरी निद्रिस्त असली, तरी तिचें हृदय तेथें जागृत आहे.

अशा त्या जिवंत विभूतिसंबंधानें आणि विचारपूर्वक तिच्या मस्तकासंबंधानें विचार करण्यास, पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांतील जे पुढारी यापुढें एकत्र जमून, तिच्या कर्मांचें योग्य वळण ध्यानांत आणतील, तेच इतउत्तर राष्ट्रांचा कारभार शांततेंत चालवतील ! जगांत खरी शांतता तेच नांदवूं शकतील.

शहरें आणि गांवें यांची शक्ति एकसंघांत निर्माण होऊन ती जर अर्वाचीन राष्ट्रांना जन्म देईल, तर तीं राष्ट्रें नव्या आणि उत्तम अशा अनेक गोष्टी निर्माण करून जुन्यांना नवीं वळणें देईल आणि अशा ज्या त्या गोष्टी, त्या नव्या भविष्याच्या खुणा म्हणून होऊं शकणार नाहींत ! त्या गोष्टी सर्वांत बलवत्तर अशी जी भूतदयेची शक्ति तीच एक सर्वशक्तींचें केंद्रीकरण करूं शकेल ! ती आपल्या ऐक्यांत रममाण झाली, ती आपल्या दैवाची स्वामिनी बनली, निकृष्टावस्थेच्या कचाट्यां-तून ती मुक्त झाली, म्हणजेच ती आपल्या नव्या आयुष्याच्या अटी ठरवील. निसर्ग ज्याच्या उदार आणि धाडसी कृत्यांची अपेक्षा करतें आहे, अशा मानवांची ती उत्पत्ति करील. अस्मातकालीं अशांची तिला खूण पटून, अमरस्वप्नें आणि पृथ्वीवरील भविष्यत्कालीन जैगिक दुःखमय स्वप्नें व आनंद, यांचीहि तिला जाणीव होईल.

मानवा, भ्रमिष्टपणानें तूं जो आज आपल्याच हातानें स्वतःचा आत्मघात करून घेतो आहेस, आणि ज्या आत्मकृत्यांनीं मृत्युयातना भोगतो आहेस, त्या सर्वांपासून तुला मुक्त करणारी घडी आता

अगदीं जवळ येऊन ठेपली आहे! म्हणून आपल्या हृदयाला लवकर जागृति दे!

राष्ट्रांनो, जो देह स्वतःबद्दल अज्ञानांधःकारांत असून, ज्याचे तुम्ही अवयव आहांत, ते तुम्हीहि अज्ञानानेंच आपसांत एकमेकांना रक्तबंबाळ करीत सुटले आहांत; पण तुम्ही सर्व एकाच हाडामांसाचे आहांत अशी जागृति तुमच्या अंतःकरणांत उत्पन्न होण्याचा काळ आतां अगदीं समीप येऊन ठेपला आहे! म्हणून आपल्या हृदयस्थ भूतदयेला जागृत करा! घंटानाद सुरू झाला आहे!

हे सर्वसाक्षि दैवी भूतदये, तूं जी सर्व राष्ट्रांच्या आणि मानवांच्या मनांत घोरत पडली आहेस, त्या तुझ्या जागृत होण्याच्या वेळेच्या घटका आतां अगदीं भरत आल्या आहेत! यास्तव हे भूतदये, आतां झटपट जागी हो!

## —स्वातंत्र्याचा सुप्रभात—

याप्रमाणें एकंदर वातावरण असून, युद्धरहस्यांतलें सत्य हें असें आहे! सध्या जो सर्वत्र घोंटाळा माजला राहून, त्यांत ज्या वस्तूंचा विपर्यास झालेला आहे, त्यांच्यामधून दृष्टि फेंकून, त्यांचें पर्यालोचन केल्यावरच मागें सांगितलेल्या गोष्टींचें सत्यस्वरूप मीं जगापुढें मांडलें आहे!

युद्धाला जर हें भावी ज्ञान नसेल तर झालेल्या युद्धाची किंमत एक फुटकी कवडीहि नाहीं! तें कःपदार्थच होय!

युद्धांतील दोन्ही पक्षांकडे, बादशाह्यांचें स्वातंत्र्य आणि जुलमी कर्त्यांचा स्वैरपणा हींच होतीं. त्या दोन्ही पक्षांत या गोष्टी अंतस्थपणें

आणि वसाहतींच्या संबंधानेंहि वावरत होत्या. असें असतां, झारशाहीनें कैसरशाहीला, अथवा मराठ्यांनीं ब्राह्मणांना दूषणें देण्याचें कारण काय ? मनमोकळेपणाच्या अभावापेक्षां येथें दुसरें कारण काय असणार ?

दोन्ही पक्षांत प्रॉटेस्टंट आणि क्याथलिक पंथाचे लोक असून ते सर्व ज्या एकाच धर्मबंधनानें देवाचीं लेंकरें होतीं, त्यांनीं त्या आपल्या देवबापाला आपापल्या छावण्यांतून एकमेकांचे जीव घेण्यास मदत करण्यासाठीं प्रार्थना सुरू ठेविल्या होत्या ! अशा स्थितींत त्या ख्रिश्चन धर्मापासून स्वतंत्र असणारे जे महंमदानुयायी, ते ज्या पक्षाला मिळाले होते,तेहि आपल्या विरुद्ध असणाऱ्या ख्रिश्चनांचा नाश करण्यासाठीं, आपल्या अल्लाची प्रार्थना करीतच होते ! यावरून या युद्धांत धार्मिक तत्त्वाचा धागा कोठेंच नव्हता असेंच म्हणावें लागतें !

युध्दासाठीं समरभूमीवर जे दोन पक्ष खडे झाले होते, त्यांतले बहुतेक लोक शेजारीपाजारी मित्रच असून, त्या सर्वांच्या देहांत नातेवाईकतेचेंहि थोडया फार प्रमाणानें एकच रक्त खेळत होतें व त्या परस्पर पक्षांत एकच प्रकारचा द्वेषहि वास करीत होता ! तुर्की सुलतान वगळला असतां, सर्व राजेहि एकाच रक्तमांसाचे होते ! तेव्हां या युध्दांत भिन्न जातिविषयक द्वेषाचा गंध होता असें तरी कसें बेलाशक म्हणावें ?

दोहोंकडचें लोणचें म्हणून तटस्थ राहिलेल्या राष्ट्रांच्या दृश्य फायद्यासाठीं सर्वांचाच नाश होणार, हें जर निश्चित ठरलेलें आहे, तर या युध्दांत काटकसरीचीहि दृष्टि अंधळीच झालेली दिसते.

या युद्धाचा शेवट फक्त एकच असा होणार असून, तो शेवट म्हणजे सर्वांचाच पराजय हा होय. या राक्षसी युद्धांत प्रत्येक पक्षपाती योद्धा लढतां लढतां थकून शेवटची धाप देईपर्यंत, आपणच विजयी आहों, असें मानतो. यावरून या युद्धांत फौजबक्षतेचीहि कांहीं किंमत नव्हती असें ठरतें.

ह्या युद्धविषयक बाबतींत यापेक्षांहि अधिक खोल पाण्यांत शिरणें अवश्य आहे ! कारण हें जें नाटक झालें, अथवा हा जो नाटकाचा प्रयोग सुरू आहे, त्याच्या पिछाडीच्या पडद्यांच्या मागें अद्यापि एक फारच मोठा प्रवेश उघडायचा राहिलेला आहे ! हें युद्ध बऱ्याच अदृश्य गोष्टींचें असून, दृश्य द्वंद्वाच्या मागें त्या गोष्टी लपलेल्या आहेत. जुनी पद्धतच आपल्या स्वतःच्या विरुद्ध उठल्याची ही लढाई हें एक दृश्य स्वरूप आहे ! त्वेषानें आणि कायद्यानें, एकाच्या विरुद्ध दुसऱ्यानें आपला सेनासागर उठवणें आणि आपसांतल्या यादवीनें आत्मघात करून घेणें, ही ती जुनी पध्दत होय !

आजपर्यंत शेंकडों वर्षांच्या दगदगीनें ज्या युरोपखंडानें मोठे-पणा प्राप्त करून घेतला होता, त्या त्याच्या श्रमाचें बक्षीस तें आज आपल्या जनतेला अन्यायाच्या पगारानें देतें आहे, हें बघणें मोठें कौतुकास्पद आणि आश्चर्यजनक आहे !

उत्तम तऱ्हेचें पावित्र्य अंगीं आणण्यासाठींच, युरोपनें हा आगीचा डोंब-ज्यांत स्वतः जळून खाक होऊन जाऊन पुन्हां नव्या स्वरूपांत अवतरण्यासाठींच मुद्दाम उठविला असावा असें वाटतें !

कारण, युरोपच्या बाहेर जें भरतें आहे तेथें नवें युरोप असून तें जगण्याची तयारी करतें आहे. युरोप जें आज आपल्या संपत्तीची आहुति रणमखांत देऊन त्या रणयज्ञाची सांगता होण्यासाठीं त्यांत आपलें रक्त ओतीत आहे,तें सर्व भविष्यत् कालाच्या चांगल्याकरतांच तें करीत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तसें जर नसतें, तर स्वातंत्र्याच्या सुप्रभाताच्या आधींची जी सायंकाळ जवळ येत चालली आहे, ती त्या काळरात्रीची नान्दी झाली असती, आणि तिच्यांत सर्व मुडदे व सर्व कुजक्या सुधारणा यांचा नायनाट झाला असता ! जिच्या उदरांतून असंख्य तारे बाहेर पडतात, ती काळरात्र काळोखापेक्षांहि गूढ आहे !

जें सर्व कांहीं दिसतें आहे त्याचा नायनाट केल्यावर तिनें तळातळाखालीं वस्ती करण्याचें, नाशांत राहण्याचें, विस्मृतीच्या व्यामोहांत गडप होण्याचें अथवा जगाची पुनर्रचना करण्याचें—यांपैकीं कोणचें तरी एक व्रत पतकरलें पाहिजे. कारण जलप्रलयानें सर्व जुने रस्ते नाहींसे केले असल्यामुळें, आतां–प्रलयांधःकारांत गडप होणें किंवा शांतीच्या सुप्रभाताकडे धांव घेणें–याव्यतिरिक्त अन्य मार्गच उरलेला नाहीं.

तो शांतीचा सुप्रभातकाळ म्हणजे गेलेल्या दिवसांचें पुनरागमन नव्हे ! ज्या सारखा जो कधींच उगवला नव्हता असा तो असून—पूर्वीं होऊन गेलेल्या कोणाशींहि ज्याचें सादृश्य दाखवितां येणार नाहीं, असा तो भविष्यत्काळचा कल्पनातीत आहे. अनेक वेळ, भविष्यत् काळ हा रेंगाळणारा भूतकाळ असतो. त्याच्या विक्राळ छाया

जोंपर्यंत आमच्यावर राहतील, तोंपर्यंत तो शांततेचा सुप्रभातकाळ आम्हांला प्राप्त होणार नाहीं.

तर मग त्या विक्राळ छायांतून कोणचीं राष्ट्रें आधीं बाहेर पडणार ? वादळाला जीं प्रथम ढिलें सोडतील, त्यांनांच त्याचा पहिला धडा समजला असें ठरेल ! कांहीं झालें तरी, जीं प्रथम पुढें येतील तींच सर्वसाधारण पराजयाकडून शिक्षण घेतलेलीं असतील.

राष्ट्रांना घोंटाळ्यांत पाडणारें कोडें जें नेहमीं असतें तें हेंच कीं, त्यांनीं आहेत त्याच स्थितींत राहून त्यांच्या ज्या हालअपेष्टा चाललेल्या असतात, त्या त्यांनीं सहन करीत तरि एक रहावें किंवा त्यांनी सर्वतोपरी समूळ नवें तरी बनावें.

थोडक्याश अंतर्बाह्य संवयी बदलण्याचा हा प्रश्न नसून, अस्तित्वाच्या कांहीं श्रेष्ठ पद्धतींचा आहे. केवळ राज्यव्यवस्था अथवा राजनीति यांत बदल केल्यानें किंवा राज्यव्यवस्थापक मंडळ अथवा अधिकारी वर्ग यांच्यांत फेरफार केल्यानें—जगताच्या उलथापालथींचा शेवट समजणें शक्य नसतें. त्यांचें नशीब बदलण्यास या गोष्टी पुरेशा नसतात.

चालू व्यवहारांची शुद्धि न करतां व त्यांत योग्य ते फेरफार करण्याचें मनांत न आणतां, नुसत्या मानवाची सुधारणा करून काय होणार ? अथवा नुसत्या चालू व्यवहाराची योग्य व्यवस्था लावून, मानवांची आहे तीच स्थिति कायम ठेवली तरी काय फायदा होणार ? वास्तव, मानव जात आणि तदनुषंगीय सर्व गोष्टी यांची एकसमयावच्छेदेंकरून योग्य सुधारणा केली गेली पाहिजे. प्रत्येक राष्ट्राचा आत्मा शुद्धावस्थेंत बदलला गेला पाहिजे. नव्या जगाची नव्या सृष्टीची जागृति, सर्वांतर्यामीं जन्म पावली पाहिजे.

प्रत्येक राष्ट्रांतील लोकसंख्येच्या गर्दीत, नव्या जगाच्या या जागृतीनें विकारवश झालेले लोक आहेत, नाहींत असे नाहींत. पण नाश पावत असलेल्या—नष्ट दशेला लागलेल्या शतकाशीं त्यांचा कांहीं एक संबंध नाहीं. जणूंकाय ते भविष्यत्‌काळांतूनच उदय पावले आहेत.

असे ते लोक प्रत्येक राष्ट्रांत जरी अल्प प्रमाणांत आहेत, तरी त्यांना अनुसरणारे इतर फार दूरवर पसरलेले असून, ते रोज त्यांच्या जवळ जवळ येताहेत. ज्यांच्या भ्रामक कल्पनांचा चुराडा होऊन द्वेष मावळला आहे, अशा अनेकांच्या हृदयांत भावी शांतीच्या सुप्रभाताचीं किरणें प्रवेश करूं लागलीं आहेत. जसजसा काळ लोटत जाईल, तसतशी त्यांची संख्या वाढत जाणार आहे. थोड्याच काळांत, अशा लोकांचे संघच्या संघ प्रत्येक राष्ट्रांत दिसूं लागतील.

अशा त्या लोकांना जुन्या मेढेकोटावर एकत्र जमूं द्या ! कारण सर्व राष्ट्रांतून असे ते लोक आपल्या धार्मिक जन्मभूमातेचे प्यारे पुत्र असतात ! अशा लोकांना त्यांचीं लुळीं झालेलीं व अवनतीच्या खोल खड्डयांतल्या गाळांत रुतून बसलेलीं त्यांची राष्ट्रें, उन्नतीच्या शिखराकडे नेण्याचा प्रयत्न करण्यासाठीं एकत्र जमूं द्या ! कालच्या गुलामगिरींतून त्यांना उद्यांच्या स्वातंत्र्याकडे जाण्यासाठीं एकत्र जमूं द्या ! अशा वैभवहीन झालेल्या व गुलामगिरींत रखडत पडलेल्या राष्ट्रांतील नव्या मन्वंतरांतल्या लोकांना जर कोणी जागच्याजागीं थोपवून धरून, ते स्वतःच्या कर्तबगारीनें करून घेत असलेल्या आपल्या प्रगतीला बंधारा घालतील, तर मग त्यांनीं खुशाल इतर दयाभूत आणि सद्गुणि अशा अवशिष्ट राष्ट्रांकडे दाद मागण्यासाठीं मुक्त-कंठानें अर्ज करावेत. कारण, सर्वच

राष्ट्रें कांहीं अद्यापि नीचावस्थेंत निमग्न झालेलीं नाहींत ! अशा लोकांना, प्रथम पूर्वेकडे जो स्वातंत्र्याचा सुप्रभात पाश्चिमेच्या आधीं दिसणार आहे त्याला वन्दन करूं द्या ! पौर्वात्य हो, आतां प्रथम तुम्हांलाच तो आनंदाचा समय दृष्टीस पडणार आहे आणि म्हणूनच, तुम्ही त्याचें पूजावंदन करण्यासाठीं तयार असा !

जगाच्या पाठीवरील सर्व मानवी प्राण्यांत अशीं कांहीं माणसें आहेत कीं, तीं कांहीं एकाच राष्ट्रांतलीं नाहींत. देशसेवेपेक्षांहि श्रेष्ठ अशी जी भूतसेवा तिची तीं माणसें योग्य प्रकारें बजावणी करीत आहेत ! त्यांनीं भूतदयेची भूतसेवा करण्याच्या दगदगीचे जे हाल आजपर्यंत सोसले आहेत, त्या त्यांच्या उपकारांची फेड करण्यासाठीं, आतां जगांतल्या सर्व मानव जातींचें लक्ष त्यांच्याकडे वेधलें आहे.

येऊं द्या ! अशा लोकांना आतां जगापुढें न्यायाचा कायदा कोणचा आहे, तो प्रतिपादन करायला येऊं द्या ! कारण तो कायदा जसा कौटुंबिक संगतींत सुखानें नांदतो, तसाच तो यापुढें राष्ट्रांच्या संगतींत राज्य करूं लागला पाहिजे. राष्ट्रांतील रहिवाशांचें जो कायदा जसें ऐक्य घडवून आणतो, तसेंच जीं राष्ट्रें जगांतलीं रहिवाशीं आहेत, त्यांच्यांत त्यानें ऐक्य घडवून आणलेंच पाहिजे ! मानवी जातीच्या शांततेचा उत्साह करण्यासाठीं त्यांची एकी होऊं द्या ! त्यांच्यांत ऐक्य घडून भविष्यत्‌काळाची इच्छा आणि भूतकाळाचें वचन यांची भर पडूं द्या ! जगांतील सर्वलोकहो, ध्यानांत ठेवा ! जे भूतकाळीं होते व भविष्यत्‌काळीं पुन्हां जे अवतीर्ण होणार आहेत त्यांची सर्व दृष्टी सध्यांच्या पिढीवर लागलेली आहे.

गेल्या शतकांतील त्यांच्या सर्व आशांची पूर्तता करणें हें सध्यांच्या चालू पिढीच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे, आणि त्या त्यांच्या इच्छा सध्यांच्या पिढीनें पूर्ण केल्याच पाहिजेत ! आजपर्यंतच्या इतिहासाला जी अत्यंत आणिबाणीच्या आणि सोक्षमोक्षाच्या प्रसंगाची माहिती नाहीं, अशा—भूतदयान्वित व इतिहासानें कधींच न पाहिलेल्या स्वातंत्र्याच्या सुप्रभात—काळाचीं पहिलीं किरणें बघण्याची जी आशा—ती सांप्रतच्या पिढीनें परिपूर्ण करण्यासाठीं जिवाचें काय हवें तें रान केलें तरी हरकत नाहीं—पण ती गतपिढींतल्यांची आशा त्यांनीं पुरी केलीच पाहिजे, महात्मा गांधिजींना खऱ्या स्वरूपांत ओळखून व मौ. शौकत अली आणि मौ. महम्मद अली हे दोघे बंधु आणि सौ. सरोजिनी नायडूसारखी सुचरिता स्त्री—अशीं चौघेजण जें कांहीं करून राहिलीं आहेत तोच रस्ता तुम्हीं आतां आक्रमावा ! इतकें बजावून, शिवाय समाजांत राज्यरक्षक आणि प्रजा असे जे दोन लोक असतात त्यांनीं एकमेकांचें संरक्षण करावें, एकमेकांना साह्य करावें, एकमेकांनीं मिळून पराक्रम करावेत, आपसांत कधींहि रणें माजवूं नयेत आणि सर्वांनीं मिळून तेजस्वी ज्ञानांत प्रवेश करावा ! आतां अखेरीस प्रारंभीं सांगितलेल्या मंत्राचा सार्थ जप करण्यास सुचवून हा माझा संदेश मी येथें संपवितों.

व्यक्तिविषयक शान्ति असो ! सामाजिक शान्ति असो !!
आणि जगच्छान्ति असो !!!

॥ ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

REFBK-0001893